REGSTERED N No. 

सहामाही „ ३ „ ८
साल अखेर „ ७ „ १ ८
किरकोळ अंकास ........................ ४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस ........ ०१ ०६
दुसरे खेपेस ........ ०१

Six monthly......... 3 .............. 8 as
Single copy ........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line... 8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXV — AKOLA MONDAY 3 JUNE 1901 — NO 21

वर्ष ३५ — आकोला सोमवार तारीख ३ माहे जून सन १९०१ इ० — अंक २१

## जाहिरात

सर्व लोकांस कळावे कीं कृष्णाजी जिवाजी उंबेगांवकर राहणार पुसद तालुके मजकूर जिल्हा वाशीम हा आमचा कुलमुखत्यार होता त्यांचे कुलमुखत्यारपत्र तारीख १९-५-१९०१ इ० रोजीं आह्मी रद्द केले असून तो नोकरी वरून कमी झाला आहे. तर आमचे करितां कोणतीच कारवाई सदरहू इसमानी करूं नये. केल्यास ती निरर्थक समजली जाईल' कळावें, तारीख २३ माहे मे सन १९०१ इसवी.

सही
तुकाराम पुंडलीक चिदरवर
दस्तुर खुद्द.

## जाहिर खबर

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझा मधला भाऊ नागोराव जनार्दन हा अजून अज्ञान असून गैरसमजूतीनें व वाईट नादांनें कर्ज वगैरे काढील तर तें कोणी माझ्या संमती शिवाय देऊं नये. जो देईल तो फसेल आणि त्याची जबाबदारी इस्टेटीवर राहणार नाहीं. कळावें. तारीख २९ मे १९०१ इसवी.

सही
गोपाळ जनार्दन छापकर.
रहाणार अकोला.

## जाहिरात

खालीं सही करणार याजकडून सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं माझे तीर्थरूप खुशाल वल्लद भगवानजी पाटील हे म्हातारपणीं निशापाण्याचा अंमल फार करितात आणि त्या अंमलाच्या धुंदींत बदमाष व कार्यसाधु लबाड लोक त्यांजपासून वाटेल तो लेख लिहून घेतील किंवा मागें त्यांनीं लिहून घेतला असेल तर तो इस्टेटीला कोणत्याहि प्रकारें लागूं होणार नाहीं. सर्व लोकांस मी या जाहिर खबरीनें प्रसिद्ध करितें कीं माझ्या तीर्थरूपांची बुद्धि ठिकाणावर नाहीं आणि जर कोणी स्वतःच्या लाभा साठीं त्यांच्या हातून एखादा कर्जरोखा, गहाणखत किंवा खरेदीखत लिहून घेईल तर तो लेख माझ्या तीर्थरूपांला बांधू शकणार नाहीं. आणि त्याची जबाबदारी स्थावर जंगम इस्टेटीवर राहणार नाहीं. जो व्यवहार करील तो फसेल, आणि त्याचे कर्जरोखे व इतर कागदपत्र बातल आहेत असें समजावें. कळावें तारीख ३१ माहे मे सन १९०१ इ०

सही
नागो वल्लद खुशाल पाटील
राहणार मडाखेड
दस्तुर खुद्द.

## नोटीस

यादव विष्णु घोरणीकर राहणार तेल्हारे यास:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मास मी दरमहा रुपये ५० पन्नास पगार ठरवून नोकर ठेविलें त्या प्रमाणें तुह्मी माझे काम केलें पाहिजे होते. तहशिलदार साहेब तालुके दर्यापूर यांचे कोर्टांत शेताचे खाते माझे नांवानें झाले, त्या ठरावावर विरुद्ध पक्षकारानें जनाब डिपुटी कमिशनर साहेब बहादूर जिल्हे एलिचपूर यांचे कोर्टांत अपील केलें, त्या अपीलाचे चौकशीची तारीख १६ एप्रील सन १९०१ रोजी नेमली होती. त्या तारखेस तुमचें काम कोर्टांत हजर राहण्याचे होते. परंतु तुह्मी हजर झाला नाहीं त्या तारखेस मी आजारी असल्यामुळें मला जाता आले नाहीं. फार चांगले झाले कीं, माझे सुदैवानें सरकारनी तारीख ६ मे सन १९०१ नेमून मला नोटीस केली, तुह्मी माझें काम वेळेवर करीत नाहीं यासाठीं तुह्मास ह्या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तारीख १६ एप्रील सन १९०१ पासून तुमचा पगार बंद केला आहे, असें तुह्मास पांच पंचांचे समक्ष, १६ एप्रील च्या तारखेस मी जात नाहीं असें तुह्मी सांगितल्या बरोबर, कळविलेंच आहे. तुमचे पगाराबद्दल तुमचे देणें नोकर राहिल्या दिवसा पासून हिशेबानें जे निघेल ते घेऊन जावें. तुमचें कुलमुखत्यारपत्र मी रद्द केले आहे. तुमचे जवळ आमचे कागदपत्र जे असतील तें ही नोटीस पावल्या दिवसा पासून ८ आठ दिवसाचे आंत आणून द्यावें तसें मुदतीचे आंत न केल्यास रीतशीर तजवीज केली जाईल. कळावें. तारीख ३० माहे मे सन १९०१ इसवी.

सही
बापूराव भास्करराव देशमुख
सातेगांव तालुके दर्यापूर
जिल्हा एलिचपूर

## नोटीस

रा. रा. नारायण वल्लद हरबा पऱ्हाटे रहाणार पुसल तालुके मोर्शी यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळविते कीं, तुमच्याशीं माझें लग्न होऊन अदाज १२-१४ वर्षें होत आलीं. या कालांत तुह्मी मजला एक दोन वेळांच कायते घरीं नेलें असेल. सुमारें ८-१० वर्षें मी आपल्या बापाच्या घरीं रहात आहे व तोच माझ्या पोटापाण्याची सोय करितो. तुह्मी ५-६ वर्षांपूर्वी दुसरें लग्नहि केलें. आपल्या मनांत मजला नांदविण्याचें मुळींच दिसत नाहीं. कारण तुह्मी माझी विचारपूस सुद्धां करीत नाहीं. तरी मी वर्ष सहा महिन्यापूर्वीं एक महिनाभर तुमचे घरीं येऊन राहिलें पण तुह्मी मला मारून बाहेर काढून दिले व त्या मारानें मी आजारी पडून इस्पितळांतही मला रहावें लागलें. असो. आतां आपल्यास मला नीट सूद्पणी वागविणें असल्यास, ही नोटीस पोचल्या पासून ८ दिवसाचे आंत मला घरीं घेऊन जावें. व चांगल्या रीतीनें वागवाल व माझ्या जीवाभावास दखल देणार नाहीं अशा बद्दल चार संभावित पंचांची खात्री करून द्यावी. असें करणें बरें वाटत नसल्यास मला फारकती द्यावी. येणे प्रमाणें मुदतींत माझी योग्य व्यवस्था न झाली तर हीच नोटीस फारकतो समजून मी दुसरा घरठाव करीन. मग तुमचा मजवर कसलाहि हक्क रहाणार नाहीं. शिवाय माझ्या इतके वर्षांच्या पोटगीचा खर्च अंदाज रुपये २५० आपणा पासून सरकार मार्फत भरून घेईन. कळावें तारीख ३१ माहे मे सन १९०१ इसवी.

( सहीची निशाणी )
बांगडी— सारजी मर्द नारायण हल्लीं
वस्ती बाळापूर हिचे
हातची असे.

## नोटीस

बेशमी देवराव उमाकांत मुंगी राहणार मौजे शहापूर तालुका खामगांव यांस:—

खालीं सही करणार याजकडून ३०।४ १९०१ च्या लेखी नोटिशीचें उत्तर देण्यांत येते कीं तुमच्या नोटिशींतील मजकूर पुष्कळसा खोटा आहे. मी खरेदीखत लिहून नोंदून दिलें पण त्याच्या मोबदल्याचा भरणा तुह्मी बुडविणार आहां असें आतां दिसतें. तुमचे कर्जाचा हिशोब करून ३२५ रुपयावर तोड झाली बाकीचे ५७५ रुपये तुह्मी अजून दिले नाहींत व ही रक्कम देण्याला तुह्मापाशी रुपयां नाहीं. थोडक्या काळांत देतो असें सांगत सांगत तुह्मी एक वर्षाचा काळ लोटविला आणि आतां नोटीस देतां, तेव्हां हा सर्व कपटाचा व्यवहार दिसतो. ही दगलबाजी तुमच्या सारख्या सावकाराला लाजिरवाणी आहे. शिवाय आपला खरेदीचा व्यवहार गहाणाच्या स्वरूपाचा आहे आणि मी तुमची नवी ५७५ रुपयांची बाकी सव्याज फेड केल्या नंतर ही खरेदीहि रद्द करण्याची तुह्मी कबूली केली होती. पण हें तुह्मी विसरला असें दिसतें. दोन हजार रुपयांची शेती ९०० रुपयांच्या खरेदीखतावर पुरा मोबदलाही न देतां लुबाडण्याची गोष्ट कधींही सिद्धीस जाऊं देणार नाहीं. शेताचा व घराचा ताबा मजजवळ आहे आणि ताबा मजजवळच राहण्याचे खरेदीखताच्या वेळीं ठरलें होतें. खरेदी शिवाय तुह्मी कर्ज देवाल नव्हता आणि जुन्या कर्जाचा तगादाही मोठा केला ह्मणून खरेदीखत लिहून दिलें. तुह्मी केलेले बनावटी भाडेपट्ट तुह्माजवळच ठेऊन द्या. मी तुह्माला शेतांत किंवा घरांत पाऊल ठेऊं देणार नाहीं. मला लबाडीनें ठकविल्या बद्दल तुह्मावर मला फौजदारीही करावी लागेल. ही नोटीस पोचल्या पासून आठ दिवसांच्या मुदतींत तुह्मीं खरेदीखत फाडून परत करावें. तुमच्या कर्जाबद्दल दिवाणी कोर्ट तुह्माला मोकळें आहे. माझ्या घराचा व शेताचा ताबा करण्या साठीं दांडगाई किंवा जबरदस्ती कराल तर त्याची जबाबदारी तुमच्या शिरावर राहील. तुह्माला मी शेत किंवा घर देणार नाहीं. या नोटिशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल. कळावें. २९ मे १९०१ इसवी.

( सही )
विठोबा वल्लद मल्हारी पाटील
राहणार शाहापूर दस्तुर खुद्द.

## नोटीस

बेशमी किसन वल्लद जानजी वट्टी राहणार उंबरे आणि सखाराम वल्लद हिरामण वट्टी राहणार कोल्हार ता. आकोट यांस:—

खाली सही करणार इजकडून या नोटिशीनें कळविण्यांत येते कीं तुह्मी आह्माला कळूं न देतां लबाडीनें व लपंडावानें माल्हाई मर्द विठोबा आणि भुलाई मर्द भिवाजी यांच्या कडून अनुक्रमें प्रत्येकी ¼ हिस्सा आमच्या गाजीदिन नगर येथील सर्व्हे नंबर २६ च्या शेतांतील विकत घेतला असे तुह्मी श्रावण वल्लद जिवाजी याजवर केलेल्या दिवाणी मोकद्दम्यांत कळून आलें. सदरहू दोन्ही चवथे हिस्से प्रथम विकत घेण्याचा अधिकार माझा आहे. तर रुपये ६० व १२५ मजकडून घेऊन सदरहू हिस्से माझ्या स्वाधीन करण्याविषयीं तुह्माला तोंडी कळविलें पण तुह्मी ती गोष्ट मनावर घेतली नाहीं. ही नोटीस पोचतांच तुह्मी एकूण १८३ रुपये घेऊन जावें आणि त्या हिश्यांची वाहीपेरी करूं नये. असें न केल्यास कोर्टांत दावा करून उभ्या पीका समेत सर्व नुकसानीसह खर्चा सुद्धां सदरहू हिस्से ताब्यांत घेतले जातील. कळावें. तारीख २८ मे सन १९०१ इ०

सही
लक्ष्मी मर्द रावजी राखोंडे राहणार
उंबरें ता० आकोट
तर्फे मुखत्यार गणपत वल्लद निवाजी
सदाफळे माळी राहणार उंबरे
निशाणी बखर.

नोटीस

रा० बापू भगाजी पंच माई राहाणार बामळी ता० दर्यापूर यांसः—

खाली सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं आमची आजी गुनाबाई जवजे आनंदराव हिनें तुमचे जवळ अनामत ह्मणून ठेविली ती रकम रुपये ४८९॥। सदर्हू रकम आमचे वडील वामनराव यांचे दुकानची खातेबाकी समत १९१२ साली निघाली होती ती रकम आपण तारीख १६।३।१९०० चे नंतर घेऊन आला होता परंतु तुह्मी रकम पुरी न आणल्यामुळें आमचें आजीनें ती न घेता सर्वच आपले जवळ अनामत राहू द्या असें सांगितल्यावरून तुह्मी अनामत ठेवण्याचे कबूल केले. सबब आमची अनामत ही नोटीस पावल्या पासून ८ दिवसाचे आंत आह्मांस आणून द्यावी कळावें. तारीख १९ माहे मे सन १९०१ इसवी.

सही

गोपाळराव वामनराव अ० सरकार
तर्फे म्यानेजर खुशालराव
गणपतराव देशमुख अंदुर
दस्तूर खुद्द.

---

नोटीस

तुळशी व अज्यान मर्द मारुती पाटील राहणार तामगांव ता० जळगांव यांसः—

खाली सही करणार यानकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा भ्रतार मारुती वल्द दुधाजी हा माझा साक्षांत वडील भाऊ होता. आह्मी उभयता बंधु १९ वर्षापूर्वी एकत्र असून पुढें आपसांत मिळकत निरनिराळी करून घेतली तेव्हां पासूनच विभक्त झालो पूर्वी उभयताची समाईक मिळकत होती. तुमचे भ्रतारास सुमार १९ महिने झाले, देवाज्ञा झाली असून तुमच्या पोटी पुत्र नाहीं. धाकटीस दोन कन्या. त्यांचे लग्न होण्याचे आहे. तुमच्या जिनगीची तुह्मी अफरातफर मांडली असे माझे नजरेस आल्यावरून तुह्मास असे स्पष्ट सुचविण्यांत येते कीं तुह्मी स्थावर जंगम मिळकत गाहाण किंवा विकण्यास तुह्मास अधिकार नाहीं. जर अशी अफरातफर तुह्मी कांहीं फितुरानीं केली असल्यास परत घ्यावी; कारण तुह्मास खर्चापेक्षा उत्पन्न अधिक होत आहे. या सालांत सुद्धां अंदाजा १५०० रुपयाचे पीक झाले आहे. खर्चापेक्षां उत्पन्न अधीक आहे असे असतांही तुह्मी जिनगीची वाताहात लाविल्यास तुह्मी फक्त अन्नवस्त्राचे मालक आहा या शिवाय तुमचा हक्क जिनगीवर नाहीं असा योग्य कोर्टांत दावा करून जिनगी तुमचे ताब्यांतून काढून घेऊं, यास्तव कळविण्यात आले आहे. कळावें तारीख ३० माहे मे सन १९०१ इसवी.

( सही )

बळीराम वल्लद दुधाजी पाटील
दस्तुर खुद.

नोटीस.

दलसुखराय बलाराम दुकान तेल्हारा यांसः—

खालीं सही करणार यानकडून कळविण्यांत येतें साल मजकुरी तुह्मी अकोल्यास आमचे भागिनींत कपासीचा व्यापार केला त्याबद्दल कपाशी खरेदी करून आकडे फकरूद्दीन मुल्ला मोठाभाई यावर आपण उभयतांनीं केले व त्यांनें स्वीकारिले. हल्लीं त्याची नोटीस तारीख २७।५।१९०१ ची तुह्मांस व आह्मास आली आहे. तर सदर्हु इसमाचे खाते चुकते करून देण्याची तजवीज लवकर करावी. आह्मी निम्मेचे भागीनदार आहों व निम्मचे तुह्मी आहांत. सबब तुह्मांस कळविलें जाते कीं, बोजे शिल्लक आहेत ते तुह्मी अकोल्यास येऊन विक्री करावेत अगर निम्मे तुह्मी घ्यावे व निम्मे आह्मास द्यावेत. आमचे कडस जी रकम होईल त्याचा बंदोबस्त आह्मी करून देण्यास तयार आहों. निम्मेची तुम्ही तजवीज करून द्यावी. असें कराल व जर फकरोद्दीन मुल्ला मोठा भाई यानीं सर्व रकमेचा दावा केला तर खर्चाबद्दल आह्मी जबाबदार नाहीं. सर्व खर्च तुह्मांस भरावा लागेल. विनाकारण आपण दोन महिन्या पासून माल अटकवून ठेविला आहे. व्याज व विम्याची नुकसान होत आहे. तारीख १६-५-१९०१ रोजीं तुह्मी व आह्मी किसनसिंगला बोजे विकले असून माप ४ वाजतां करून देतों असें सांगून तेल्हाऱ्यास तुह्मी निघून गेला. त्यामुळें किसनसिंग पासून आह्मांला सवदा सोडून घेणें भाग पडलें. ही गोष्ट दुकानदारीला शोभत नाहीं. बरें असो. आतां ही नोटीस पावल्या तारखे पासून ४ दिवसांचे आंत वरील सर्व व्यवहाराचा योग्य कायदेशीर निकाल करावा. वेळेवर असें करण्यास चुकाल तर खर्चाबद्दलची व इतर सर्व नुकसानी बद्दलची जबाबदारी तुमच्या एकट्यावरच राहील.

या शिवाय सदर्हू शेअर खात्यामध्यें आमच्या दुकानचे ११० रुपये खर्च झाले आहेत. यांतील तुमच्या निम्मे पातीचे रुपये ५५ नोटीस पोचतांच पाठवून द्यावेत. नाहींतर त्याबद्दल फिर्याद करून या नोटिशीच्या खर्चासह सर्व रक्कम भरून घेतली जाईल. कळावें तारीख १ माहे जून सन १९०१ इसवी.

सही—मारवाडींत.

हरनंदराय गणपतराय दुकान अकोला दस्तुर खुद.

---

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य १ शके १८२३

## नक्कलनवीस

वऱ्हाडांतील नक्कलनवीसांच्या खात्यामध्ये पुष्कळशा सुधारणा करण्या सारख्या आहेत. या खात्यांतील लोकांचीं अक्षरें मोठीं सुबक, वळणदार व सुवाच्य असलीं पाहिजेत असा लोकांचा समज आहे, पण अनुभव असा वारंवार येतो कीं पुष्कळच नक्कलनवीसांचीं अक्षरें अगदीं गचाळ हेंगाडीं, व कंटाळवाणीं असतात. जेथें जो गुण अवश्य पाहिजे तेथें तो गुण जणूं काय नियमानें नसतो असा वास्तविक प्रकार आहे, कांहीं नक्कलनवीसांची लेखनकला चांगली असून अपवादकारक असेल, परंतु तो गुण त्या खात्याच्या सुव्यवस्थेनें आलेला नाहीं पण केवळ काकतालीय न्यायानें संप्राप्त झाला आहे असें आढळून येईल. या खात्याची रचना अशी आहे कीं त्याबद्दल सरकारला तोषीस कांहींच लागत नाहीं. लोक नक्कला करितां जो पैसा खर्च करितात त्याच्या रकमेंतून या खात्याचा खर्च भागविण्यांत येतो. नकलांचें उत्पन्न मोठें आहे पण सर्वच पैसा सरकार खर्ची न घालतां कांहीं उत्पन्न आपल्या खजिन्यांत अडवतें असें दिसून येईल. सरकारची मालकी नकलेच्या उत्पन्नावर काडीमात्र नाहीं आणि त्या उत्पन्नाचा योग्य विनियोग करण्याची जबाबदारी मात्र सरकारच्या अंगावर आहे. ही जबाबदारी योग्य प्रकारें संभाळली जात आहे असे आह्मांस वाटत नाहीं. पुष्कळदां अशा गोष्टी आढळतील कीं कांहीं कारकुनांस पगार नक्कलांच्या उत्पन्न तून दिला जातो आणि त्यांचा उपयोग मात्र इतर कामाकडे करून घेण्यांत येतो. हा अन्य उपयोग जितका लवकर बंद होईल तितका बरा. या खात्याच्या उत्पन्नाची शिल्लक नक्कलनवीसांस पेनशन देण्याकडे खर्चण्यांत तरी आली पाहिजे किंवा उत्पन्नाचा व खर्चाचा मेळ बसेल अशा बेतानें नकलेच्या फीचा दर तरी कमी केला पाहिजे.

या खात्यांत लोकांस नेमण्यापूर्वी त्यांच्या अक्षरा विषयीं जितकी कसोशिची चौकशी व्हावयाला पाहिजे तितकी होत नाहीं. असें दुःखानें ह्मणावें लागतें. या खात्यांत चांगल्या लोकांची भरती होण्याला दोन मोठे प्रत्यवाय आहेत. या खात्यांत पेनशन नाहीं ह्मणून ज्याला कोठेंही इतरत्र कारकुनी मिळत नाहीं तो नक्कलनवीस निरुपायास्तव होतो. त्या शिवाय या खात्यातल्या लोकांस पूर्वी जशा दुसरीकडे कारकुनीच्या बढत्या मिळत असत तशा अलिकडे मिळत नाहींत. नक्कलनवीसाला पुढील बढतीचा योग नसल्यामुळें चांगलेसे कारकून या जागेवर मिळत नाहींत पूर्वीच्या सारख्या बढती विषयीं उमेदी आतांशा नसतात आणि त्यामुळें या खात्याचें मोठेंच नुकसान होत आहे. हें खातें अगदीं निराळें ह्मणून सापत्नभावानें वेगळें टाकण्यांत येतें. त्याचा दुसऱ्या कोणत्याच खात्यांशीं हक्काचा संबंध ठेविलेला नाहीं. नक्कलनवीसांची पुढील नेमणूक तहशिलींत किंवा इतरत्र करावी असा कांहीं नियम नाहीं. या खात्याच्या अडचणी आह्मी वर दर्शविल्या आहेत त्या दूर करण्याविषयीं हल्लीं चळवळ चालूं आहे हें कळविण्यास आह्मांस आनंद वाटतो.

पेनशनीची ही चाकरी नाहीं असें समजून उमजूनच लोक नक्कलनवीस होतात ही गोष्ट खोटी नाहीं तथापि नक्कलनवीसांच्या कल्याणापेक्षां निदान त्या खात्याच्या चांगुलपणासाठीं तरी या खात्याला पेनशनीचा हक्क देण्यांत यावा ह्मणजे पुष्कळशा सुधारणा होण्या सारख्या आहेत. तसेंच या खात्यांतील बढतीचा हक्क इतर खात्यामध्यें ठेवण्यात यावा, किंबहुना कारकुनीच्या चाकरीला नक्कलनवीसाच्या कामाची पहिली शाळा आवश्यक ह्मणून ठेवावी असा आमचा अभिप्राय आहे. नक्कलाचें उत्पन्न पुष्कळ येतें तेव्हां या दोन सुधारणा करण्याची गोष्ट वरिष्ठ अमलदारांनीं मनावर घेतली पाहिजे.

---

अलिकडच्या प्राथमिक शिक्षणा संबंधानें लोकांचा एक मोठा आक्षेप आहे. तो असा कीं शाळेंत मुलें जातात आणि चार पांच वर्षें शाळेच्या मार्गांत रुळलीं ह्मणजे त्यांस ऊन सहन होत नाहीं, शेतांतलें काम करण्याला त्यांला मोठीं लाज वाटते आणि निव्वळ र ट फ च्या शिक्षणानें देखील मुलें आपल्या वाडवडिलांच्या शेतीच्या धंद्याना अधिक अपात्र व अयोग्य होतात. हा आक्षेप कांहीं खोटा नाहीं; आणि तो मध्यम प्रतीच्या शिक्षणाला व तसाच उच्च शिक्षणाला विशेष लागूं पडतो शिक्षणक्रमांतच पुष्कळशा चुका आहेत. लिहितां वाचतां येणें व साधारण व्यावहारिकार्थंतचें गणित येणें इतक्याच गोष्टी प्रथम पाहिजे असतात. इतिहास, भूगोल, व्याकरण इत्यादि विषयांचा जो मोठा वर्षाव होत असतो तितका पुष्कळशा मुलांस नको असतो. त्या शिवाय शाळेंतील एक सारख्या बैठकीनें व थंड छायेच्या इमारतींत सर्व काल गेल्यामुळें शेतकामाची आवड रहात नाहीं. हा आक्षेप दूर करण्याला एक उपाय असा दिसतो कीं ज्या मुलांस पुष्कळशी विद्या करावयाची नसेल त्यांस दररोज शेतकामालाही लावण्यांत यावें. शेतकामाकडे त्यांस रोज कांहीं तास पाठविण्यात यावें ह्मणजे हल्लींच्या शिक्षणातील एक दोष नाहींसा होईल. असें करण्यासाठीं प्राथमिक शिक्षणाचा काळ वढविण्यात आला तरी हरकत नाहीं.

प्रस्तुतच्या प्राथमिक शिक्षणक्रमांत दारी एक सुधारणा अशी पाहिजे कीं मुलांस पुष्कळशा वृक्षांची व वेलींची ओळख करून दिलेली असावी. साधारण झाडांची, फूलझाडांची किंवा वेलींची देखील ओळख फार करून मुलांस नसते इतकेंच नाहीं तर प्रौढ विद्यार्थ्यांसही त्यांचे ज्ञान असल्या विषयीं आढळ होत नाहीं. ही उणीव सहजीं दूर होण्या सारखी आहे; आणि वनस्पतींच्या ज्ञानानें विद्यार्थ्यांचाही मोठा फायदा होईल. पुस्तकी ज्ञाना पेक्षां सृष्टीचें प्रत्यक्ष ज्ञान विशेष फलदायक आहे आणि तेंच ज्ञान संपादण्याची गोडी प्राथमिक शाळेंतूनच मुलांस लागली पाहिजे. वरील दोन्ही सूचना सरकार लक्षांत घेतील आणि अंशतः अंमलांत आणितील तर नवीन पिढीचा मोठा फायदा होईल. आणि या दोन्ही गोष्टी फारशा खर्चाच्या नसून मोठ्याशा भानगडीच्याही नाहींत.

रा० रा० गोपाळ रामचंद्र पिंके यांचा आयुर्दीप निमाला हें कळविण्यास मोठें दुःख वाटतें. त्यांची प्रकृति अगदीं जीर्ण व क्षीण होत चालली होती तेव्हां त्यांचा शेवटचा दिवस समीप येत चालला आहे असें त्यांच्या आप्तमित्रांस वाटूं लागलें होतें. तथापि ती दुष्ट घटका इतक्या लवकर ह्मणजे गेल्या मंगळवारीं रात्रीच येईल असा अंदाजा नव्हता. प्रकृतीला आराम मिळावा ह्मणून ते तीन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर कोकणांत जात होते. गेल्या मंगळवारींच जाण्याची तयारी होत होती, इतक्यांत त्यांच्या देहाचें अवसानहीं संपत आलें होतें. कफक्षयाची माणसें अखेरच्या आजारांत अशींच क्षणभंगुर असतात आणि तीं केव्हां राम राम ठोकतील याचा नेम नसतो. मरण समयीं त्यांचें वय ४१ वर्षांचें होतें. या प्रांतीं त्यांच्या चाकरीला नुकतीच १७ वर्षे पुरीं झालीं.

राजश्री गोपाळराव हे मूळचे सातारी जिल्ह्यांतील मायनी या गांवचे राहणार होते विद्यार्थी असतांना यांची गती संस्कृतांत चांगली होती आणि ह्मणून यांस म्याट्रीक्युलेशन परीक्षेंत नाना शंकर शेटची स्कालरशिपही मिळाली होती. पुढें यांचा कालेजांतला अभ्यास पुरा होऊन हे १८८२ त बी. ए. ची परीक्षा पसार झाले. घरची गरिबी असल्यामुळें यांस विद्याभ्यास आपल्याच जोरावर करावा लागला. आणि स्कालरशिपा व शिकवण्या मिळवून त्यांनीं बी. ए. ची मजल मोठ्या बहादरीनें पुरी केली. पुढें प्रपंचाचा बोजा यांच्याच अंगावर असल्यामुळें त्यांस चाकरीचा मार्ग धरावा लागला. यांचें संस्कृतांतील प्राविण्य पाहूनच रा० रा० विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं येथील हायस्कुलांत ७५ रुपयाच्या असिस्टंटपणावर त्यांस नेमून घेतलें. पुढें कालक्रमानें त्याचा रोजमुरा वाढत वाढत त्यांस डिपुटी इनस्पेक्टरीच्या १ ले वर्गाचा २०० रुपये पगार गेल्या एप्रिल पासून मिळूं लागला होता. हे आपल्या कुळांत चांगले कर्ते पुरुष निघाले ह्मणून त्यांच्या मुळें त्यांचे थोरले बंधुही चांगले सावरले.

बीज किंवा वाफ योग्य पात्रांत खेळती राहिली तर ती मोठीं अद्भुत कार्यें करिते पण तिला जर सुस्थळ मिळालें नाहीं तर तिची शक्ति असून नसून सारखीच होते. तद्वत् राजश्री गोपाळराव यांच्या अंगीं बुद्धीची व विद्येची जी चमक होती ती त्यांच्या शरीर दुष्टीमुळें मृतप्राय झाली. शरीराचा पिंजरा सदृढ, मजबूत व टिकाऊ नसला तर विद्येचे खेळ सर्व वृथा होतात. तरुण पदवीधर मृत होतात व मरणाला कारण त्यांची रडवी प्रकृतीच असते ह्मणून आह्मांस फार खेद वाटत असतो. राजश्री गोपाळराव वऱ्हाडात प्रथम आले तेव्हां ज्या कल्पना आह्मी केल्या होत्या त्या पुढील अनुभवानें कच्या ठरल्या असा विपलाप करावा लागतो. शाळा–मास्तरकीच्या चक्राला ते असमर्थ दिसूं लागले तेव्हां राव बहादूर श्रीराम भिकाजी जठार यांनीं त्यांस १८९२ सालीं १२५ रुपयांची डिपुटी इनस्पेक्टरी दिली; तेव्हां राजश्री गोपाळराव यांस बराच स्वस्थपणा व आराम वाटला. राजश्री गोपाळराव हे शिक्षक चांगले खरे पण शिक्षकपणाला लागणारा आवाज व धमक हीं त्यांच्या मध्यें जोरदार नव्हती. परीक्षक या नात्यानें त्यांची परीक्षणाची पद्धती चांगली असे. त्यांचे प्रश्न विद्यार्थ्यांस कसोटीला चांगले लावीत. विद्यार्थ्यांचा अभ्यास कळून येईल, त्याच्या मनाची गती कळेल व बुद्धीची वाढ दिसून येईल अशा प्रकारचे प्रश्न चांगल्या कल्पकपणानें काढलेले असत. हे बोलण्या चालण्यांत व स्नेहभावाला चांगले असत पण त्यांच्या अंगचे सद्गुण पूर्णत्वालाच पोचले नाहींत आणि प्रकृतीची चिरचिर स्वभावाला स्वैर व उद्विग्न करी ह्मणून त्यांचा चांगला लाभ जसा मिळावा तसा मिळाला नाहीं. ही त्यांच्या आयुष्याची खेदकारक गोष्ट नकारविद्यानें पुष्कळशा गोष्टी नवीन पिढीला शिकवील अशी आह्मी आपल्या मनाची समजूत घालतो.

# The Berar Samachar

MONDAY JUNE 3 1901

We have to face a severe crisis in the downfall of the agricultural population of India. There is a sad prostration of the people and it will be a long time before the people are up again from the effects of the last famine. The people do not show signs of a wonderful recuperative power and in this connection the official optimism dims our vision and fails to notice the great magnitude of the poverty that is in the midst of the people. The days of plenty are still at a long distance and the people are far backward in their return to prosperity. The famines have been a common fact of usual recurrence and the periodical starvation has become the necessary adjunct of western civilization. Droughts were as frequent in past times as they are now. The freaks of nature are beyond our anticipations but a failure of crops we shall be able to face in a bold and manly manner. We do not do our duty if we fail to do our best to prevent the terrible calamity. The work of fore—thought and prudence will alone be helpful in the matter of the prevention of the miseries of famine. The Government of India have failed in a signal manner in this important duty of preventing the recurrence of miseries. In the administration of the last famine the Government have achieved a marvel in the history of mankind. The famine—relief was organized on a grand scale of liberality and has attained the scientific precision of saving life at the minimum cost to the state. But all this victory is no safeguard when famine will appear again and the people will be awefully helpless to support themselves.

Prevention of famine or rather of the deadly miseries when a famine comes should be our first object and we doubt whether the Government have taken a tangible and decisive step in this direction. The prevention lies in ncreasing the staying power of the people. There is no solid ground for the people to stand upon. They pull on through life from hand to month. Bad luck or a little mischance is quite enough to upset their arrangement and to drive them to the days of privation. Poverty is abnormal and frightful and unless some benevolent hand interferes to help them the future is very terrible to think of.

The real solution of the question lies in adopting a policy altogether different from one in hogue. The annual drain of wealth that impoverishes the country should be curtailed as far as possible and should be reduced to a minimum point. The natural effect will be a heavy reduction in taxation and will help the people to gain a footing in material prosperity. Such a policy is the one that has been advocated by the Indian National Congress. The Bengalee interprets it in the light of Congress literature and proceeds to observe thus:—

" That policy, interpreted in words, would mean the wider employment of the people and of those who have made India their home, in the service of the country, and the fostering of the arts and industries, so that India, instead of being dependent upon other countries would not only supply her own wants but might be in a position to supply the wants of others. Such a policy would be the true remedy against the recurrence of famines; and we respectfully invite the Government of Lord Curzon to accept it. "

The Punjab Land Alienation law has got a sequel in the Bombay presidency A new bill has been introduced in the Bombay Legistlative Council. It is intended to restrict, with larger limitations, the transfers of land from the hands of the indebted holders of land into those of the money—lenders. The Government see a great danger in the growth of poverty of the people. It is due to their indebtedness and the Government are anxious to help them as far as possible. But the ways o relief are most likely to miss the mark. It is not the restrictions over the transfer of land that will remedy the growing evil but it is the direct amelioration of their material position that will enable them to fight their battle against all odds of indebtedness, famine and the exactions of the Governmental dues. The transfer of land is proposed to be hampered in Bombay and we shall not be amiss if a similar measure be apopted in this province also. The Punjab Law is a great experiment and we think that hot haste in legislation is greatly pernicious to the vested interests in land. We wish the Government all success in measures of public utility but the chances of success are against the restrictious of alienating land in a free and easy manner provided such a legislative measure be not coupled with a liberal measure of lightening the burden of taxation. In connection with the measure of relief by way of reducing the taxation on the people we have often proposed a suspension of the new rates of assessment. The new rates are crushing, and in the light of the experiences of the last famine, they are a powerful source of misery, indebtedness and poverty. The people are hardly free from the effects of famine and many of them are even unable to pay off the land—revenue. The arrears of land—revenue are being collected and those who can pay them do so with a willing heart. But those who can not afford to meet the annual demand require a large relief by actual suspensions of the present revenue. The facts of extreme poverty are vivid to the eye and the people are down with the terrors of famine. If the Government does not see their way to suspend their new rates for some future years we do not know how to satisfy a Government about the necessity of helping the people in their present condition. We are glad to learn from the Vaidarbha that some such proposals are in view of the local government and we shall be glad to see our hopes fulfilled to some extent at least.

## वऱ्हाड

हवामान— उन्हाळ्याची पराकाष्ठा झाली. पारा ११८ अंशावरही थोडा चढत असतो. घामाच्या धारा चालतात. अंगावर पुरळ येतो आणि उन्हामुळें घाबरेपणा होतो तेव्हां या प्रांताच्या उन्हाळयाची कल्पना बरोबर होत. रोगराईला अद्याप स्थळ मिळालेलें नाहीं; आणि सार्वजनिक आरोग्यही चांगलेंसें समाधानकारक नाहीं.

रा. रा. वामन गणेश देशपांडे, तहशीदार, अकोट यांस मेहकरास बदलून तेथील तहशिलदार रा. रा. पांडुरंग वासुदेव भगत यांस अकोटास बदलण्यांत आलें.

हैद्राबाद डेकन

३१।५।१९०१

ताप व इनफ्लुएनझा हे पसरले आहेत. औरंगाबाद व बीड हे दोन जिल्हे खेरीज करून बाकीच्या जिल्ह्यांतून धान्याचे भाव उतरत आहेत.

काम्या भील—कुरबान हुसेनखान अमीन यांनीं वेष पालटून त्याच्याशी दोस्ती केली; आणि बीड मुक्कामीं त्याला मि. स्टिव्हेन्स सुपरिंटेंडेंट यांच्या स्वाधीन केलें. तो हल्लीं बेडींत आहे.

काढून दिलें—मौलवी सैय्यद्अली हसन नाझिम. इ. बंदोबस्त व नबाब इमाद नवाझजंग बहादूर, करोडगिरीचे कमिशनर व राजे श्रीनिवासराव या त्रिवर्गांवर निजाम सरकारची इतराजी होऊन त्यांस शहरांतून हद्दपार करण्यांत आलें आणि हे तिघेही गृहस्थ अनुक्रमें इटावा, पुणें व तांडूर जवळील जहागीर येथें निघून गेले.

परत जाणार– मौलवी महंमद निजामुद्दीन हसनखान बी. ए. बी. एल. जज्ज, हायकोर्ट, हैदराबाद हे आपली मुदत संपतांच परत वऱ्हाडांत डिपुटी कमिशनरचे जागीं जाणार आहेत. त्यांची मुदत वाढविण्या विषयीं निजाम सरकार दुसरी दरखास्त करणार नाहींत.

चीफ जस्टिस मौलवी मीर अफझल हुसेन साहेब हे फर्लो रजेवर जाणार असून त्यांच्या जागीं मौलवी महंमद यासीनखान साहेब यांची बढती होणार आहे.

बिदागी– सर्जन कर्नल लारी हे आपल्या मुलीसह विलायतेस पेनशन घेऊन गेले. त्यांचा नांवलौकिक फार मोठा आहे. त्यांच्या जागीं डाक्टर ग्यामलेड हे रेसिडेन्सी सर्जन होतील.

दुखापत– तिसरे सालरजंग नबाब मीर युसफ अल्लीखान बहादूर हे घोड्यावरून पडून त्यांचा डावा हात दुखावला होता पण तो आतां बरा आहे.

## वर्तमानसार

पण येथें एक चाकू कात्र्या यांचा कारखाना आहे, सामान चांगलें असतें ह्मणतात.

फ्रान्समध्यें एक नवीन तऱ्हेची बंदूक व तोफ तयार करण्याचें काम गुप्तपणें चाललें होतें, तें जर्मनींत फोडण्याबद्दल कांहीं इसम पकडण्यांत आले आहे. अगदीं थोड्या वेळांत आपल्या बांधवांचे पुष्कळसे प्राण एकदम घेतां यावेत अशा तऱ्हेची युक्ति आपल्यासच कळावी असें फ्रान्सला वाटलेलें दिसतें!

महाराणीचें स्मारक ह्मणून कानडा सरकार राष्ट्रीय पदार्थ संग्रहालय करणार आहे.

दारूच्या व्यापारांत नफा मिळविणें स्वीडन व नारवे येथील लोक गुन्हा समजतात. दारू ही त्यांस इतकी पवित्र गोष्ट व अवर्ज्य वस्तु वाटते!

इंग्लंडांत दर सहा बायकांत एक आपला उदरनिर्वाह स्वतःच्या मेहनतीवर करते.

पोर्तुगालची राणी आपल्या टोप्या स्वतःच करते. व रफूचें कामही तिला येतें.

पानावर राहिलेलें पक्वान्न चांगली पुडी करून घरीं नेण्याची चाल जपानांत आहे ह्मणतात. आमच्या इकडे अट्टल आगांतूक मात्र असें करतात. लाडू गडव्यांत घालून आणण्या सारखाच हा जपानी प्रकार आहे.

सेडनमध्यें कवड्या खेरीज दुसरें कोणतेंच नाणें चालत नाहीं ह्मणतात.

लंडन येथें सेन्ट पॉल्स क्याथेड्रलमध्यें मुंबईचे बिशप राइट रेव्हरेंड मॅक्आर्थर डी. डी. यांनीं एक व्याख्यान दिलें व सांगितलें कीं हिंदुस्थानास पूर्णपणें राष्ट्रीयत्व येण्यास सर्व हिंदुस्थान ख्रिश्चन झाले पाहिजे. बिशप साहेब एक वेडे तरी असतील किंवा लबाड तरी असतील! दे. से.

गमतीचें झाड– दक्षिण ट्रान्सवालांत एक झाड आहे त्यांतून नेहमीं गोंद निघत असतो. त्या गोंदास वारा लागतांच त्यांतून गाण्याचा आवाज निघतो, व ते आवाज निरनिराळ्या प्रकारचे असतात. या झाडांतून गायनाचा ध्वनी निघतांच वलंदेज गायन रंगांत दंग झाले आहेत असें समजून ब्रिटिश शिपाई तेथें हल्ला नेतात व शेवटीं फसतात. अशीं गायन करून फसविणारी झाडें ही तिकडे बरीच आहेत.

अमेरिकेंत एका शिकाऱ्यानें एक मोठा अजगर मारला. त्याची लांबी १०५ फूट व जाडी १० फूट होती. यानें एक हैस गिळली असल्यानें त्यास सहज मारतां आलें. नाहीं तर हा शिकारीही त्याच्या भक्ष्यस्थानीं सहज पडला असता.

कराचीस प्लेगच्या भयानें, एका सावकारानें आपली सर्व रोकड शिल्लक भिंतींत पुरून ठेवून तो शहराबाहेर राहण्यास गेला असतां, एका चोरानें पाळत ठेवून, ती भिंत पाडून टाकून, तींतील ४६ हजार रुपये तो घेऊन गेला.

अहमदनगरास आलेले बोअर कैदी तेथें क्रिकेटचा खेळ खेळूं लागले. या खेळांत सुद्धां हार जात नाहींत. शाबास!

माथेरान येथें गारांची वृष्टी झाली. एक एक गार कोंबडीच्या अंड्या एवढी होती ह्मणतात.

निजाम साहेबांनी हैद्राबाद येथें मुशी नदीवर ११ लक्ष रुपये खर्चकरून एक नवीन पूल बांधिला आहे.

टर्कीमध्यें एक नवी संस्था स्थापन झाली असून या संस्थेचा हेतु पृथ्वीतील सर्व स्थळीं मुसलमान लोकांत अंतःप्रीति वाढविण्याचा व त्यांची एकी करण्याचा असल्याचें समजतें.

जुनी पेटी उघडणार–शंभर वर्षां मागचे रशियाचे झार पॉल यांनीं एक लोखंडी पेटी बंद करून ठेविली आहे आणि सदहू पेटी १९०१ सालींच उघडावी असें तिजवर त्यांनीं लिहून ठेविलें आहे त्याप्रमाणें यंदा हल्लींचे झार साहेब सदर पेटी मुद्दाम उघडून तिजमधले महत्वाचे कागदपत्र काय आहेत याची तपासणी करणार आहेत असें प्रसिद्ध झालें आहे.

एका जर्मन मनुष्यानें पाण्यावरून व बर्फावरून झपाट्यानें चालत जाणारी आगबोट तयार केली आहे.

पंजाब प्रांतांतील जंगलांत गोड डीक येणारी पुष्कळ झाडें आहेत. ह्या डिकाचा चोकोलेट आणि मेवा चांगला होईल असें ह्मणतात.

नवीन तारा–आकुंचन व प्रसरण पावणारा रंगीबेरंगी एक तारा एडिनबर्ग येथील एका खगोलशास्त्रज्ञानें शोधून काढला असून त्या संबंधानें त्याचे जास्त शोध हल्लीं सुरूं आहेत.

पॅरिस प्रदर्शनांत एक मोठी घांट आली होती, तिची लांबी १३८ फूट व रुंदी ४६ फूट होती.

विलायतेंत सर हेनरी आरविंग या नांवाचे एक नाट्यकलानिपुण गृहस्थ आहेत. ते अभिनय उत्तम प्रकारचा करतात अशी त्यांची ख्याति आहे. गोळी लागली ह्मणजे मनुष्य कसा तडफडून मरतो, तें पाहण्यासाठीं हे गृहस्थ मुद्दाम लढाईच्या ठिकाणीं गेले होते, आणि त्यांनीं तेथील प्रकार पाहून त्याप्रमाणें गोळी लागून मरणाऱ्याचा अभिनय करून दाखवून सर्व प्रेक्षकांस चकित करून सोडलें! या कुशल नटाची दर महिन्याची कमीत कमी प्राप्ति लाख रुपये पर्यंत आहे ह्मणतात.

मनुष्याच्या तोंडांत जसे कृत्रिम दांत बसवितात, तसें जनावरांच्याहि तोंडांत हल्लीं कृत्रिम दांत बसवूं लागले आहेत. व त्या दांतांनीं जनावरांस चांगलें चावतां येतें.

झाडासाठीं दवाखाना:– पारिस शहरांत एका धनिक पण शोधक गृहस्थानें, झाडें बरीं करण्या करितां दवाखाना घातला आहे त्या ठिकाणीं रोगट झाडांच्या कुंड्या नेऊन त्या उपायांनीं बऱ्या करून मालकास परत देण्यांत येतात!

अल्युमिनिअम धातूची मांडीं हल्लीं बरीच प्रचारांत येत आहेत. याचे अतिशय पातळ पत्रे करून त्यावर छापण्याचें काम कागदाप्रमाणें करतां येतें.

जर्मनींतील एका गृहस्थानें, पाण्यांतून चालून जाणाऱ्या आगबोटींत बसून उत्तर ध्रुवाचा शोध लावण्याचें योजिलें आहे. इतर वाहनें किंवा विमानें यातून तेथवर जाववत नाहीं. पाण्यावर बर्फ असतें, तेव्हां त्याच्या खालून जातां येईल अशी कल्पना निघाली आहे. वि०

पुसद २३-५-१९०१

हवामान– उष्णता व गरमी फार आहे येथें बहुतेक घरें टिनचीच आहेत ह्मणून उन्हाचा ताप अती होतो.

फंड––व्हिक्टोरिया मेमोरिअल फंडाचें काम या तालुक्यांत ता० ४ एप्रिल पासून सुरू होऊन आतां पर्यंत दीड हजारावर रक्कम गोळा झाली आहे.

बदली– येथील लोकप्रिय हास्पिटल असिस्टंट मि. माधव रामकृष्ण यांची बदली शिरपुरास होऊन त्याप्रमाणें ते तारीख १९ रोजीं येथून गेले. त्यांस नेटिव्ह जनरल लायब्ररींत सार्वजनिक पानसुपारी झाली. यांची बदली रहित होण्याकरितां प्रमुख गृहस्थांनीं वरिष्ठास विनंती केली परंतु त्यांत त्यांची निराशा झाली. वैद्यकीच्या धंद्यांत इतके मनमिळाऊ व परोपकारी गृहस्थ फार थोडे सापडतात व यामुळेंच हे गृहस्थ लहानापासून थोरांपर्यंत सारखे प्रिय झाले होते.

तार आफीस–– येथें तार आफिस होण्याची सुवार्ता आली आहे. तारेची अवश्यकता अशा दूरच्या महत्वाच्या ठिकाणीं फार आहे. ही अडचण दूर झाल्यास व्यापारी लोकांस फार सोईचें होईल.

मदत– दुष्काळ धर्मफंडांतून चालू सालाकरितां गरीब शेतकऱ्यांस बरीच मदत मिळत आहे ही आनंदाची गोष्ट होय. ही मदत लोकांस वेळेवर मिळावी ह्मणून येथील तहशिलदार सा० मि. दादी मास्तर यांनीं बरीच रक्कम बटवाडा केली आहे. व आणखी कांहीं करणार आहेत हे गृहस्थ आपलें काम फार मेहनतीनें काळजीपूर्वक करितात हें त्यांस भूषणास्पद आहे.

---

दिवाणी दावा नंबर १ क्लास १३

१९०१

अज्ञानाचें पालन करण्याचा आणि त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याचा कायदा आक्ट नंबर ८ सन १८९० यांतील कलम ११ अन्वयें नोटीस.

विद्यमान सिव्हील जडज्य साहेब बहादूर आकोले. यांचे कोर्टांत.

तुकाराम वल्लद मारुती तेली वस्ती पिंपरी गवळ्याची तालुके खामगांव. अज्ञान.

अर्ज–– अज्ञानाचे पालन करण्याबद्दल अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्याबद्दल

मनाजी वल्लद जानजी तेली वस्ती व्याळे तालुके बाळापूर अर्जदार याने असा अर्ज दिला आहे कीं, मला अज्ञानाचे पालन करण्याचे अगर त्याचे माल मिळकतीचे संरक्षण करण्या करितां दाखला मिळावा ह्मणून अर्ज केल्या वरून त्या अर्जाचे चौकशीची तारीख २२ माहे जून सन १९०१ इसवी रोजीं आकोले ठिकाणीं नेमली आहे. तर या नोटिशीनें सर्वांस असें कळविण्यांत येते कीं अर्जदारा शिवाय जे इतर नातलग मित्र, आप्त अथवा ज्यांना अज्ञानाचे बरें व्हावें अशी इच्छा असेल त्यांनीं, व सदरीं अज्ञानाचे पालन अगर त्याचे मालमत्तेचें संरक्षण करण्या करितां दाखला आपणास मिळावा असें इच्छित असतील त्यांनीं आमचे समोर सदरील तारखेस येऊन हजर व्हावें. आणि आपणास कां नेमावें अशा बद्दल जें कांहीं दाखले अगर दस्तऐवज अगर जो पुरावा असेल तो आपणास दाखला मिळण्या करितां हजर करावा.

आज तारीख ८ माहे मे सन १९०१ इसवी रोजीं आमचे सही निशीं व कोर्टाचे शिक्या निशी नोटीस दिली आहे.

R. N. Deshpande.
सिव्हील जज्ज अकोला.

---

## नोटीस

बेगमी राधिकाबाई मर्द जानकीराम चव्हाण रजपूत पाटील रहाणार बाळापूर हीस:—

मी खालीं सही करणार या नोटिशीनें असें कळवितों कीं तुह्मी माझ्या सावत्र मातोश्री आहात व आपलें पटत नसल्यामुळें वेगळे रहाता माझे तीर्थरूपास मरून सुमारें ६-७ महिने होत आले आहेत. तीर्थरूपांच्या सर्व मालमिळकतीचा मीच संपूर्ण मालक आहे व त्यांच्या पाटिलकीच्या कामावरहि मीच रुजू आहे. माझ्या वडिलांच्या नांवची बाबूळखेड येथील शेती सर्व्हे नंबर ४३, ४४, ६७, ६९, व ३१ याचें खातें बाळापूरचे तहशिलींत माझ्या नांवानें न लागतां तुमच्या नांवानें लागलें आहे तर या निकालावर मी अपील केलें आहे. त्याचा निकाल होईपर्यंत वरील शेती तुह्मी गहाण, खरेदी बक्षीस वगैरे कोणास देऊं नये. दिल्यास त्याचा जाब तुह्मास द्यावा लागेल. शिवाय कर्ज वगैरे काढल्यास मी जबाबदार नाहीं ह्मणून अगाऊ कळविलें आहे. कळावें तारीख ३१ माहे मे सन १९०१ इसवी.

सही
किसन जानकीराम पाटील बाळापूर
दस्तुर खुद्द.

---

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों डिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## ORIENTAL GOVERNMENT SECURITY LIFE ASSURANCE COMPANY LIMITED

Established 1874.

Head Office,—*BOMBAY.*

*Chief Agency for C. P. Berar & Khandesh*
Head—quarters—Nagpur, C. P.

—:0:—

FUNDS EXCEED TWO CRORES
Claims paid for over One Crore and Ten Lakhs.

———

IMMEDIATE SETTLEMENT OF CLAIMS.

If there be one thing of more importance than another in connection with Life Assurance, it is, when Claims arise, that the amount du under the Policy be paid to the Claimants at the earliest possible date. This the Directors of the "Oriental" keep well before them and act up to—treating their clients with the utmost liberality.

*Unquestionable Security*

It is not sufficient to read that a Company's Funds amount to a given sum, but it is essential to know how such Funds are invested—if in miscellaneous and risky investments or how secured.

The Funds of the 'Oriental' are invested in Government Securities and lodged with the Government Official Trustee of Bombay in terms of the Company's Trust Deed, as Security for Claims arising through decease of assured lives and endowment policies matured.

Gevernment Officers, Professional men, Tradesmen and others, by employing a portion of their annual income or profits in effecting life policies, at once create a fund equivalent to the savings of many years.

Creditors who expect the repayment of debts at some future period may protect themselves from loss by the failure of life in the intermediate period, by an assurance on the life of the debtor.

No man can be sure how long he will live, and although he may save money yet if he die early, before he has had time to save much, his wife and family may be in distress. Life Assurance is a means by which this danger is got over. Life being so uncertain, the sooner a man makes up his mind to assure his life the better. Once satisfied of the propriety of the step, do not delay. There are numerous instances in the records of the 'Oriental' where the delay of a month and less, has left the family without the intended provision.

———

Influential and energetic Agents wanted. For terms please apply to undersigned,

Prospectuses, forms, and any further information can be obtained on application to

M. De SOUZA,
CHIEF AGENT,
*for C. P. Berars & Khandesh*

---

*K. N. ESMAYAL & Co.*

शक्तीवर्धक कामोत्तेजक गोळ्या ४२ ची सीसी कीं. रु.१॥.

तापावर एग्युमीक्श्वर कीं. ॥=

वातावर नारायण तेल कीं रु. १

गजकर्णाचे अप्रतिम सोनेरी मलम किं. ४ आणे.

पानथरीवर अमोलीकगोळ्या ६० किंमत रु० १

पत्ता--खोजानूरा इस्मायल आणि कंपनी.

वर्धा. सी. पी.

---


## खरेदी करा !

### रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस

### नकली मालास भुलून पैसे खर्चू नका.

रेलवेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वाचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकाचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्रॅक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वाच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **स्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती ताच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजी पूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येते, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१२लाईन ओपनफेस ....................४०
१९ ,, हंटिंग....................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ............२५०

### मेटलचें तीन वर्ष ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट ११ लाईन एक्स्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेंकंद कांट्यासह............१०
१९ ,, मध्यभागी सेकंद कांटा असलेल ................१२
१९ ,, हाफ् हंटिंगचें................२०
१९ ,, हंटिंगचें ....................२०
१४ ,, रिस्ट वॉच ..................२०

### इनॅमल्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस...........२०
१९ ,, हंटिंग......................२०
१४ ,, रिस्टवॉच....................२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ...........३०
१४ ,, हंटिंग........................३५
१८ व १९ ,, ओपनफेस...........३०
१९ ,, सेंकद कांट्यासह,...........३२
१९ ,, मध्यमार्गी सेंकद कांटा असलेलें ................३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ..................... ४५

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**

ओरिजनल निनीग्रन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.

९ हार्नबी रोड, मुंबई.

---

ॐ नमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली आमच्या खात्रीच्या औषधांचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यास कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक. मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारावर या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मी संबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय पांडुरोग, मुलाची खरजीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूल, मूळव्याधी. वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरें होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरण शक्ति भरपूर वाढून धातु व रक्त याची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागते. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकिटां मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहे.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ गो० | १ रु० | ७५ गो० | २ रु० |
| ११५ गो० | ३ रु० | १६५ गो० | ४ रु० |
| २७५ गो० | ६ रु० | ५५० गो० | १० रु० |

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंतस्थ रसायनें धातूचीं भस्में पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाच मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं टपाल खर्च बेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना—अलिकडे २।३। वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळयांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरी शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचीच औषधें खालील बिनचूक सहीं पत्यावरच मागवावी.

'पत्ता-कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी

---

## जाहिरात

गीताभाष्य. पूर्ण तयार, मराठी भाषांतर व विस्तृत स्पष्टीकरण यांसह. पाडव्यापर्यंतच किंमत रुपये १०

श्रीमच्छंकराचार्यांचें शारीरभाष्य मराठी भाषांतर व विवेचन यांसह. मार्चपासून मासिक पु. द्वारें निघेल. गीताभाष्यापेक्षा तिप्पट. ३ वर्षांत संपेल. वर्षाची अ. व. ५८६ पहिल्या २०० ग्राहकांस बालकांड व योगवासिष्ठवैराग्यप्रकरण हे ३ रु. किंमतीचे उत्कृष्ट ग्रंथ सं. मा. सह बक्षिस.

का० वा० लेले वाई

## मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईलः—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या १ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh, एजंट

---

अति स्वस्त ! **ज्ञानविलास** अति स्वस्त !!

हें अत्यंत चटकदार व लोक प्रिय मासिक पुस्तक पोस्टेजसह अवघ्या १२ आण्यांत मिळून, शिवाय प्रत्येक वर्षारंभी युउपक्त माहितीची सर्वोत्कृष्ट डायरी बक्षीस मिळते. वरा करा आणि अंक रोखीनें किंवा व्ही० पी० नें मागवा.

पत्ता—संपादक, ज्ञानविलास
खणदाळ प्रो गडइंग्लज.
इ० कोल्हापूर.

---

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दातो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुश्क कदर करती हो ।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ।।-

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वच्छ व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला

पत्ता— नंदलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कंम्पनी मथुरा.

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेरावफडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८८
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस........८१ ०६
दुसरे खेपेस .... ......८१

REGISTERED N. No. 4

Six monthly........ 3 .............. 8 as
Single copy .........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...3 as


# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR


VOLXXXV AKOLA MONDAY 10 JUNE 1901 NO 22

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १० माह जून सन १९०१ इ० अंक २२


## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

## जाहिरात

छापत आहे! छापत आहे!!

(पुस्तकें जुलै अखेर तयार होतील.)

"नरवीर पृथ्वीराज चव्हाणाच्या पराक्रमांचें, स्वदेशधर्मसंरक्षणाचें, आणि खऱ्या जात्याभिमानाचें उत्तम द्योतक"

(रामचंद्र यशवंत केसकर कृत.)

वीरांगना राणी

"संयोगिता."

अथवा

आर्यभूमीच्या पारतंत्र्याचा प्रारंभ.

---

एक वीररसप्रधान ऐतिहासिक नाटक
किंमत १२ आणे.
परंतु
३१ जुलै १९०१ चे पूर्वी नांव रजिस्टर करणारास फक्त आठ आणे पडतील

म्यानेजर,
'प्रमोदसिंधु' प्रेस.
उमरावती (वऱ्हाड)

---

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई दरदम ।।।- ची घेणारास रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ८।२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकांस खात्रीनें मिळेल. शाई मागविणाराशी ट. ह. सह ८।४ ची मनिआडर पोंचतांच त्याचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नंबरी नांव नोंदले असेल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता--एम. जी. तुपे, पेठ गणेश घर नंबर ३३ पुणे.

---

## नोटीस

भाऊ भगवान जैन सिपी मुक्काम मौजे सागवन यांसः—

खालीं सही करणार इजकडून नोटिसीनें कळविण्यांत येते कीं तुमचा व माझा आपले हिंदु धर्माप्रमाणें सशास्त्र विवाह होऊन आज पांच वर्षें होऊन गेली लग्न झाल्यापासून तुह्मी मला फक्त एक दोन वेळाच काय ते आपले घरी नेले होते. आज ४ वर्षे होऊन गेली तुह्मी मला अजिबात टाकून दिले. तेव्हांपासून आज पावेतो दोन दुष्काळ गेले. माझी आजवर खाण्यापिण्याची किंवा कोणतेच प्रकारची घेऊन जाण्याची वगैरे कांहींएक सोय, मी व माझे बापानें तुह्मास निरोप पाठविले असतांही, केली नाहीं. त्यामुळें मी सावकारापासून कर्ज काढून तुमचे व माझे नावलौकिकास योग्य असे आचरण ठेऊन उदरनिर्वाह केला. त्याचे मला ४२७।।= देणें झालें आहे. दुष्काळाचे पूर्वी पासून मी व माझे बापानें मला नेऊन माझी योग्य व्यवस्था करण्याचें संबंधानें बरेच वेळां निरोप व पत्रें पाठविली परंतु तुह्मी येऊन माझी कांहींच सोय केली नाहीं. अखेर माझा चुलता माझे बापानें तुमचे कडेस पाठविला; आज पंधरा दिवस होऊन गेले तुह्मी येथें येऊन आपले जातीचे व इतर पंचांचे समक्ष पंचाचे मता प्रमाणें माझी व्यवस्था करण्याचे कबूल केले व त्याच दिवशी रात्रीं तुह्मी मला किंवा कोणासही न कळवितां केव्हां निघून गेलात ते सुद्धां तुह्मी माहीत केले नाहीं. त्या उपरांत मी आजवर तुमची येण्याची वाट पाहिली व पुन्हा निरोपही पाठविले. अखेर तुह्मी येऊन माझे संसाराची योग्य व्यवस्था कराल अशाबद्दल माझी आता पूर्ण खात्रीलायक निराशा झाली आहे ह्मणून तुह्मांस मुद्दाम ही नोटीस देण्यांत आली आहे. तर तुह्मी ही नोटीस पावल्यापासून ८ दिवसाचे आंत येथें येऊन पंचाचे मताप्रमाणें माझी व वरील माझ्या देण्याची अदाई करण्याची व्यवस्था करावी. यात लिहिल्या प्रमाणें तुह्मी न केल्यास ही नोटीसच मी फारकती समजून मी दुसरा गंधर्वाचा नवरा करून संसार करीन मग तुमचा नवरेपणाचा किंवा कोणतेही प्रकारचा हक्क मजवर कांहींएक राहणार नाहीं व या नोटीसीचे खर्चासुद्धां वरील देण्याची फेड कोर्ट मार्फत तुमचेकडून केली जाईल. हे खूब समजावे.

सही
नबी मर्द भाऊ सिंपी हल्ली
मुक्काम कसबे देऊळघाट द-
स्तूर केशव शंकर जैन
देऊळघाट ता. चि-
खली जि. बुलठाणा

---

## नोटीस

कमळजी मर्द श्रावण व जैराम वल्लद भगवान कोळी राहणार पातोंडे पोष्ट-दहिहंडा तालुका आकोट यांसः—

गणपती वल्लद मक्कमजी जात कोळी राहणार मौजे पातोंड तालुका आकोट यांजकडून.

तुमचे नोटिशीचा जबाब खाली लिहिले प्रमाणे आहेः— मौजे पातुंडे तालुका अकोट येथील शेत सर्वे नंबर ८४ पैकीं याचें खातें कमळजा इच्या नांवानें असून ती व जैराम वल्लद भगवान असे उभयतां दीर भावजयीनें मजला सदरील नंबर रक्कम रुपये ३०० तीनशांस खरिदी दिलेले बद्दल मागील तुमचे कडेस आमचे रुपये २९२ हिशोबानें चार लोकांचे समक्ष निघाले आणि सदरील ३०० रुपयाचे भरतीला लागणारे रुपये ४८ रोख देऊन एकंदर वसूल रकमेचा भरणा पावल्याबद्दल तुह्मी मेहेरबान सब रजिष्ट्रार दहिहांडा तालुका आकोट यांचे समक्ष कबूल केलें आणि त्या भरण्याबद्दल खरिदी करून दिल्याचेही कबूल केलें. आणि त्या नंतर ह्मणजे १८९९ व १९०० या दोन वर्षांपासून सदरील जमीन माझ्याच ताब्यांत व कबज्यात आलेली आहे. तुह्मी मजला जी नोटीस दिली तींतील मजकूर खोटा आहे; आणि असा खोटा मजकूर छापून माझ्या अब्रूला कमीपणा आणणारी गोष्ट तुह्मी केली. या विषयींचा जबाब तुमचा योग्य कोर्टात घेण्याची तजवीज मी करीन, आणि तसेंच दस्ताऐवजा संबंधानेंही तुह्मावर दिवाणींत फिर्याद करणें भाग झालें आहे. तुमचा हक्कसंबंध मजशी किंवा जमिनिशी कांहीं राहिलेला नाहीं. तुह्मी शेतांतील मालाला किंवा माझ्या वहिवाटीला हरकत कराल तर त्या दांडगाईच्या व जबरदस्तीच्या वर्तनाबद्दल तुह्मावर फौजदारी होईल आणि माझ्या जीवाला धोका पोंचणारें कांहीं कृत्य कराल तर ती गोष्ट तुह्माला मोठी जड जाईल. दिवाणी कोर्ट खुलें आहे. तेथें जाऊन तुह्मी माझ्या विरुद्ध जी काय दाद मागणें असेल ती मागावी. पण दांडगाईचे गैरवर्तन करूं नये. या नोटिशीचा खर्च व तुमच्या गैरगोष्टीमुळें होणारे इतर नुकसान तुह्माकडून भरून घेतलें जाईल कळावें. तारीख ४ माहे जून १९०१ इसवी.

(सही)
गणपती वल्लद मक्कमजी जात कोळी
राहणार मौजे पातोंडे
तालुका आकोट द०
खुद्द.

---

## नोटीस

नोटीस कमळु मर्द नारायण सावत राहणार आमनी बु० ता० पुसद यांसः-

खाली सही करणार याज कडून नोटीस दिली जात आहे कीं मौजे मजकूर येथील स० नंबर १४ चे शेत मजला तुह्मी सुमारे ७ महिने झाले. मोरथ मापी जवारी खंडी २ ची किंमत ठरवून विकत दिले व त्यावरून शेताचे खाते आमचे नांवे करून दिले हे शेत शामाजी पतकी माहागांवकर याजपाशीं मोरथ मापी जवारी मण २४ वर गाहाण असले वरून तो माल देणेचा आह्मी हवाला घेऊन बाकीचा माल तुमचा आमचे जवळ घरवर असलेला नोटीस पावले पासून ८ दिवसांत न्यावा. न न्याल तर भाव कमी झालेमुळें नुकसान किंवा वाट मिळणार नाहीं. उलट जागेचे भाडे दरमाहा ।।- प्रमाणें घेतले जाईल. तारीख ४।६।१९०१ इसवी. दस्तुर देवराव उ०

सहीची निशाणी रेघ
यादव वल्लद दारकोजी राहणार
आमनी बुजरूक याचे
हातची असे.

---

## नोटीस

नोटीस शामजी रामजी पतकी माहागांव तालुके पुसद यासः—

खाली सही करणार याजकडून नोटीस दिली जाते कीं मौजे आमनी बुजरूख येथील सर्व्हे नंबर १४ चे शेत कमळु मर्द नारायण इनें मोरथ मापी जवारी मण २४ करिता तुमचे पाशी गाहाण ठेविले असून सदरील शेत खरिदीचे वेळेस सदरील माल तुह्माम देण्याचा आह्मी हवाला घेतल[illegible]
माल आमचे पाशी घरवर [illegible]
पर्यंत तुह्मी नेला नाहीं तो मा[illegible]
दिवसापासून ८ दिवसांत न्य[illegible]

भाव कमी झालेमुळें नुकसान किंवा वाढ मिळणार नाहीं. उलट दरमहा रुपया १ भाडे घेऊ. ह्या नोटीसीचे उत्तर यावे. तारीख ४।६।१९०१ दस्तुर देवराव उं०

सहीची निशाणी रेघ
यादव बल्लद दारकोजी राहणार
भामनी बुजरूक याचे
हातची असे.

वऱ्हाडसमाचार

मिती ज्येष्ठ वद्य ८ शके १८२३

## नवी जमाबंदी.

( ३ वर्षांची तहकुबी )

स्थानिक सरकारची मेहरबानी मोठीच आहे. दुष्काळामुळें झालेली दाणादाण व रयतेची निकृष्ट अवस्था हीं पाहून सरकाराला मोठी दया आली आणि नवीन जमाबंदीची सुनावणी तीन वर्षे पर्यंत तहकूब ठेवण्या विषयीं सरकारचे हुकूम सुटले आहेत हें कळविण्यास मोठा आनंद वाटतो. रयते विषयीं सरकारानें एवढी दयार्द्र दृष्टी ठेविली ही गोष्ट रयत व सरकार यांच्या मधील प्रेमभाव बहुगुणित करील. जमीन महसुलाची बाब ह्मणजे सरकारची कामधेनु होय. आणि या बाबी विषयीं सरकारची दृष्टी मोठी बारकाईची व चोकसपणाची असते. सरकार द्रव्यदृष्टी आहे. पैशाची गोष्ट असली ह्मणजे सरकार सर्वच बाजूंनीं आपली पराकाष्टा करिते. पण अशा स्वाभाविक मनोवेगाला आवरून धरून रयतेच्या आपत्तीकडे दृष्टी फेंकली ही सरकारची कृपाच होय.

पण ही कृपा नवीन जमाबंदीच्या सुनावणी संबंधानें झाली. ज्या तालुक्याला नवी दर ठरोती अद्याप लागूं करावयाची आहे त्या तालुक्यांचा वरील तीन वर्षांच्या तहकुबीनें मोठा फायदा होईल. हा फायदा कसा चमत्कारीक आहे पहा! जुना धारा कमी केला आणि रयतेची तितकीच सोडवणूक केली अशांतला हा कांहीं फायदा नाहीं. लोकांची गरिबी मोठी आहे आणि त्यांचा चरितार्थ मोठ्या कष्टानें चालतो ह्मणून सरकारानें आपल्या खजिन्यांत येणारी दरसालची रक्कम कांहींच कमी करून घेतली नाहीं. फक्त नव्या जमाबंदीचा जो आकार वाढविण्यांत आला आहे याची अंमलबजावणी मात्र तीन वर्षे व्हावयाची नाहीं असा सरकारी ठराव झाला आहे. या तहकुबीचा फायदा अकरणरूपी आहे. प्रत्यक्ष निराळा असा फायदा कांहींच नाहीं. दुष्काळानें ग्रस्त झालेल्या कांहीं तालुक्यांवर नवीन साऱ्याची गदा आदळली नाहीं ही सरकारच्या दृष्टीनें मोठीच मेहेरबानी होय. आपल्या विपत्काळांत चोरीची हानी घडली नाहीं ह्मणून जसें एखाद्या कृतज्ञ माणसानें परमेश्वराचे आभार मानावे तद्वत् सरकारानें नवी जमाबंदी तहकूब ठेविली याबद्दल रयतेनें सरकारचे आभार मानण्या सारखेंच आहे.

हल्लींच्या काळांत नवी जमाबंदी करण्याचा सरकारचा हक्क आहे. हा हक्क सारा वाढविण्याचा आहे आणि तसें करण्याला सरकारच्या दृष्टीनें पुष्कळशीं समर्थक कारणेंही स्थापित झालीं आहेत. सरकारचा हक्क व तो स्थापित करण्याचीं कारणें हीं वस्तुतः असोत किंवा नसोत, या संबंधानें वाद ह्मणून कांहीं राहिलेला नाहीं. सरकारानें आपला ठराव केला ह्मणजे रयतेच्या खऱ्या गोष्टी एकीकडे राहतात आणि राजनिष्ठेनें सर्व ठराव शिरसावंद्य करावे लागतात. सारा वाढविण्याला सबळ कारणें नाहींत अशा विषयीं सरकाराकडे पुष्कळच अर्ज रयतेनें धाडले आहेत पण त्या अर्जीपासून फायदा न होतां सरकारचा रयतेच्या काहणी विषयीं बधिरपणा मात्र वारंवार अनुभवाला आलेला आहे. भावी जमाबंदीचें आंकडे तयारच आहेत. ते आंकडे न्यायाला धरून आहेत किंवा रयतेची नागवणूक करणोर आहेत याची मीमांसा करण्याचा काल निघून गेला आहे. सरकारानें आपला ठराव केला ह्मणजे तो देवाज्ञे प्रमाणें न टळणारा असतो. अशी हट्टाची जमाबंदी दुष्काळाच्या चिरकालीन पीडेच्या विपत्कालांत तहकूब झाली हें तरी पुष्कळशा तालुक्यांचें मोठें भाग्यच होय.

हें भाग्य देखील समदृष्टीचें नसतें ह्मणून मोठा आचंबा वाटतो. जेथें दुष्काळापूर्वींच नवी सुनावणी झाली आहे ह्या तालुक्यांसारखा दुर्भागी कोणताच तालुका आढळणार नाहीं. हे तालुके ह्मणजे बुलढाणा व आकोला जिल्ह्यांतील मिळून ८ तालुके व इलिचपूर जिल्ह्यांतील दर्यापूर मिळून ९ तालुके आहेत. गेल्या दुष्काळांत आकोला व बुलढाणा हे जिल्हे फारच ग्रस्त व गांजलेले होते. या जिल्ह्यांची नादानी मोठी होती आणि येथील रयत फार दुःखी व कष्टी आहे. ही गोष्ट सरकारच्या नजरे खालीं नाहीं असें आमच्यानें ह्मणवत नाहीं. या ९ तालुक्यांसाठीं सरकारी मेहेरनजर अजून कोणत्याच स्वरूपाची दिसून आली नाहीं जी गोष्ट इतर तालुक्यांला लागू केली तीच गोष्ट अक्षरशः या तालुक्यांस लागूं होणार नाहीं. या तालुक्यांत नव्या जमाबंदीची सुनावणी होऊन वसूलही त्या प्रमाणें होऊं लागला आहे. रयतेची विपदा लक्ष्यांत घेऊन या तालुक्यांसही तीन वर्षांची माफी साऱ्याच्या वसूलासंबंधानें द्यावयाला पाहिजे होती. नवीन सारा माफ करून जुना सारा फक्त वसूल करावा असा हुकूम होणें फार अगत्याचें आहे. आमच्या विनंतीला सरकार स्थळ देईल अशी आह्मी आशा बाळगतों.

## पापाचा घडा

( प्रेमाबाईचा कोळसा )

प्रेमाबाई हें नांव फार गोड आहे पण या बाईनें आपल्या कपट करणीनें मातापितरांच्या नामाभिधानाला मोठी काळिमा आणिली. ही बाई मुंबईची ढोंगी बाई होय. इनें आपल्या अंगीं मोठेंच देवपण उसनें आणिलें होतें. इचा पुरुषार्थ जिकडे तिकडे असा पसरला कीं ही अन्नपाणी ग्रहण करीत नाहीं आणि अशा उपवासाच्या स्थितींत महिन्यांचे महिने लोटतात. ही अद्भुत शक्ती ईश्वरी अंशाची आहे आणि ती इच्या अंगीं वसत आहे अशा गोष्टीवर भरंवसा ठेवून पुष्कळसे भाविक लोक भ्रमपाशानें इच्या चरणीं माथा ठेवीत असत. मुंबईत हिची ख्याती फार वाढली पण ही उपवासाची गोष्ट संभवनीयही वाटत नसे. प्रेमाबाईला आपल्या मायावी देवपणाची घमेंड मोठी वाटूं लागली तसतसा तिच्या पापाचा घडा भरत आला. प्रेमाबाईनें माजिस्ट्रेटा समोर शपथेवर विधान केलें आणि विदित केलें कीं, अन्नपाण्याशिवाय मी राहते व ही गोष्ट खात्रीनें सिद्ध करून देण्याला मी तयार आहे. या प्रयोगांत माझ्या जीवाला धक्का पोंचला तर माझी मी जबाबदार आहे. प्रेमाबाईचे बंधु रावसाहेब मूळजी नारायण यांनींही माजिस्ट्रेटा समोर शपथेवर सर्व जबाबदारी आपल्यावर घेतली आणि तसेंच तिच्या दुसऱ्या बंधूनेंही माजिस्ट्रेटाजवळ विधान केलें.

गेल्या ३० वे तारखेस या प्रेमाबाईच्या सत्वाची परीक्षा सुरू झाली. एका मोठ्या दिवाणखान्याच्या मध्य भागीं तिच्या राहण्याची सोय करण्यांत आली. सभोंवतीं चारी बाजूंनीं पिंजऱ्या सारखी व्यवस्था होती. प्रेमाबाईजवळ एका नातलग बाईला राहूं दिलें. पुराण सांगण्याला एका ब्राह्मणाची योजना करून दिली. प्रारंभीं तिची डाक्टरांनीं तपासणी केली. या डाक्टर मध्यें मुंबईचे सर भालचंद्र प्रमुख होते. तिचें वजन ८२ रत्तल भरलें. नाडीचे ठोके व श्वासोच्छ्वासाची गती हीं नोंदण्यांत आली, तिच्यावर पाहरा ठेवण्यासाठीं युरोपिअन नर्सीस नेमल्या होत्या. या लेडी डाक्टरणी आळीपाळीनें तिच्यावर कडक नजर ठेवीत. हेतु इतकाच कीं लबाडीनें कोणी तिला अन्नपाणी पुरवूं नये. गुरुवारची दीनचर्या कशी तरी आटोपली. सायंकाळीं डाक्टरांनीं तिच्या प्रकृतीचें मान पुन्हां पाहिलें. शुक्रवारीं सकाळीं स्नान प्रेमाबाईनें केलें पण तिची तबेत फारच गळली. तिच्या अंगांतला थकवा वाढला, तिला पुराणिकाचा आवाज सहन होईना, स्वभावाची चिरचीर वाढली. तोंडावरून वस्त्र गुरफटून घेऊन ईश्वर प्रार्थनेचा डौल पुष्कळच केला. पण हात पाय ठणकूं लागले, तिनें दूध किंवा पाणी मागितलें तर तें तिला देण्याविषयीं पूर्वींच पाहऱ्यावरील डाक्टरणीला सांगून ठेवण्यांत आलें होतें. पण आपली बाणी दाखविण्या करितां तिनें दूध किंवा पाणी घेतलें नाहीं, वजन ६ रत्तल कमी भरलें. तिची दशा अगदीं गलित पत्रा प्रमाणें झाली. तिचे हातपाय दुखूं लागले ह्मणून एका डाक्टरणीनें तिचे हातपाय चेपण्याला आरंभ केला. ह्या परिचर्येच्या अवसरांत डाक्टरणीला मांडी जवळ एक टणकसा पदार्थ लागला. ही गोष्ट इतरांस कळतांच दुसरे दिवशीं स्नाना पूर्वीं तिचा झाडा घेण्याचा संकेत ठरला. ती या गोष्टीला प्रथम राजी होईना; पण हो ना चालू होतें इतक्यांत ती उभी राहिली आणि तिची कंबर उपवासानें बारीक व ढिली पडून तिच्या कंबरेतून एक गांठोडी खालीं पडली. ती उचलून पाहतात तों ती गांठोडी लहानशा आवळा एवढी गोल चपटी अशी होती. तिचें वजन ६॥ तोळे होतें. गांठ सोडून पाहतात तर आंत बदाम, खिसमिस, मार्जी, पुरी इत्यादि पदार्थांची पुरचंडी आढळली. हे पदार्थ आहारा साठीं तिनें लपवून ठेविले होते पण तिला कडक पाहऱ्याखालीं त्यांचा उपयोग करितां आला नाहीं. ही गोष्ट एवढी सांगितली ह्मणजे पुरें. पुढें हा कोळसा उगाळण्याची जरूरी दिसत नाहीं. प्रेमाबाईच्या पापाचा घडा लवकर भरला आणि तिच्या उपवासाचें गारुड उजेडांत आलें ही आनंदाची गोष्ट होय. प्रेमाबाईला तिच्या घरीं सुखरूप पोंचती करण्यांत आलें आणि येणें प्रमाणें एका प्रचंड लबाडीचा स्फोट झाला.

‘ काळा गोरा न्याय ’ ह्मणून एक नवीनच तत्व न्याय पद्धतींत उतीर्ण झालें आहे. या बहुरूपी वेषधारी तत्वाचा इंग्रजी न्याय दरबारांत प्रवेश होऊन खास उच्च पद प्राप्त झालेलें पाहून मन फार उद्विग्न होतें. ज्या इंग्रजी न्यायाचा काटा अणुरेणु इतकाहि इतस्ततः कांहीं केल्या ढळणार नाहीं अशी आमची दृढ समजूत ती हलके हलके बरलत जाऊं लागली आहे. प्रथमारंभीं जेव्हां आह्मी आमचे जीव घेऊन इंग्रजी शितल साम्राज्याच्या छत्रा खालीं आलों तेव्हां पासून इंग्रजांच्या उदारमनानें, दयाळु अंतःकरणानें आणि निःपक्षपात न्यायबुद्धीनें आह्मांस अगदीं वश करून टाकलें. पण अलीकडे ह्या त्रैगुण्य वशीकरण मात्रेच्या क्रियेंत कांहीं अजाण, हट्टी, व मूर्ख वैद्यांच्या अज्ञानामुळें भलतीच हलकट द्रव्यांची भेसळ होऊन त्या त्रिभुवन कीर्तीच्या मात्रेचे गुणांत माती पडूं लागली आहे. आणि ह्यामुळें इंग्रजी न्यायीपणावर व दयेवर जो आमचा परिपूर्ण विश्वास, ह्या विश्वासाचा घात करणारी कांहीं मंडळी उत्पन्न होऊं लागली आहे. ह्या सर्वस्व विश्वासवृक्षाचीं कटू फळें आह्मांसच चाखावी लागतील असें आमच्या स्वप्नींहि आलें नाहीं, नाहीं तर ह्या वृक्षाचें रोपटें पूर्वींच उपटून फेंकून दिलें असतें. पण हा महावृक्ष उलथून, कडाडून पाडून, कापून टाकण्याची जी काळी गोरी कुऱ्हाड सांपडली आहे तिचा वेळींच कीस कीस करून टाकला पाहिजे. नाहीं तर हीच कुऱ्हाड इंग्रजी साम्राज्याच्या बुंध्यावर पडेल.

हिंदुस्थानांतील इंग्रजी राज्याच्या परमराटीचा मूळ पाया इंग्रजी न्यायीपणावर जो आमचा विश्वास त्यावर आहे. व ह्याचु

विश्वास उडवून देण्याच्या तयारीनें सर्वत्र झंझावात वाहूं लागेल तर इंग्रजी राज्य ढासळून या खालीं किती जणांचा चुराडा होईल हें सांगणें कठीण आहे. ह्या प्रजाद्रोहाच्या महारोगावर रामबाण औषधी देऊन ह्या रोगाचा संसर्ग दुसरीकडे न जाण्याचा बंदोबस्त सरकारनें करावा अशी एकसारखी इशारत देण्याचें आमचें काम आहों करितों. याउप्पर सरकार डोळेझांक करील असें आह्मांस वाटत नाहीं.

अलीकडे गोऱ्या लोकांनीं काळ्या लोकांचे जीव घेतले तरी त्यांस इंग्रजी काटेकोर न्यायदरबारीं योग्य शिक्षा होत नाहीं. गोरेगोमटे लोक न्यायदेवतेस काळ्या लोकांपेक्षां जास्त प्रीय आहेत. व आपल्या लाडक्यांची बाजू घेऊन दुसऱ्यांचा दुःस्वास करण्याची सवय तिला जडत चालली आहे. न्यायदेवीच स्नेहातिशयामुळें मुद्दाम डोळे मिटून घेऊन आधळ्या प्रमाणें वावरूं लागली तर न्यायानें कोणाच्या तोंडाकडे पहावें बरें ? खरोखर न्यायदरबारीं भेदाभेद व पक्षपात यांस मज्जावच असली पाहिजे. एकाच वजनमापानें सर्वांच्या कृत्याचें वजनमाप झालें पाहिजे. एकाच कसोटीवर सर्वांच्या गुणावगुणांची परीक्षा केली पाहिजे. सारांश एकाच न्याय तत्ववर बक्षीस, शिक्षा व दंड यांची वाटणी झाली पाहिजे. आणि जों पर्यंत न्यायासनाच्या पुण्यपवित्र पदास नीच व दुष्ट गोष्टींचा होत असलेला स्पर्श व विटाळ नाहींसा होऊन तें निष्कलंक होणार नाहीं तों पर्यंत हें काळेंगोरें तत्व काय अनर्थ करील हें ईश्वर जाणें.

इंग्रजी न्याय पद्धतींचें मुख्य बीज ह्मटलें ह्मणजे निरपराध्यास शिक्षा होतां कामा नये हें होय. सच्छील जनांचा बिनाकारण छल होऊं नयें हें तत्व फार मोहक व गोड आहे यांत शंका नाहीं. पण हें एकटें तत्व न्यायाचें अर्धांग होय. ह्याची परिपूर्णता करण्या साठीं, अपराध्यास शिक्षा झालीच पाहिजे, हें अर्धतत्व ह्याला जोडलें पाहिजे. अपराधी सुटले तरी हरकत नाहीं पण निरपराध्यास शिक्षा होतां कामा नये एवढेंच अर्धें मेलें तत्व डोळ्यापुढें ठेवून न्याय करणें रास्त नाहीं. तरी पण युरोपियन लोक न्यायाच्या कोणच्या तरी तुटक्या काडीवर कसे महाअरिष्टांतूनहि पार पडतात हें लक्ष्यांत घेतलें ह्मणजे हें अर्धवट लंगडें तत्वहि बरें, असें वाटूं लागतें. नाहींतर एका खुनाबद्दल, बरोबर खुनी मनुष्य हुडकतां येत नाहीं ह्मणून, दहा खूनहि पडले तरी चिंता नाहीं अशा गोष्टी दृष्टीस पडतात. असो. अपराधी नेहमीं सबशेल व अचूक निसटून जातात हें फार वाईट आहे. अशा रीतीनें अपराध्यांस अपराध राजरोस व निर्धास्त रीतीनें करूं देण्यास उत्तेजन मिळतें, व अशा रीतीनें न्याय न्याय ह्मणतांना ढळढळीत अन्यायच होत असतो हें विसरतां कामा नये. असा अन्याय युरोपियन लोकांच्याच सुटके वेळीं बिनचूक होत असतो, हें पाहून आश्चर्य व खेद वाटतो. पण अशा काळ्यागोऱ्या प्रकरणांनीं आमचीं मनें कलुषित होऊन आपल्या अंतःकरणांत काळेंबेरें कां येणार नाहीं बरें !

अलाहाबाद हायकोर्टाचे जज्ज मि. स्ट्रॅची यांच्या मृत्यूसंबंधानें दुःखाश्रु ढाळतांना लंडनच्या पॉलमाल गॅझेटनें फारच वाणेडे व कोर्टांत प्रकर्ण गेल्यास माफी मागावयास लावणारे आरोप रा. टिळकावर केलेले आहेत हें पाहून विलायतेंतील पत्रें लिहिण्याच्या सपाट्यांत सारासार विचारास सोडून कसे बेताल होतात हें कोणाच्याही लक्षांत येईल. तें ह्मणतें "Sir Arthur Strachey displayed unexampled firmness in dealing with the seditious conspiracy in which the *notorious Tilak brothers* (?) were the most dangerous characters. &c. ह्मणजे ज्या टिळक बंधूंनीं राजद्रोही बंडांत विलक्षण कट केला त्या कटाचा बीमोड करण्यांत याच आ० स्ट्रॅची यांनीं अनुपमेय धैर्य धीमेपणा आणि हुषारी दाखविली. मुंबईच्या टाइम्सकारांनीं पदर पसरून मागितलेली कोर्टांतील माफी, ग्लोबकारांनींही त्याचप्रमाणें १०० पौंड देऊन शिवाय लंडनच्या कोर्टांत परत घेतलेली वाक्यें ह्या गोष्टीचा परिणाम तिकडे झाला नाहीं असें दिसतें.

रा. टिळकांनीं दोघांच्या डोळ्यांत जसे चांगले झणझणीत अंजन घातलें त्याप्रमाणें अशा बेताल झालेल्या पत्रकाराच्याही डोळ्यांत अंजन घालावें व नोटोरिअस (बदमास) कोण ही माहिती विलायतेंतील सर्व पत्रकारांना करून द्यावी ह्मणजे असे मूर्खपणाचे प्रकार तिकडे फारसे होणार नाहींत.

## The Berar Samachar

MONDAY JUNE 10 1901

We are thankful to the local government for postponing the declaration of the new assessments for the next three years. This is a very great favour shown by the government and it is doubly welcome to the people when this relief reaches them in a manner to enable them to regain their previous prosperity after the disastrous times of the last two famines. There is a 'frightful amount of poverty and it is a satisfaction to know that the Government have recognized the stern fact of poverty and have been very earnest and anxious to help the people to rise again to a state of competency and healthy living free from the stings of privation. The present measure relieves the people from the burden of the increase of revenue in the new rates over the old rates of the previous 30 years' duration.

The poverty of the people is a fact well—nigh within the admission of the Government. The rosy pictures of the people's prosperity will no longer dim the vision of the government. This is a great success in the cause of the people and we see greater chances of uniting the people & the Government in the sympathetic bonds of mutual help and mutual strength. Such a measure of relief is one of the elements of inspiring in the people a great confidence in the benevolence of the Government.

This postponement of the new rates cannot benefit the districts to which the new assessments are already made applicable. The condition of the people is more or less the same over the whole province and the justness of the postponement will equally necessitate a similar relief for the other portions of some of the districts to which the measure of postponement does not apply. We think that where the new rates are already declared there should be a similar suspension of the new rates in order to treat all districts on a footing of equality. We are glad that a partial redress is granted on the lines we have often indicated in requesting the Government to help the people in a substantial manner. The prayers of the people have reached the Government and we hope that a general measure of suspending the new assessments for the next 3 years will be ordered with a firm hand and a strong policy.

—:0:—

We hope that the suspension of the new assessments will not remain single by itself but will be a fore runner of similar reliefs of helping the poor people to attain to a healthy recuperative power. The spirit of fighting against all ills and odds of famine is born a—new in the people and their hardihood and fortitude command the admiration of the world at large. They deserve a helping hand in these days of misfortunes. The Government hold a parental and paramount position in India. We look to government for all sorts of reliefs. The distressing fact that hampers all efforts of self—help is the growing indebtedness of the people. They want some help by way of easy loans at a moderate rate of interest. The Takvai loan is limited to a large extent and cannot reach all people who want money to square off their previous accounts with the money—lenders and to meet their usual expenditure. The life of a peasant is a great example of a frugal, simple and industrious life. But he cannot cope with his money—lenders and wants a help from an agricultural bank instituted on the basis of the Takvai loan. It is for us to indicate our great wants and it is for the government to help the people in their hour of need. There is an attempt in the Punjab and the Bombay Presidency to legislate against a free alienation of the rayot's land. But this experiment is doomed to a signal failure because it is likely to make the people worse for the new law and to impoverish them in their present powers of borrowing loans. This effect of the new legislature will be fatal to the interests of the people and we hope that our local government will profit by the experiences of the sister governments before they launch themselves in an unprecedented measure of restricting the powers of alienation. We would suggest that the Berar Government should do their best to institute an agricultural bank and thus set a worthy example to the other provinces.

## वऱ्हाड

हवामान—- मृग नक्षत्र लागल्या दिवशीं शकुनाचे ह्मणून कांहीं थेंब पडले. व काल रात्रींही थोडा पाऊस पडला. आकाशांत ढग पुष्कळसे जमतात व गर्द छाया ही पडते. उकाडा विलक्षण होतो. रोगराई ह्मणण्या सारखी कोणतीच नाहीं. वणतेचें मान मखर आहे.

रा० रा० रंगनाथ विष्णु डोक्रस आफिशिएटींग ए० असि० कमिशनर, उमरावती यांस २ रे वर्ग माजि० चे फौजदारी आणि असिस्टंट कमिशनरचे पूर्ण मुलकी अधिकार देण्यांत आले.

रा० रा० सिताराम गोविंद व रमाकांत अंबादास यांस मेहकरच्या धर्मार्थ दवाखान्याचे कमिटीचे सभासद नेमण्यांत आलें.

गुणांचा उल्लेख— अलीशान नामदार रेसिडेंट साहेबहे मे० जे. ए. क्राफर्ड कमिशनर साहेब यांच्या संबंधानें गेल्या रेसिडेन्सी आरडर्स मध्यें प्रसिद्ध करितात कीं, साहेब बहादुरांनीं कमिशनरीचीं कामगिरी उत्कृष्ठपणें बजावली आणि गेल्या १८९९-१९०० च्या दुष्काळांत त्यांनीं उत्कृष्ठ व्यवस्था ठेविली होती आणि ती व्यवस्था ठेवतांना ह्यांनीं मोठे परिश्रम करून आपली कर्तबगारीही दाखविली. ह्या गुणाची उल्लेख वाचून सर्वजण मे० क्राफर्ड साहेबांची धन्यता गातील हें स्पष्ट आहे.

नायब तहशिलदारा मध्यें खालील प्रमाणें बदल्या करण्यांत आल्या आहेतः—

| रा. रा. | बदलीचा गांव |
|---|---|
| यशवंत रायभान | यवतमाळ |
| दत्तात्रय अंबादास | उमरावती |
| रामराव गोविंद | खामगांव |
| रामचंद्र अंबादास | मोर्शी |

## वर्तमानसार

गाढवांची संतती चांगली व्हावी म्हणून आमचे सरकार चिनी गाढवें आणणार आहे.

खेचरांच्या उत्पत्ती करितां मद्रास येथें एक कंपनी निघाली आहे.

जेथें ख्रिस्तांचें देऊळ बांधणें अवश्य आहे तेथें या कामीं खर्च करण्या करितां एका बाईनें १६०००० रुपये निराळे काढून ठेवले. स्वधर्माचा अभिमान!

हिंदुस्थानात आगकाड्याच्या पेट्या पुरविण्याचे कामी हल्लीं जपान, स्वीडन्, बेलजम, व स्ट्रेट सेटल्मेन्ट्स, या चार देशांत चढाओढ चालू आहे.

विहिरींत विष घालून युरोपियन लोक नेटिवांचे जीव घेतात अशा समजुतीवर चपरा येथील लोक युरोपियन दिसला कीं त्याचे मागें दांडकी घेऊन लागतात असें कां बरें व्हावें?

मोरोक्कोच्या सुलतानाच्या राजवाड्यांत रूळ घातलेले असून एक छोटीशी आगगाडी चालवितात व सुलतान या दालनांतून त्या दालनांत आगगाडीनें जातात.

जालंदर येथील जत लोकांस आपल्या मुलींच्या लग्नांत सरकारी अधिकाऱ्यानें ठरविलेल्या रकमेपेक्षां जास्त पैसे खर्च करण्याचा अधिकार नाहीं. दे०

निरनिराळ्या जातीच्या उत्पत्ति बद्दलचा इतिहास, भिन्न भिन्न जातीच्या लोकांची शरीराची ठेवण, उंची, धर्म, आचरण वगैरे गोष्टींची माहिती मिळविण्याचा सरकारचा विचार ठरला आहे व जे व्हालंटीयर वरील माहिती मिळवून देतील त्यांना बक्षीस देण्याला प्रत्येक इलाख्याला २-२ हजार रुपये मंजूर केले आहेत. मिळून एकंदर दीड लाख रुपये या कामासाठीं खर्च करण्याचा सरकारचा विचार आहे.

प्लेगचे संबंधानें दक्षिण भागांत हंगामी पोलीस ठेवण्यासाठीं चालू सहा माही करितां दहा हजार रुपये मंजूर केल्याचे कळते.

येवल्याचे मामलेदार रा. सा. नारो भास्कर सहस्रबुद्धे हे कचेरींत काम करीत असतांना कामाधामा संबंधानें त्यांची व हाता खालील एका कारकुनाची बरीच बोलाचाली झाली तेव्हां रावसाहेब खूब संतापले आणि त्या संतापांत यांनी आपल्या श्रीमुखांत आपणच दोन मारून घेऊन मग स्वस्थ झाले असें तेथील पत्रांत लिहिले आहे. हें फार चांगलें केलें. दुसऱ्याचे श्रीमुखांत देण्यापेक्षां आपल्याच श्रीमुखांत घेणें फार श्रेयस्कर आहे.

वेंगुर्ले तालुक्यांतील आसली गांवचा एक ब्राह्मण घेडणीशी लागू असल्याचा बोभाटा होऊन तेथें ग्रामण्य माजलें आहे. ब्राह्मण म्हणतो थोरले बाजीराव मस्तानीशीं लागू होते तर, आपण घेडणी बरोबर रत झाल्यास त्यांत काय दोष आहे? तिकडे घेडणीला तिच्या लोकांनीं जात बाटविली म्हणून वाळींत टाकलें आहे.

रायचूरचा एक ब्राह्मण व्यापारी कापूस खरेदी करितां मेटमरी गांवांत गेला. तेथें त्याला पराकाष्ठेची तृषा लागली. त्यानें पाण्याकरितां पुष्कळ खटपट केली पण त्याला पाणी मिळालें नाहीं. एक लोटाभर पाण्याला पंचवीस रुपये देण्याला तो तयार झाला होता. परंतु ब्राह्मणाचे हातचें पाणी कांहीं मिळालें नाहीं. शेवटीं तसाच त्या गांवांतून निघून दुसऱ्या गांवाला जात असतांना वाटेंत एका डबक्यांत साचलेले पाणी त्याचे दृष्टीस पडलें, तें तो प्याला आणि तेथल्या तेथेंच त्याचा प्राण गेला.

जगांत उंच पुरुष म्हटला म्हणजे लुईस वुईल किन्स नांवाचा आहे. तो मिनेसटा येथें राहतो, त्याची उंची ८ फूट ११ ½ इंच आहे!

लॉर्ड कर्झन साहेबांच्या राजीनाम्याची वदंता आली असून लॉर्ड मिलनेर हे हिंदुस्थानचे भावी अधिपति होणार असें प्रसिद्ध झालें आहे.

उंदीर धरण्याची युक्ति:— पाखरें धरण्यासाठीं शाळांस एक प्रकारचा चिकटा लावीत असतात, त्या चिकट्यानें ब्रेडपेपरचे तुकडे घोळवून ते उंदरांच्या बिळापुढें टाकून ठेवावे, म्हणजे रात्रीं बिळांतून बाहेर येतांना त्या तुकड्यांस उंदीर चिकटून लोळत पडतील.

दोन तोंडाची बकरी— ती मानेपर्यंत साधारण बकरीच्या अवयवाप्रमाणें आहे. पण दुसरे तिचे अवयव विचित्र आहेत. तिला दोन तोंडें, तीन डोळे, तीन कान आणि तीन शिंगें आहेत. दोन तोंडांत वेगळाल्या जिभा आणि दांत आहेत एकाच वेळीं ती दोन्ही तोंडांनीं खाते, ही विचित्र बकरी बोरी बंदरावरील गेइटी थिएटरच्या शेजारी 'फ्लोरेल बावर' मध्यें पाहण्यासाठीं ठेवलेली आहे. सु०

टर्कीच्या सुलतानाच्या खाशा मुदपाकखान्यांत पांच इसम त्यांच्या अन्नाची रुचि पाहण्याकरितां नेमिलेले आहेत. ते प्रत्येक वेळीं जेवणाचे सर्व पदार्थ थोडे थोडे खाऊन पाहतात व नंतर ते आपल्या यजमानाकडे पाठवितात.

मृत्यू—आम्हास अत्यंत वाईट वाटतें कीं मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी शेट लखमीदास खिमजी यांना थोडे दिवसापूर्वी मुंबई येथें देवाज्ञा झाली त्यांचे अंगी हिंमत, धैर्य व व्यवहार प्रवर्तक असे उपयुक्त गुण चांगले वसत असत, मरण समयीं त्यांचे वय ७२ वर्षांचें होते, हे जातीनें भाट्ये असून गोरगरीबाविषयीं फार कनवाळू होते,

दुसरा मृत्यू-मुसलमान जातीचे पुढारी सरदार हाजीकासम मिठ्ठा यांचा होय, मुंबईत प्लेग सुरू झाला तेव्हा स्वज्ञाती करितां त्यांनीं हास्पिटल सुरू केलें आणि प्लेगच्या वेळीं सरकारलाही बरीच मदत केली, दुष्काळाच्या वेळींही सरकारला यांची मदत झाली, डायमंड जुबलीचे वेळीं ह्यांना सरकारांतून सरदार हा किताब मिळाला होता. मुंबई शहरांत हे चीफ जस्टिस होते. अंतकाळपर्यंत यांचे हातून पांच लाखाजवळ जवळ रुपये धर्मार्थ खर्च झाला. अशा त्यांचें आत्म्यास शांति देईलच. मरणसमयीं यांचें वय ६३ वर्षांचें होतें.

मिठाचा मोठा उपयोग—अमेरिकेंतील कोणी एका डाक्टरानें असा अनुभव घेतला आहे कीं, मनुष्याच्या शरिरावर मिठाचा फारच उत्तम प्रभाव पडतो. एका पाश्चिमात्य डाक्टरानें मिठाच्या पिचकारी पासून शंभर वर्षांच्या म्हाताऱ्यास चांगली शक्ती येऊन आयुष्यवृद्धी होते असें सिद्ध करून दाखविलें आहे. त्यानें पिचकारीच्या योगानें किक्यामध्यें चेतना उत्पन्न करून दाखविली. पिचकारीपासून प्रकृतिस्वास्थ्य झाल्याचे ही कांहीं दाखले आजपाशीं आहेत.

एक जर्मन म्हणतो— रशिया विरुद्ध इंग्लंडाचा हिंदुस्थानांत फार दिवस टिकाव लागणें बरेंच कठीण आहे. उत्तर हिंदुस्थानच्या पर्वतांवर इंग्लंडाची व रशियाची शेवटीं कचगत जुंपेल, आणि डोंगरांत लढणें ब्रिटिश फौजेस फार कठीण असल्या मुळें इंग्लंडाला तेथें हात टेंकावे लागतील. इंग्लिश सोल्जरांस आपली मिजास संभाळतानांच पुरे होतें. ती मिजास डोंगरी लढाईत कांहींएक उपयोगाची नाहीं. तें अवसान व काटकपणा रशियन सोल्जरांत असल्यामुळें डोंगरी लढाईत तेच जिंकतील.

एका तरुण फ्रेंच माणसानें आपलें लग्न सोडत काढून करण्याचें ठरविलें आहे. एका तिकिटाची किंमत १ पौंड ठरवून २५,००० तिकिटें काढलीं आहेत. हीं सर्व तिकिटें त्याच्याशीं लग्न करावयास तयार असणाऱ्या स्त्रियांनीं घ्यावयाची आणि जिचा नंबर निघेल तिच्याशीं लग्न लावावयाचें असें त्यानें ठरविलें आहे.

केसरीत जाहिराती छापण्याचे विलक्षण दर—"तुमचें कार्ड पोंचलें. तुमची जाहिरात पाऊण कालमाची आहे. ती आमचे पत्रांत घालावयाची असेल तर प्रत्येक आठवड्याला नऊ रुपये या प्रमाणें आमच्या बावन आठवड्याचे ४६८ रु. पडतील. व जाहिरात घेण्याचे अगोदर प्रथमारंभी निमे पैसे म्हणजे २३४ रु. पाठविल्यांत जाहिरात सुरू केली जाईल. पुढें तीन महिन्यांनीं बाकी राहिलेली निमी रकम म्हणजे २३४ रु. पाठवून द्यावी या प्रमाणें शर्त तुम्हास कबूल असल्यास जाहिरात पाठवावी."

पर्जन्ययोग— मुरुड येथील ज्योतिषी रा० रा० नारायण त्रिंबक जोशी यांणी आपल्या ज्योतिषाधारें पर्जन्यविचार करून असें वर्तविले आहे कीं—ज्ये० कृ० २ ला अल्पशी वृष्टि होईल, कायची सुरुवात उत्तर दिशेनें मोठा वारा येऊन ज्येष्ठ कृ० ९ इंदुवार या दिवसापासून होईल. पुनर्वसु, पुष्य, आश्लेषा, पूर्वा आणि हस्त ह्या नक्षत्रांचा पाऊस उत्तम पडेल. बाकी ४ नक्षत्रें मध्यम पडतील. अनुभव काय येतो तो पहावा.


नोटीस

रा० रा० हिंमतराव नरसिंगदास मारवाडी राहणार कुटासा तालुके आकोट यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं मौजे कुटास येथील शेत सर्वे नंबर ३३९ एकर गुंठे २३८३७ आकार ९२८।३=३ हें शेत तुम्हांस रकम रुपये ४०० मध्यें ताबेगहाण लिहून दिलें ताबेगहाणखत लिहिले त्याचे वेळीं तोंडी असा करार झाला कीं सदहू शेत माझे ताब्यांत ठेऊन फक्त तुम्हांस व्याजा ऐवजी ९६ रुपये दर वर्षी चैत्र महिन्यांत देत जावें आणि त्या करारा प्रमाणें आज अन मास २ दोन वर्षें झाली वरील तोंडी करारा प्रमाणें वहिवाट सुरू आहे आतां साल मजकुरी माझे ऐकण्यांत असें आलें आहे कीं तुम्ही वरील नंबरमध्यें माझे परवानगी शिवाय अन्यायाने ताबा घेण्यास जाणार आहा म्हणून सदहू नोटिशीनें कळविले जातें कीं तुम्ही सदहू नंबरांत जबरीनें ताबा करण्यास जाऊं नये गेल्यास त्याचा परिणाम काय होईल हें मी सांगूं शकत नाहीं व असे अन्यायाचे कृत्याबद्दल तुमचेवर फौजदारी केली जाईल व मी तुम्हास ताबा देत नाहीं ही गोष्ट निश्चित आहे. ही नोटीस दिली तारीख ८-६-१९०१

सही

माहादेव रावजी देशमुख कुटासेकर दस्तुर खुद

नोटीस

ती० रा० रा० राजेश्वरराव रंगराव देशपांडे परगणे बाळापूर यांस:—

खालीं सह्या करणार याजकडून नोटिशीनें कळविण्यांत येते कीं मौजे अडगांव तालुके खामगांव येथील जाहागिरीचे आमचे हिश्या बद्दलचे पैसे आपणा कडून कांहीं वर्षांपासून येणें आहेत. ते आम्ही अनेक वेळा मागितले असतां आपण देत नाहीं तर ही नोटीस पावले तारखेपासून आठ दिवसाचे आंत हिशोब करून आमचे पैसे द्यावेत. न दिल्यास रीतीप्रमाणें फिर्याद केली जाईल कळावें. तारीख ६ माहे जून सन १९०१ इ०

(सह्या)

१ व्यंकटराव आनंदराव देशपांडे जहागिरदार.

१ नारायण रामचंद्र देशपांडे जहागिरदार.

१ हरी कृष्ण ज्ञानराव देशपांडे परगणें बाळापूर जहागिरदार

१ विनायक भिकनराव देशपांडे बाळापूर जहागिरदार

१ पुरुषोत्तम अच्युतराव जहागिरदार अडगांव

१ श्रीनिवास अच्युतराव देशपांडे जहागिरदार अडगांव

१ रामचंद्र पांडुरंग देशपांडे जहागिरदार दस्तुर हरी कृष्ण ज्ञानराव देशपांडे

१ हणमंत गोपाळ देशपांडे बाळापूर

१ अबादास कृष्ण देशपांडे बाळापूर


☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGSTERED N. No. 4

वर्षाची आगाऊ १ हाशील ०१२
सहामाही ,, २ ,, ०८
साल अखेर ,, ७ ,, १ ०८
किरकोळ अंकास ..........................०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.......... ०१ ०६
दुसरे खेपेस ............०१

Annual in arrears 7 ,, 1 Rs 8 as
Six monthly......... 3 ............... 8 as
Single copy ........................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 17 JUNE 1901 NO 23

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख १७ माहे जून सन १९०१ इ० अंक २३

### मुंबई बँकची ठेव ठेवण्याची बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वराल रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १९ जुलै १८९८ } A. G. Watson Agent.

---

### जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ।॥। ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०१२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीसें प्रत्येकांस खात्रीनें मिळतें. शाई मागविणाराचा ट. ह. सह ०१४ ची मानआडर पेंचतांच त्यांचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नबरी नांव नोंदलें असेल त्या नंबरास आर्धांच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता:— एम. जी. तुपे. पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

---

### नोटीस

बेशमी आमनोद्दीन वल्लद सलावतद्दीन राहणार आकोला यांस:-

या नोटीसीनें कळविण्यांत येते कीं मौजे खीरपूरी बूजरूक तालुके बाळापूर येथील सरवे नं० १४ एकर गुंठे ३०३३ आकार रुपये ३-८ हे शेत आमच्या वाडवडिलापासून आमच्या ताब्यांत आहे व मालकीहि आमचीच आहे. या शेताचे खाते मात्र तुमच्या नांवानें आहे. त्या खात्याचा वर्ग करून आमचे नांवाने खाते बदलून देण्या विषयीं आह्मी तुह्मांस अनेक वेळ ह्मटले असतां अद्याप तुह्मी खाते बदलून दिलें नाहीं. आह्मी कर्णोपकर्णी असे ऐकतों कीं, तुह्मी स्वतःच्या नांवावर खाते आहे या सबबीवर सदर्हु शेताचा ताबा दांडगाईनें करण्यासाठीं खटपट करित आहां तर तुह्मास असें कळवितों कीं तुह्मी दांडगाई किंवा जबरदस्ती करून फौजदारीच्या मामल्यांत जाऊं नये. आह्मी तुह्माला शेताचा ताबा करूं देणार नाहीं. तुह्मांला जर कांहीं हक्कसंबंध वाटत असेल तर दिवाणी कोर्टाचा मार्ग खुला आहे. या नोटिशीचा खर्च व इतर नुकसान तुह्माला भरून द्यावी लागेल कळावे. तारीख ११ माहे जून सन १९०१ इसवी.

सही

सीताराम वल्लद रावजी दांदडे
वस्ती मौजे खीरपूरी बुजरूक
निशाणी वखर.

---

### नोटीस

मेहेरबान फकरुद्दीन मुल्ला मोटाभाई जिनिंग फयाक्टरी आकोले यांस:—

सलाम दिगर विनंती कीं तुह्मी वऱ्हाड-समाचार वर्तमानपत्राचे तारीख २७ माहे मे १९०१ इसवीचे अंकांत तारीख १७ माहे मे १९०१ ची नोटीस माझे व गणपतराय हरनंदरायचे नांवानें दिली ती पावली. माझे हिशाचे ओझे तुमचे जीनमध्यें आहेत ते माझे परवानगी वाचून विकण्याचा तुह्मास मुळींच अधिकार नाहीं असें असतांही आपण शनिवार तारीख ८।६।१९०१ रोजीं ते ओझे दर ४३ प्रमाणें विकल्याचे कळत आहे. वास्तविक बाजारभाव सदर्हू दिवशींच तेजीचा असून तुह्मी गणपतराय हरनंदराय याचे सांगण्या प्रमाणें विनाकारण माझें नुकसान काढण्याचे इराद्यानें माझे मालाची माझे संमती विरुद्ध बेकायदा विक्री केली हे गैर आहे. तुमचे खात्यांत माझें हिश्याचें मानानें जी रास्त रास्त रकम निघेल ती देण्यास मी तयार आहे असें तुह्मास महीत असतांही तुह्मी वर लिहिले प्रमाणें गैरकृत्य केल्याचे कळत आहे. तरी या नोटिसीनें तुह्मांस कळवितों कीं माझा माल माझे ताब्यांत ही नोटीस पावल्या पासून २४ तासाचें आंत द्यावा. अगर असे करण्यास चुकल्यास बाजारभाव दर बोज्यास तेजीच्या भावाच्या मानानें तुह्माजवळून रक्कम भरून घेईन. खाते बाकी वरून जी रक्कम रीतसीर मजकडे निघत असेल ती मी देण्यास तयार आहे ती घेऊन मजला चुकती पावती द्यावी. तुह्मी व गणपतराव हरनंदराय असे दोघे एक होऊन माझे नुकसान तुमचे इच्छेस येईल त्या प्रमाणें काढण्याचा विचार करीत आहा हे ठीक नाहीं. असो. तुह्मांस युक्त दिसेल तसे तुह्मी करावें व मला जे युक्त दिसेल तें मी करीन. कळावे ही विनंती या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल. ता. ११ जून १९०१ इ०

( सही )

दलसुखराय बालाराम
तेल्हारेवाले दस्तूर
खुद्द.

---

### नोटीस

केसरबाई मर्द धनजी मारवाडी तर्फे नंदा-वल्लद परदेसी राहणार मौजे सवंदळ तालुके आकोट यांस:—

गोविंदा वल्लद देवमण पाटील राहणार मौजे सवंदळ तालुके आकोट याजकडून:- तुह्मास व सर्वत्र लोकांस जाहीर नोटीस देतो कीं आमचा लेक नामे हरी वल्लद गोविंदा पाटील हा सुमारे १२ महिन्या पासून भ्रमिष्ट झाला आहे तर तो कोणा पासून कांहीं कर्ज वगैरे घेऊन कांहीं गहाण व खरिदी वगैरे देईल अगर कर्ज घेईल तर त्यास कोणीही देऊ नये व हल्लीं केसरबाईनें त्या लेकापासून रुपये २०० शाचे दस्तऐवज लिहून घेऊन रुपये १०० दिले आहेत. ह्या प्रमाणे केल्याचे समजलेवरून जाहीर नोटीस देतो कीं त्यास माझे हुकुमाखेरीज कर्ज वगैरे देऊ नये व तो कांहीं स्थावर जंगम माल कोणास विकत अगर गाहाण, ताबेगाहाण अगर खरिदी देईल तर तो घेऊ नये. त्याचेशी बिलकूल व्यवहार करू नये जर कोणी केला तर कोर्टांत रद्द होईल. हल्लीं केसरबाईनें केलेल्या व्यापारा बद्दल ही नोटीस पावल्या पासून ८ आठ दिवसाचे आंत एकंदर दस्तऐवज चार संभावित लोकांचे समक्ष लिहून घेतलेले दस्तऐवज देऊन निकाल करावा. पुढें जर लिहून दिलेल्या नोटिशीचे बाद कोणीही व्यवहार केल्यास माझे लेकास फसविल्या बद्दल कायदेशीर तजवीज सरकार करतील. ही नोटीस जाहीर दिली आहे तारीख १०।६।१९०१ इसवी.

सही

गोविंदा वल्लद देवमण पाटील
निशाणी वखर.

---

### नोटीस.

नोटीस कान्हुजी वल्लद भगवानजी नाईक पाटील राहणार कजबे कारल तालुके मुर्तिजापूर जिल्हा उमरावती. यांस:—

हंबीरजी वल्लद बेंडाजी गावंडे राहणार मौजे पोटी प्रगणें धामनी तालुके मंगरूळपीर जिल्हा वाशीम. यांजकडून.

नोटीस देण्यांत येते कीं मौजे मनकूर येथील शेत सर्वे नंबर एकर आकार

| सर्वे नंबर | एकर | आकार |
| --- | --- | --- |
| २ | १०२८ | १०८ |
| ९१ | १७०३० | १३ रु. |

या दोन्ही शेताचे खाते हल्लीं माझी वडील भावजई रुखमाई मर्द बापूजी ईचे नावे लागले आहे. पूर्वी वडील भाऊ बापुजी यांचे नांवें होते शेते वडिलार्जित आहेत. माझा भाऊ.बापूजी व मी असे एके ठिकाणीं राहत होतो. त्याच्या व माझ्या वाटण्या झाल्या नाहींत. हल्लीं वारीस संबंधानें दोन्ही शेत रुखमाइचे नांवे लागले आहेत व शेते मीच वहीत करीतो व माझेच ताब्यांत पूर्वी पासून आहेत.

माझी भावजई माझे घरी असून तुह्मी तिचे जावई असल्यामुळें तिजला फंद फोक दिलें तिजला तुह्मी आपले घरी कारल येथें घेऊन गेले आहा व तिचे पासून सर्वे नंबर २ चे शेत तुह्मी बक्षीस किंवा खरीदी घेणार आहा असें मजला समजले वरून तुह्मास नोटिशीनें कळवितो कीं, शेते वडिलार्जित आहेत. बापूजी माझा भाऊ व मी विभक्त झालो नाहीं. एके ठिकाणींच राहात आहो. हल्लीं भाऊ बापूजी मरण पावले वरून फक्त शेत रुखमाईचे नावे लागले आहेत. ती अन्नवस्त्राची मालकीण आहे व मी अन्नवस्त्र देण्यास राजी आहे. बक्षीस, खरिदी, गहाण वगैरे देण्यास तिजला अधिकार नाहीं व तुह्मास घेण्यासही अधिकार नाहीं करितां तुह्मास आगाऊ नोटिशीनें कळविलें आहे. तुह्मी कोणतेही प्रकारचा दस्तऐवज माझे भावजई पासून लिहून घेतल्यास तो रद्द होईल. शेतावर कोणतेही प्रकारचा बोजा तुमचा राहणार नाहीं व त्या संबंधानें मीही तुमचा जबाबदार राहणार नाहीं. कळावे, तारीख १२ माहे जून सन १९०१ इसवी. दस्तुर जैवंत रामराव उमेदवार मंगरूळपीर.

सही

निशानी हंबीरजी वल्लद बेंडाजी
गावंडे याची दस्तुर जयवंत
रामराव मंगरूळपीर.

---

### जाहीरनामा.

जाहीरनामा सर्वत्र लोकांस कळावें कीं मौजे पोटी प्रगणे धामनी तालुके मंगरूळपीर जिल्हे वाशीम येथील शेत

| सर्वे नंबर | एकर | आकार |
| --- | --- | --- |
| २ | १०२८ | १०८ |
| ९१ | १७०३० | १३ |

या दोन्ही शेताचे खाते माझा वडील भाऊ बापूजी वल्लद बेंडाजी गावंडे याचे नांवें होते माझा भाऊ मरण पावल्यामुळें शेताचें खाते माझी भावजई रुकमाई इचे नावे लागले आहे व ती आपखुषीनें कारल येथें जावई कान्हूजी व० भगवानजी पाटील याचे घरीं जाऊन राहिली आहे. शेत वडिलार्जित असून माझा भाऊ व मी एके ठिकाणीं होतो. आमच्या

वाटण्या वगैरे झाल्या नाहींत शेतें माझे ताब्यांत आहेत माझी भावजई वरील शेताचें बक्षीसपत्र, गहाणखत खरीदीखत कोणास करून देईल तर कोणी घेऊं नये कारण तिजला बक्षीस, खरीदी, गहाण देण्याचा अधिकार नाहीं. ती फक्त अन्नवस्त्राची मालकीण आहे. व ते तिजला मी देण्यास रोजी आहे. तिचे पासून कोणी कोणतेही प्रकारचा दस्तऐवज लिहून घेतल्यास त्याचा बोजा वरील शेतावर व माझे जातीवर किंवा माझे इस्टेटीवर राहणार नाहीं कळावें. तारीख १९ जून सन १९०१ इसवी. दस्तुर जयवंत रामराव उमेदवार मंगरूळपीर.

सही

निशाणी हंबीरजी व. बेंडाजी गावंडे

राहणार पेटी ता. मंगरूळपीर.

दस्तुर जयवंत रामराव

---

नोटीस

---

चंद्रया वलद रखूजी बारीक राहणार वाशीम शुक्रवार पेठेंत जि० मजकूर यांसः—

खालीं सही ...ण.र यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न होण्यास सरासरी १०।१२ वर्षे झालीं तेव्हापासून तूं मजला घेऊन गेला नाहींस. व मी माझें आईचे घरीं राहून माझे उदरनिर्वाहा करितां माझा मामा नागो बारीक जानेफळकर यांचें येथून कर्ज काढून खात आहे. मांस एकंदर खाण्याचा व लुगडी बांगडी वगैरेचा खर्च १० वर्षाचा दरसाल ३६ प्रमाणें एकंदर ३६० रुपये शिवाय व्याज मिळून ५०० वर निघाले आहे. त्यांनीं दोन काळ एवढें जरी पडले तरी माझा खर्च सर्व प्रकारें चालवून मला काळ आटवूं दिला नाहीं. काळाचे वेळीं माझे आईनें तुझ्या घरीं आणून घातले परंतु तू मला खाण्यास न देतां मारहाण करून हाकून दिले. यावरून ज्या अर्थी तूं दुसरी लग्नाची बायको केली आहे. त्यावरून माझी तुला गरज नाहीं असें सिद्ध झालें. व माझे मामाचा माझे आईचे पाठीमागें फार सक्त तगादा रुपया संबंधानें लागला आहे. करितां या नोटीशीनें कळविले जातें कीं ही नोटीस पावल्यापासून १५ दिवसाचे आंत माझे मामाचे रुपये व्याजमुद्दलासुद्धां देऊन मजला घेऊन जावे. असें न केल्यास फारकती द्यावी. नाहीं पेक्षां हीच फारकती समजून मी दुसरा घरठाव करून मामाचे रुपयांची आदाई करून देईन हे तुह्मी खूप समजावें. मग मात्र तुमचा हक्क मजवर राहणार नाहीं ही नोटीस दिली तारीख ८।६।१९०१ इसवी.

सही

कवती मर्द चंद्या बारीक राहणार

थोडपहडी मुक्काम जानेफळ

ता० मेहकर जि० बुलडा

णा निशाणी हातची

बांगडी असे०

---

वऱ्हाडसमाचार

---

मिती आषाढ शुद्ध १ शके १८२३

---

## पावसाळा

इंडियाला पावसाळा ह्मणजे संजीवनी अमृत आहे. पावसाळा ठीक आहे तर सर्व इंडिया सुखी आहे. पावसाळा अंतरला तर दुष्काळ, उपासमारा व मृत्यु यांच्या दरबारा सारखाच सर्व देश भयाण भासूं लागतो. पावसाळ्यावर इतका अवलंबून असणारा पृथ्वीवर दुसरा देश क्वचितच आढळेल ईश्वरी कृपा झाली आणि पावसाळा उत्तम झाला तर या देशा सारखा भाग्यशाली व सुखसंपन्न देश हाच होय. असे दोन्ही प्रकार परमावधीचे आहेत. अशा दोन थडी या देशाला सुखदुःखाच्या प्रवाहाला आहेत. दुःखाच्या पैल थडीला पोचून नुकतांच आह्मी सुखाच्या काठाचा आश्रय करीत आहों. गुदरता आह्मी सुखाचे दिवस थोड बहुत पाहिले आणि आमची दृष्टी आतां ह्या एकाच किनाऱ्याकडे वळली आहे. ईश्वर कृपा करो आणि आमचा पावसाळा यथाकाल व विपूल होवो!

पावसाळ्या विषयीं भविष्य कोणीही सांगो त्याच्याकडे आह्मी तनमन लावून त्याचें ह्मणणें उत्सुकतेनें ऐकत असतो. भविष्यवादी पुष्कळ आहेत आणि त्यांची विधानेंहि यंदा आह्मांला संतोषकारक वाटतात त्यांच्या भविष्यकथनामध्यें विश्वास नसतो तरी चांगल्या सुवार्तेचा मोहकपणा इतका असतो कीं मन तेच शुभ शकून समजून भावी सुखाची इमारत उभारतें. भविष्यें पुष्कळजणांनीं वर्तविलीं आहेत आणि तीं बहुत अंशानीं समाधानकारक आहेत. सरकारही आपली शास्त्रीय माहिती संग्रहित करितात आणि तिच्या आधारावर पंचवीस तीस वर्षांच्या अनुभवानें पुढील पावसाळ्या विषयीं भविष्य सांगतात. या भविष्याला आमच्या दृष्टीनें महत्व मोठें आहे. यांत अनेक शास्त्रीय गोष्टींचा उल्लेख असतो आणि अनुमानांची सांखळी कसकशी बनत जाते याचाही यथायोग्य विचार केलेला असतो. या पावसाळ्याच्या भविष्याचें परिशीलन करणाऱ्याला मोठी मौज वाटेल आणि ज्याला व्यवहारांतले शेतकरी लोकांचे ठराविक ठोकताळे माहित असतील त्यांसही या ठोकताळ्यांचा व शास्त्रीय अनुमानांचा परस्पर संबंध ओळखण्याची मोठी जिज्ञासा वाटेल. या सर्व अनुमानाचा मुख्य पाया साम्यतेच्या तत्वावर बसविलेला आहे. सारखीं कारणें सारखींच कार्यें उत्पन्न करितात हें पहिलें तत्व होय. पण इतका कार्यकारणभावाचा संबंध सृष्टीच्या चमत्कारामध्यें थोडासा कळून येत असतो. यापेक्षांही सामान्य तत्व असें आहे कीं, प्रस्तुत वस्तुस्थितीचें गतकालीन वस्तुस्थितीशीं कितपत साम्य आहे आणि कितपत भिन्नता आहे याचें अवलोकन करावें आणि त्या सारखेपणाची किंवा भिन्नपणाची गोळाबेरीज घेऊन अनुमान करण्याचा प्रघात आहे. किंबहुना या साम्यभिन्नतेच्या परीक्षणानेंच आपला सर्व व्यवहार चालतो आणि पदोपदीं आपण भावी गोष्टींचीं अनुमानें बांधीत असतो.

पावसाळ्या विषयीं अनुमान करितांना मुख्य सहा गोष्टींचा विचार करीत असतात. या सहा गोष्टी पैकीं पहिली गोष्ट सूर्यबिंबाची होय. आपल्या मध्यें सूर्याला किंवा चंद्राला खळें पडलें ह्मणजे अनेक तर्क करीत असतात. आणि पुष्कळदां ते खरेहि ठरतात. सूर्यबिम्बावरील धूसरता जेव्हां अगदीं कमी होते आणि सूर्यबिम्बावरील उष्णतेचें प्रमाण अती प्रखर असते तेव्हां दुष्काळ पडतो असा १८९९ सालीं अनुभव आला. सूर्यावरील डागाशीं पावसाळ्याचा संबंध मोठा आहे असा अलीकडील शोध आहे. सूर्यबिम्बा वरील धूसर व काळसर छटा १८९९ त अगदीं विलय पावल्या होत्या पण त्या पुन्हा काळवट दिसूं लागल्या आहेत आणि लोहाच्या रंगाच्या रेषाहि दृष्टीस पडतात हें मोठें सुचिन्ह होय. प्रस्तुतचें सूर्यबिम्ब १८७८ च्या व १८८९ च्या बिम्बा सारखें आहे; आणि या दोन्हीं वर्षीं वृष्टी विपूल झाली तेव्हां यंदाचा पावसाळा निदान सामान्य प्रतीचा तरी झाला पाहिजे असें अनुमान ठरतें.

पावसाळ्याचें स्वरूप निश्चित करण्याला दुसरें प्रमेय दक्षिण आफ्रिकेंतील हवामान होय. दक्षिण आफ्रिकेंत जो आग्नेय दिशेचा वायु पाऊस आणितो तोच वायु पुढें नैऋत्य दिशेनें इंडियाला पाऊस पोहोंचवितो. सिलोन येथें हा पर्जन्याचा वायु आला ह्मणजे तो बंगालच्या उपसागराच्या बाजूनें व मुंबईच्या समुद्राच्या बाजूनें इंडियाभर पावसाळ्याचा विस्तार करितो. दक्षिण आफ्रिकेंत गेल्या एप्रिल व मे महिन्यांत चांगला जोराचा पर्जन्य झाला आणि त्या पावसाळ्याच्या वायूला इंडियाकडील नैऋत्य दिशेची गती मिळाली आहे हें शुभलक्षण होय. या वायुसंबंधानें एक कमतरता आहे. तो वायु सध्यां पूर्व आफ्रिकेकडे विशेष वळला आहे ह्मणून थोडी भिती वाटते, तरी साधारण पावसाळा होण्याला कांहींच प्रत्यवाय दिसत नाहीं.

पावसाळ्या विषयीं अनुमान करण्याला तिसरें प्रमेय ह्मणजे मागील ४० वर्षांच्या पावसाळ्यांचा अनुभव होय. अनुभव असें सांगतो कीं, पावसाळा फार कमी झाला ह्मणजे त्याच्या मागून तो मोठाही होत असतो. हा साधारण ठोकताळा झाला पण यांत एक गोम अशी आहे कीं कमी पावसाचीं वर्षें जोडगोळीनें येत असतात. प्रारंभीं दोन वर्षें एकसारखीं पाऊस कमीच होतो आणि नंतर पर्जन्य विपूलतेनें तिसऱ्या वर्षी होऊं लागतो. अशी गोष्ट १८७६-७७, १८९५-९६ व १८९९-१९०० या द्विवार्षिकी तीन जोडगोळीच्या काळांत घडून आली. गेल्या २१ वर्षांची माहिती असें निश्चित करिते कीं यंदाचा पावसाळा चांगलाच होईल.

हिमालयावरील बर्फाशीं पावसाळ्याचा संबंध मोठा चमत्कारिक आहे. हिंवाळ्यांत जर बर्फ अतिशय पडलें किंवा बर्फाचा वर्षाव अवेळी व मागाहून झाला तर उत्तर कडून येणारा वारा पावसाला हटवितो आणि शुष्क व रुक्ष हवा प्रसृत करितो. हीं चिन्हें दुष्काळाचीं होत. गेल्या हिंवाळ्याचा प्रसार आह्मांला थोडासा प्रतिकूल आहे. हें चवथें प्रमेय जसें चांगलेंसें नीट नाहीं तशी इंडियांतील जानवारी पासून एप्रिल पर्यंतची वातावरणाची स्थितीही किंचित प्रतिकूलच आहे. कदाचित उशीरानें पावसाळ्याला चांगली सुरुवात होईल. मे महिन्यांतील वातावरणाचा दाब यथायोग्य होता आणि आरबी समुद्र व दक्षिण महासागर यावरील हवामान देखील चांगल्या पावसाळ्याला अनुकूल असें होतें. त्यांतल्या त्यांत हें विशेष आहे कीं बंगालच्या उपसागराकडील पावसाळा थोडासा अधिक कमजोर राहून मुंबईचा पावसाळा उत्कृष्ट होईल.

पावसाळ्याचें भावी स्वरूप काढण्याला सहावें प्रमेय ह्मणजे मागील वर्षांशीं साम्य हें होय. १८७८, १८८४, १८८५, १८८९ १८९१, १८९३, १८९७ व १९०० या वर्षांशीं यंदाचें ऋतुमान विशेष जुळतें. हें ऋतु पावसाळ्याच्या पूर्वींचें होत. या ८ वर्षांपैकीं विशेष सादृश्य १८७८, १८९१, १८९८ व १९०० या वर्षांशीं आहे आणि या सादृश्यावरून असें वाटतें कीं साधारण पावसापेक्षांही पाऊस अधीक होईल.

पावसाळ्याचें हें अनुमान गोळाबेरजेनें झालें तथापि तो कोणत्या भागाला कितपत जोराचा होईल हें सांगण्याचा भाग मोठा कठीण आहे. या संबंधानें सरकारी शास्त्रज्ञ असें लिहितात कीं:—

(१) ब्रह्मदेशांत पाऊस बरा होईल. लोअरब्रह्मदेशांत विशेष होईल. आसाम व बंगाला या दोन्ही इलाख्यांत पाऊस बहुतेक साधारण होईल. बंगालचा पूर्व व उत्तर भाग कदाचित् पाऊस अधीक घेतील. वायव्य प्रांत, बिहार, छोटानागपूर व मध्य इंडिया या भागांत पावसाळा ठीक होईल असा रंग दिसतो.

(२) पंजाबाला पावसाळा नीटसा कदाचित् होणार नाहीं. काश्मीर व चित्रळ येथें फार उशीरा पुष्कळ बर्फ पडलें आहे ह्मणून अशी भिती वाटते.

(३) रजपुताना, मध्यप्रांत व हैदराबाद या भागांत एकंदरीनें पाऊस बरा होईल. हैदराबादेकडे कदाचित् थोडा कमी पाऊस पडेल.

(४) वऱ्हाड व खानदेश येथें पाऊस साधारण होईल. मद्रासच्या किनाऱ्यालाही पावसाळा असाच नीट होईल. कर्नाटक, दक्षिण महाराष्ट्र व म्हैसूर या भागाला साधारण पाऊस होऊन कदाचित् थोडा अधीकही होईल.

ईश्वर करो आणि यंदाचा पावसाळा इंडियाला सुखकर होवो!

परवां नुकतेंच व्हाईसराय साहेबांनीं मद्यपानादिकामध्यें मितपणा ठेवावा अशा विषयीं सोल्जर मंडळीस उद्देशून जो बोध केला तो खरोखरीच सर्वांनीं आपल्या हृत्पटावर चिरकालचा खोदून ठेवणें अगदीं अवश्य आहे. लार्ड कर्झन सारख्या बृहस्पतीच्या मुखांतून निघालेला गोड गर्भित व हेतुपूर्ण उपदेश अन्वर्थक नाहीं असें कोण ह्मणेल. खरें पहातां इंग्रजीसैन्यभार फार निरर्गल झाला आहे. इंग्रजी सैन्यदलांतील प्रत्येक वीर पुरुषानें आपल्या शौर्यसामर्थ्यास साजेल व पचेल इतक्याच उत्शृंखलपणाचें वारें आपल्यास लागूं द्यावें. अनियंत्रित व बेगुमान वागणुकीनें फाजील उद्दामपणाच्या व दुर्वर्तनाच्या राहटीस खिळून जाऊन आपल्या कीर्तीस काळिमा लावणें व नाशास कारण होणें ही गोष्ट अगदीं नापसंत होय. आपले सर्व आचार विचार, व आहार व्यवहार ह्मास नियमधरबंधांचें मळें मोठें आळें बातलें पाहिजे. व आपलें कर्तव्य काय आहे हें समजून घेऊन तें बजावण्याकडेच सर्व दृष्टी ठेविली पाहिजे. मनुष्य आपल्या अधिकारसत्तेनें, शक्तिसामर्थ्यानें, व सुखसंपत्तीनें गर्विष्ट, उन्मत्त व बेफाम होत असतो व ह्या धुंदींत अनन्वित कर्मे करण्यास त्याची सहजच प्रवृत्ती होते. अतःएव विचार बोधाच्या चार गोष्टी नेहमीं डोळ्या पुढें ठेवून आपला वर्तनक्रम शुद्ध व चाल राखण्यास झटलें पाहिजे. परमेश्वर कृपाप्रसादानें जी सत्ता शहाणपण, जी विद्याकला, व जें विद्यज्ञान आपणांस लाभलें आहे त्याचा अनाठायीं व अविचारपणानें विनियोग होऊं ये ह्मणून खबरदारी घेतली पाहिजे. अलिकडे कर्तव्याचा विसर पडून तत्पराङ्मुखतेमुळें अनभीष्ट गोष्टी करण्याची जी दुष्ट संवय जडत चालली आहे तिचा प्रतिकार करण्याचें सर्वांनीं मनावर घ्यावें. ज्या योगें कर्तव्य परायणतेचा दृढ व्यासंग अंगांत रुळेल त्याच मार्गाचें अवलंबन केलें पाहिजे. तात्पर्य आपल्या सर्व कार्याचें नियमनानीच मापन झालें पाहिजे. असें झालें ह्मणजे मग अर्थातच सरळ मार्ग सोडून इकडे तिकडे जाण्याची अनियामितपणाची इच्छाच होणार नाहीं.

जे इंग्रज बहादर इंग्लंडच्या नांवावर हिंदुस्थानांत उच्चपदश्रीसंपन्न होऊन येतात त्यांनीं आपलें कर्तव्य बजावून इंग्लंडची इभ्रत व कीर्ती वाढविली पाहिजे. नुसते चैनीसाठीं, व पैसा कमाविण्या साठीं त्यांची योजना केलेली नाहीं. यःकश्चित शिपाया पासून तों थेट लाट साहेबा पर्यंत सर्वांनीं ह्या जित देशाच्या कोट कल्याणाची चिंता व कळकळ धरली पाहिजे. इंग्रज लोकांनीं अन्याय व अनाचार करून हिंदुस्थानास नागविलें असा दोष इंग्लंडला लागेल असा गैरमार्ग कोणी स्वीकारूं नये. इंग्रजी राज्य चिरस्मरणीय करण्याची मनांत लालसा धरून सद्धर्मानें व ममत्वानें वागून सर्वांचीं मनें आपलीशीं करून घ्यावीं. दुष्ट गोष्टिंचा संसर्गबाधा आपणांस होऊं देऊं नये. अशा धर्मशील पुण्यदायी व नीतिमान् मार्गानें इंग्रजी राज्याचें वैभव व थोरवी यांची जोड मिळवून आपण आपल्या स्वदेशासंबंधानें, ईश्वरासंबंधानें व ह्या परदेशासंबंधानें कृतकार्य होऊं. ईश्वर करो व ही सुबुद्धी सततची सर्वांच्या मनांत जागृत राहो.

---

आह्मा हिंदु लोकांना धर्मशिक्षण व धर्माभिमान कांहीं नाहीं असें जें कित्येकांचें मत आहे तें सर्वस्वी चुकीचें आहे. आमच्या धर्माचीं नीतितत्वें आमच्या रक्तांत जन्मा पासून भिनून गेलेलीं असतात. लहानपणा पासूनच आह्मांस धर्मशिक्षा देण्यांत येते. धर्मशिक्षणासाठीं संस्थापित असें विश्व विद्यालय नाहीं हें खरें आहे. व त्याची आह्मांस जरूरीही वाटत नाहीं. धर्माच्या सारभूत गोष्टी मुख्यत्वें करून आह्मी आपल्या घरांतच शिकतो. परधर्माप्रमाणें याचें शिक्षण मिळविण्यासाठीं शाळेंत जावें लागत नाहीं. बालपणींच धर्मबीज आमच्यांत रुजत असल्यामुळें थोरपणीं ह्या वृक्षाच्या गोडफळांनीं आमचें सर्व आयुष्य प्रफुल्लितच राहतें. ह्या सुफलदायी वृक्षास कोणच्याहि धर्म वादळांत धक्का पोहोंचेल अशी काडीमात्र हि भीति नको. ख्रिस्ती धर्माचा सर्व ग्रासी सूर्य उदय पावल्यामुळें आमचा हिंदू धर्म अंधःकारांत लोपला गेला व त्यावरील आमचा विश्वास उडाला ही गोष्ट अन्यथा होय. हिंदू धर्माचें पुण्यपवित्र चरित्र जसें पूर्वापारपासून नाणवलेलें आहे तसेंच कायम आहे व तसेंच पुढेंहि अबाधित राहील.

आमच्या वाडवडिलांनीं जो कित्ता आह्मांस घालून दिला आहे तो बळकून त्यांच्या सद्बोध वचनांनीं आह्मी आमचीं मनें सुसंस्कृत करितो. आमच्या धर्मावरील आमची प्रीति व श्रद्धा परिपूर्ण आहे. आमच्या धर्माप्रमाणें ऐहिक व पारमार्थिक सुखाचा ठेवा आह्मांस मिळतो अशी आमची खात्री आहे. मिशनरी लोकांनीं अनाथ दीन लोकांस पैशाची लालूच दाखवून त्यांस ख्रिस्ती धर्मांत ओढलें तरी त्यांचीं मनें त्यांच्या पूर्व धर्मांतच पुन्हा तल्लीन होतात हें विसरतां कामा नये. आमचा हिंदुधर्म इतका हजारों वर्षें चालत राहिलेला आहे हें त्याच्या चिरस्थायीपणाचें मुख्य लक्षण होय. आमच्यातील धर्मस्फूर्ति किती प्रखर होती हें इतिहासांतरी प्रसिद्ध आहे. हीच स्फूर्ति आमच्या अंतःकरणांत अद्याप जागृत आहे. धर्माभिमानाचें वेड फार विलक्षण व वाईट आहे. ह्याच्या पायीं राष्ट्रांचीं राष्ट्रें धुळीस मिळालीं आहेत. याचें ताजें उदाहरण चीनचें पेटलेलें रणकुंड होय. धर्मरूपी सर्पाच्या शेंपटीवर पाय देऊन परीक्षा करून घेऊं नये. जर कोणाला आमच्या स्फूर्तीबद्दल शंका असेल तर ह्या सर्पास डवचून पहावें ह्मणजे मग धर्मसंरक्षणाय संभवामि युगेयुगे ह्याचा प्रत्यय सहजी होईल. इंग्रज सरकार धर्माच्या बाबतींत हात घालीत नाहींत. हें तत्व राज्यास फारच हितावह होय.

---

# The Berar Samachar

MONDAY JUNE 17 1901

India is in the category of dying nations. It is a sad fact and we do not know whether we can do well to ignore it. This fact does however militate against the optimistic view of the growing prosperity of India. We are sorry that we fail to see any traces of that inward happiness and that energetic vitality which are distinguishable in the public national life of Great Britain as well as of other prosperous nations. The growth of material wealth is the real foundation of a healthy national life. It supplies a sound footing for the advancement of the people. It is the fountain of life from which springs a healthy and robust nation. But the gradual increase of poverty is the self—same tale of India. The British civilization, we regret to admit, has conferred no blessings of material prosperity and national activity on India. In all other respects it has been a ore—runner of the development of Indian resources. It has indeed elevated every tone of public life in India but it is not without its fatal flaw which secretly plucks its blooming blossoms. It is this that has paralysed the Indian public life & national vigour. It is this that has given a death blow to all Indian industries. There is nothing that contributes to increase the material wealth of India. All progress has been one—sided and foreign capital has been engaged to an enormous extent. There is nothing in India that does not contribute to the glory and greatness of Great Britain. The British manufacture has got an ample field in India. Every thing tends to drain away her wealth and to impoverish her in a gradual process.

The employment of foreign capital entails a heavy burden upon us. The economic situation of India is getting more serious and the danger is that the British capitalists will be a great power and will turn the Indian people into a band of serfs and slaves. The Indians are more or less labourers to serve the English capitalists and those who are high above the ordinary level are great customers of European wares. India's whole wealth consists of her agricultural and mineral produce. The power of steam and electricity contributes much to develop Indian resources but it does not materially enrich her coffers. The foreign rule and the foreign capital have secured for themselves the vast treasures of India. What we wish is to drive out the alien spirit of selfish interest in the British rule. Let sympathy and large mindedness unite and knit us together under one common bond of a British subject. But we do not know how to remedy the grievances of a foreign capital. It has killed our proud instincts of a national life. The spirit of independence and self—help are no longer our pillors of national great—ness. Whatever benefit comes to the lot of an Indian it is something like wages for improving the free and full use of foreign capital and for developing the foreign trade to its utmost extent. We are thus coolies to serve the interests of our lords—the foreign capitalist. We hope our people will realize the great magnitude and the great danger of this economic position. If we ever rise to the level of a prospering nation we will do only removing the causes of our downfall. The story is short and sweet if we but catch the real issues in the question. We are on the incline plane of poverty. If we do not push ourselves upward in the stir and bustle of our national life our race is done up for all ages. Let us emulate to live to the ideal of self—help and let us make our rulers to elevate us to their height of prosperity. The latter event is only possible if we are earnest and fight manfully with the present economic problem of India.

---

## वऱ्हाड

हवामान– शुक्रवारीं व काल रात्रीं पाऊस चांगला झाला. हवेंत थंडपणा वाटतो व उष्माही कधीं कधीं वाटतो. वातावरणांत चलविचल घटकोघटकी होत आहे. रोगराई कांहीं नाहीं.

मि. अजिजुद्दीन असि. क. बुलढाणा यांची बदली इलिचपुराहून बुलढाण्यास होत आहे.

मि. मोइनुद्दीन अ. क. हे रजेवरून यवतमाळास परत दाखल झाले खरे पण तेथें अधिकारी पुष्कळ झाले आहेत तेव्हां कोणाची बदली होतें ती पहावी.

मुंबईकर संगीत नाटक मंडळी येथें या आठवड्यांत येणार आहे. ही कंपनी तीन वर्षांपूर्वीं येथें आली होती त्यापेक्षां सध्या चांगली सुधरली आहे असें ह्मणतात.

येथें सरकसची मंडळी येऊन तिचे खेळ प्रतिदिनीं होत असतात. घोड्याचे खेळ रीती प्रमाणें होतातच पण कसरतीचे प्रयोग फार चांगले साधले आहेत. ही मंडळी चांगली गुणी आहे.

---

## वर्तमानसार

नवीन भीति व काळजी— जोधपूरचे महाराज आपल्या रेसिडेंट साहेबा बरोबर कोलंबोच्या प्रवासास गेले होते व तसेंच त्यांना त्यांच्या प्रकृतीसाठीं विलायतेस थेट रवाना करण्यांत आलें ह्मणतात अशीहि वदंता आहे कीं, रेसिडेन्ट साहेबांनीं महाराजांचे आवडते पशुपक्षी, घोडे वगैरे लिलावांत विकून टाकले. तसेंच महाराज रेसिडेंट साहेबांच्या मुलाखतीस सडे गेले असतांना परभारे गाडींत घालून कोलंबोकडे नेऊन विलायतेकडे रवाना केलें अशीही बोलवा ऐकूं येते. एकंदरींत महाराजासाठीं सर्व प्रजा चिंतातुर झाली असून गोंधळून गेली आहे. सरकारानें या कारस्थानाचा योग्य स्फोट करून घाबरलेल्या प्रजाजनांचीं मनें लवकर शांत केलीं पाहिजेत.

लक्ष्यांत ठेवून शहाणे व्हा— बेंगरुळास दोन सधन शेटजींची बोलाचाली होऊन एकानें दुसऱ्यास झक मारतां, बेवकूफ, नालायख असें गालीप्रदान केलें. त्यावरून अब्रूनुकसानीबद्दल फिर्याद करण्यांत आली. पण प्रथम अधिकाऱ्यांनीं ही क्षुल्लक गोष्ट आहे ह्मणून खटला फायलावर घेतला

नाहीं. यावर अपील होऊन खटला सुरू झाला. दोन्ही बाजू तर्फे नामांकित वकील होते. या पायीं ४० ५० हजारांचा चक्काचूर झाला. निकाल झाला, त्यांत आरोपीस ५५ रुपये दंड झाला. ह्यावर अपील होणार आहेच! आणखी किती पैसे जाणार व उभयपक्षी शेवटीं पदरात काय पडणार! लोकांनीं शहाणपणा शिकावा व उगीच हट्टास पेटून दरबारची पायरी चढूं नये व आपला नास करून घेऊं नये.

विलक्षण सृष्टी— बरद्वान शहरीं एका बाईस एक मूल झालें होतें त्यास चार हात होते. तें मूल तास दोन तासच जिवंत होतें.

गेंद्यांच्या फुलाच्या वासानें चिलटे अजिबात नाहींशी होतात असा एकानें आपला अनुभव प्रसिद्ध केला आहे.

माकड व सर्प यांची लढाई— बंगलोरकडे एक सर्प उन्ह खात रस्त्या जवळच पसरला होता. त्यास एका माकडानें त्रास दिल्यावरून तो सर्प त्या माकडाचे पाठी मार्गें लागला. दोघेहि पळतांपळतां एका डोंगरावर येऊन पोहोंचले. तेथे तो साप आपली फणा पसरून माकडास मारूं लागला. पण त्या लबाड माकडानें तो मार चुकविल्यामुळें उलटे त्या सापासच दगडावर फणा आपटल्यामुळें दुखापत होऊन तो रक्तबंबाळ झाला व शेवटीं थकून जाऊन जमिनीवर पडला. लगेंच माकडानें त्याचें तोंड व धड निराळें करून टाकलें व आपण विजयानंदानें झाडावर चढून स्वस्थ बसला. हें पाहून कांहीं लोकांनीं त्या माकडास धान्य व ऊस खाण्यास दिले.

सर्पानें भरलेल्या पेट्या— कलकत्ता येथील पोलीस नांवेंत बसून जात असतांना तीन पेट्या वहात आल्या. संशय वरून त्या फोडून पहातात तों आंत आठ दहा हात लांब कृष्ण सर्प! सर्वांची गाळण उडाली. त्यांनीं त्या पेट्या बंद करून पुन्हां सोडून दिल्या. पेटींत सर्प कोणी ठेविले व ते पोलीसनें न मारतां सोडून कां दिले?

निजाम सरकाची कांहीं कारणा निमित्त खपा मर्जी होऊन त्यांचा बड्या बड्या कामगारांना कमी करण्याचा सपाटा सुरू झाला आहे ह्मणतात.

हुबळीच्या २ वर्षाची सजा पावलेल्या एका कैद्यानें आपली शिक्षा फटके मारून कमी करावी ह्मणून विनंती केली तेव्हां त्यांस २० फटके देऊन तीन महिन्यांच्या कारागृहवासा नंतर सोडून द्यावें असें ठरविले. कैदखान्यापेक्षां फटके बरे काय?

स्वतांच्या अनुभवाचा फायदा करून घेणारा शहाणा, पण दुसऱ्याच्या अनुभवाचा फायदा करून घेणारा तो किती तरी शहाणा!

मुरी (पंजाब) येथील अ. कामिशनर साहेबांच्या पुढें एक वकील बूट घालून गेला होता त्यास साहेबांनीं आपल्या धाकानें तो काढण्यास लाविला लगेंच दुसऱ्या वकिलाबराबर तोच प्रयोग केला पण साध्य झाला नाहीं. आजपर्यंत फक्त नेटिव जोडे पाहून अधिकाऱ्यांची लहर बिघडून मर्जी खपा होत असे. आतां तर नटिव बूटहि डोळ्यांत खुपूं लागलेंसें दिसते. कांहीं असो. आमच्या भेकड लोकांनीं दुसऱ्यांची हाजी हाजी करून मर्जी राखण्याचे तरी कसब उत्तम शिकावें.

तुर्कस्थानांतील कांहीं पुंडखोर लोकांनीं सुलतानास वेड लागलें आहे असें ठरवून त्याची उचल बांगडी करण्याचा घाट घातला होता पण तो फसला व त्यांस कैद केलें आहे.

चमत्कारिक चाल— हिंदुस्थानांतील लालबेगी जातीच्या लोकांचा लग्नसोहळा (मेहेंपण) फार गमतीचा आहे. लग्नास पौर्णिमा अगर अमावास्या हेंच सुमुहूर्त होत. चौधरी लोकांस (लग्न लावणारे भट) सव्वा रुपया व पावशेर सुपाऱ्या दक्षणा द्यावी लागते. नंतर सर्व नवरदेव व नवऱ्या सुमारे २५ कदमांच्या अंतरावर समोरासमोर रांगानें बसतात. नवरदेवांच्या गळ्यांत ढोलगीं असतात तीं वाजवीत वाजवीत ते आपल्या प्रिय पत्नीकडे जातात व तिच्या गळ्यांत तें ढोलगें पडलें कीं लग्न कार्य उरकलें समजावयाचें.

तिखट खाऊ राक्षस— नांदेड जिल्ह्यांतील एका ३५ वर्षाच्या माणसास दररोज भोजनाच्या वेळीं तीस तोळे मिरच्याची कोरडी पूड लागते. येणें प्रमाणें दरमहा दीड मण मिरची एकट्यास लागते. तरी तो सशक्त व गोरागोमटा आहे.

ब्रिटिश म्युझियम मधल्या पुस्तकांची संख्या फार मोठी आहे हें सर्व श्रुतच आहे. या संग्रहालयाचें सूची पुस्तक वीस वर्षे तयार होत होतें तें आतां पुरें झाल्याची नुक्ती बातमी आली आहे! या पुस्तकालयाच्या यादीचेच ६०० ग्रंथ आहेत व त्यांत वीस लक्ष पुस्तकांचीं नांवें आहेत. या पुस्तकांचे सूचीपत्रास इतका काळ ह्मणजे खरोखरच फार थोडा काल होय. आतां या पुस्तकालयांतील ग्रंथांतील विषयांचें वर्गीकरण सुरू झालें असून तें काम पंधरा वर्षांनीं पुरें होईलसा अदमास करण्यांत आला आहे. मो०

---

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर २

पावसाळ्याची खरी बहार कोकणांतच असते. एके दिवशीं तिसऱ्या प्रहरच्या वेळीं काळ्याकुट्ट ढगांनीं आकाशांत एकच गर्दी करून सोडली होती. दिवस होता ह्मणून ठीक नाहीं तर डोळ्यांत बोट घातलें तरी दिसण्याची मारामारच पडली असती. कोकणाचा भाग डोंगराळ असल्यामुळें ह्या गांवांहून त्या गांवास जाण्यास पायवाटाच असावयाच्या. अशा पायवाटेनें एक घोडेस्वार भरधांव घोडा फेंकीत चालला होता. घोड्याचें सर्वांग घामामुळें चिंब होऊन त्याला मजल फार झाल्यामुळें बराच थकवाहि आलेला होता. स्वारीच्या उजव्या हातांत एक भाला असून त्याच्या डाव्या बाजूला एक तलवार लटकत होती. डाव्या हातांत घोड्याचा लगाम असून पाठींशी ढाल बांधलेली होती. पोषाखाच्या ऐटीवरून व पागोट्याच्या झोकावरून हा रजपूत असावा असें वाटे. वय सोरें अठरा विशीच्या आंतच होतें. तो गोरापान होता पण श्रमामुळें व मानसिक दुःखामुळें त्याच्या आंगावर थोडासा काळवटपणा आला होता. अंगलोट मजबूत, कपाळ भव्य, आणि डोळे पाणीदार, इतक्यानिशी हा कोणी राजबींडा असावा असें वाटे, घोड्याला थोडासा विसावा मिळावा ह्मणून तो खालीं उतरला. व त्यानें झाडाला घोडा बांधून भाला झाडाच्या फांदीला उभा करून ठेविला. कपाळावरील घर्मबिंदू पुसून टाकून काळ्याकुट्ट ढगांनीं व्याप्त झालेल्या आकाशाकडे कांहीं वेळ टक लावून बसला. इतक्यांतच एखादें वादळ उसळेल असें कोणाच्याही स्वप्नीं नव्हतें. वाऱ्याच्या मंद झुळका वाहतच होत्या. पण एकदमच ढगांचा गडगडाट व विजांचा चकचकाट सुरू होऊन पावसाच्या सरीवर सरी येण्यास आरंभ झाला. अशा वेळीं पुढें जाणें कोण धोक्याचें! परंतु अशा गोष्टींचा विचार करणारा व अशा अडचणीकडे लक्ष देणारा हा पुरुष नव्हता तो तसाच घोड्यावर बसून दौडत दौडत पुढें जाऊं लागला. विजा प्रतिध्वनीच्या योगानें दसपट कडाडू लागल्या व वारा भी ह्मणूं लागला, तो इतका कीं डोंगरास तो मुळासकट उपटून टाकतो कीं काय अशी भीति वाटे. अशा संधीस पाऊसही अतीशय पडूं लागला आणि आसमंतातील बराच भाग व दऱ्या खोरीं जलमय होऊन गेलीं. ओढेही गढूळ पाण्यानें तुडूंब वाहूं लागले, एखादे वेळीं असें वाटे कीं हें वादळ घोडेस्वाराला घोड्यासकट दरींत भिरकावून देतें कीं काय? वादळामुळें झाडाच्या फांद्या एकमेकावर आदळत, व त्या योगानें त्याचा मंदील अगदींच फाटून त्याच्या चिंध्या झाल्या. झाडाची एक फांदी डोकीला लागून भयंकर जखम झाली, व त्यांतून रक्तही सारखें वाहूं लागलें. तरी त्यानें ह्या गोष्टीकडे लक्ष दिलें नाहीं. होतांहोता सायंकाळचा समय झाला. व पाऊसही थांबला. ढगही बाजूला वळले. मावळत्या सूर्याचें पिवळें किरण आसंमतांत चमकूं लागलें व त्यायोगें ती एक चमत्कारिकच वनशोभा दिसूं लागली. होतांहोतां हा घोडेस्वार किल्ल्यावर जाऊन पोहोंचला. पोंचताक्षणीं त्यानें आसमंतांतील भागाकडे दृष्टी फेंकली तों त्याला जिकडे तिकडे पाणी आणि हिरवेंगार गवत या शिवाय कांहीं दिसेना. आकाशांत सप्तरंगी इंद्रधनुष्य चमकूं लागलें. किल्ल्यावर येऊन पोहोंचतो तों पूर्ण सूर्यास्त झाला होता. त्यानें हाक मारली. पहारेकऱ्यानें दरवाजे उघडले आणि ह्मणाला, "एक क्षण जर उशीर झाला असतां तर दरवाजे बंद होऊन रात्रभर बाहेर रखडावें लागलें असतें"

घोडेस्वार—"एक क्षणही फुकट न घालविण्याबद्दल मी खबरदारी घेतली होती" भवानीच्या कृपें करून मी धन्याला दिलेलें वचन नेहमीं पाळीन. "ह्या वेळीं किल्लेदाराची गांठ पडेल काय?

पहारेकरी— "किल्लेदार आपलीच मार्गप्रतीक्षा करीत आहेत"

इतकें ऐकतांच तो किल्लेदाराच्या बंगल्याकडे जाऊं लागला. तेथें गेल्यावर किल्लेदारास लवून मुजरा करून एक पत्राचें बंडल (पुडकें) पुढें ठेवून उभा राहिला. पुडकें वाचून पाहून त्यानें एकदम जासुदाकडे दृष्टी वळविली. त्या पत्रांत दिल्लीच्या बादशहासी लढाईला सुरवात झाल्यापासून तों त्यावेळ पावेतों सर्व कच्ची हकीकत असून शिवाय तो किल्लेदार शिवाजीस कोणत्या युक्तीनें मदत करूं शकेल याविषयीं मजकूर होता. त्याची ती तेजःपुंज कांती पाहून त्याला फार आनंद झाला. व तो एकदम ह्मणाला:—

आपणांस रघुनाथजी ह्मणतात काय? आपण रजपूत आहा वाटतें."

"होय" असें मोठ्या नम्रपणानें रघुनाथजीनें सांगितलें.

"सिंहगड पासून तोरण्याला इतकें जलद तुह्मी कसें आला?" त्यानें मोठ्या आश्चर्यानें विचारलें.

"धन्याला वचन दिल्यामुळें मला जलद यावें लागलें" असें त्या जासुदानें उत्तर दिलें.

या उत्तरानें किल्लेदार फारच खूष झाला. आणि हास्यकारक मुद्रेनें ह्मणाला "तुह्माला अधीक प्रश्न विचारणें उपयोगी नाहीं. तुमचा चेहेराच तुमची योग्यता, व धीटपणा दर्शवीत आहे. पुढें पुणें आणि सिंहगड या ठिकाणची सर्व कच्ची हकीकत ऐकून घेऊन तो पुन्हां ह्मणतो:—

"कृपा करून उद्यां सकाळीं मला भेटाल काय? उद्यांच सर्व प्रश्नांचीं उत्तरें देऊन आपणास परत जाण्याची परवानगी देऊं. शिवाजी महाराजांनीं आपल्यालाच पाठविलें हें फार चांगलें केलें.

"फार उत्तम आहे" ह्मणून मोठ्या नम्रपणानें रघुनाथजीनें उत्तर दिलें. व तो बंगल्याच्या बाहेर आला.

रघुनाथजीची कसोशीनें परीक्षा करण्यांत किल्लेदाराचा हेतु निराळा होता. पत्राचें उत्तर ह्मणून तो जें पत्र देणार होता तें लिहून देण्यापेक्षां तोंडींच मजकूर सांगणें बरें असें त्यास वाटलें कारण पत्र एखादे वेळीं शत्रूच्या हातीं पडण्याची भिती होती. राजकारस्थानाची बातमी ह्या बरोबर पाठविण्यास हा योग्य मनुष्य आहे, व शत्रूच्या लाचलुचपतीस भुलून हा गुप्त राजकीय गोष्टींचा पारिस्फोट करणारा नाहीं अशी त्याची खात्री झाली. रघुनाथजी त्याच्या समोरून गेला नाहीं तोंच तो आपल्याशीं ह्मणाला, शिवाजी फारच शहाणा आणि राजकारस्थानी पुरूष आहे. योग्य कामीं योग्य इसमाची निवड करण्यांत तोच एक खरा चाणाक्ष आणि धूर्त दिसतो यांत शंका नाहीं.

(पुढें चालूं.)

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

REGISTERED N. No.

सहामाही „ २ „ ८८
साल अखेर „ ७ „ १ ८९
किरकोळ अंकास ........................८४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस.........८१ ०६
दुसरे खेपेस .... .......८१

Six monthly........ 3 ..............8 a
Single copy ......................4 as

Advertisement
Below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line...8 as

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXXV AKOLA MONDAY 24 JUNE 1901 NO 24

वर्ष ३५ आकोला सोमवार तारीख २४ माहे सन १९०१ इ० अंक २४

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल.

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारी च्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपया पर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दरशेकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पाच हजारा वराल रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १५ जुलै १८९८ } A. G. Watson
Agent.

## जाहिरात

तुपे यांची उत्तम निळी काळी शाई एकदम ॥।- ची घेणारांस रोख रुपये ५०० २००,१००,५०,२५,१५,१०,५,२ किंवा ०१२ किं. चें पुस्तक यांतून एक बक्षीस प्रत्येकास खात्रीनें मिळतें. शाई मागविणारा ची ट. ह. सह ०१४ चो मानआवर पोंचतांच त्यांचें नांव रजिष्टरांत नोंदून ज्या नवरी नांव नोंदलें असल त्या नंबरास आधींच ठरवून ठेवलेलें बक्षीस आहे तें लगेच रवाना होतें.

पत्ता:— एम. जी. तुपे. पेठ गणेश घर नंबर ३३ पुणें.

## NOTICE.

Is hereby given to all whom it may concern that the draft of proposals made by the Shegaon Municipal Committee under section 41 (1) (A) (b) of the Berar Municipal Law 1886 for the imposition of a tax on trades and professions practised within the limits of the Shegaon Municipal Committee is published for general information.

The class of persons proposed to be taxed, the amount or rate of the tax to be imposed and the system of assessment to be adopted will appear from the following proposals.

Any inhabitant objecting to the imposition of the proposed tax may within 30 days from the publication in writing to the Committee and the Committee will at a Special Meeting, take his objections into consideration.

Shegaon Municipal Office 14/6/1901 } B. B. Patki Secretary Shegaon Municipality

*A tax on professions & trades Proposals*

(1) Resolved unanimously to propose the imposition with effect from 1st April 1902, under section 41 (1) (A) (b) of the Berar Municipal Law 1886 of a tax on professions and trades practised within the limits of this Municipality subject to the following rule:—

(1) The tax shall, subject to the following provisos, be assessable on every person who practises any profession or art or any trade in the Shegaon Municipality, the whole or any part of whose income derived from any source other than agriculture is not less than Rs. 100 per annum at the rate of one percent on the taxable portion of his estimated income derived from any such source Provided that—

I. No person or firm shall be assessed at a sum exceeding Rs. 500 per annum or less than eight annas.

II Rupees 99, The maximum non taxable income, shall be deducted from full annual income of each assessee and the tax shall be calculated on the remainder.

III All payments made on account of pensions or Provident Funds or in the case of persons who effect life insurances, the amount payable as premium (when such payments or amounts do not exceed one sixth of of the full annual income) shall also be deducted from the full annual income and the tax be calculated on the remainder.

IV. In calculating the assessment of the tax all fractions of eight annas shall be reckoned as eight annas.

10/6/1901 } (Sd) F. L. Crawford Chairman Shegaon Municipal Committee.

### नोटीस

बेशमी— गुलाम आबास वल्लद गोविंदराज अय्या राहणार ताजनापेठ आकोला यांस:—

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं आह्मी तुह्माकडून कर्जाऊ रुपये २०० घेतले आणि त्या रुपया ऐवजीं शेतीचें ताबेगहाणखत लिहून दिलें. पण त्याच वेळच्या तोंडीं ठरावाप्रमाणें शेती माझ्या जवळ राहावी असें ठरून सर्व शेती माझ्या जवळच आहे. मी शेताची किस्तकारी चांगली केली आणि खत वगैरे पुष्कळ घातलें हें पाहून तुमची नजर फि[illegible] आहे आणि आतां शेत तुह्मी दांडगाईनें पेरण्याच्या बेतांत आहा असें कळतें. तर तुह्मांस या नोटिशीनें असें कळवितो कीं तुह्मी आपली बाकी सव्याज चुकती करून घ्यावी. ही रकम मी देण्यास आलो असतां तुह्मी ती घेतली नाहीं मी तुह्मास देण्याकरिता मि. उल्लखा वल्लद बुलेखा राहणार वसाडी बुजरूक परगणें नांदुरा यांच्या दुकानावर सर्व रक्कम ठेविली आहे. आठ दिवसाचे आंत परभारें ती घेऊन दस्ता ऐवज आमचा आह्मास वापस करावा. असें करण्यास चुकल्यास नोटीस पोचल्या तारखे पासून तुमचें व्याज बंद होईल आणि शेतीवर ताबा करण्यास आल्यास फौजदारींत फिर्याद करावी लागेल. कळावें. तारीख २० जून १९०१ इसवी.

सही
हुसेनबेग वल्लद समुबेग राहणार
वसाडी खुर्द ता. मलकापूर
निशाणी वखर.

### नोटीस

रा. रा. नारायण बापूजी देशमुख हैसांग तालुके अकोला यांस:—

मी खालीं सही करणार या लेखानें असें कळवितों कीं, कडतखेडा परगणे दहिहंडा तालुके दर्यापूर येथील शेत सर्वे नंबर २६ हें मी गेल्या वर्षीं राजाराम वल्लद हनुमती रहाणार धामने बुजरुक यापासून खरेदी घेतलें आहे. तें शेत आपणापाशीं, ह्या शेताचा खातेदार उदेभान वल्लद मानाजी वस्ती कडतखेडा यानें गहाण ठेविलेलें आहे. तर ह्या गहाणाबद्दलचा हिशेब व दस्तैवज दाखवून जे योग्य योग्य रुपये निघत असतील ते आह्मापासून घेऊन जावेत. व ही नोटीस पावल्यापासून एक महिन्याच्या आंत सर्व निकाल करावा. असें मुदतींत न केल्यास आह्मी व्याजबट्टा वगैरे कांहीं देणार नाहीं. कळावें तारीख २० माहे जून सन १९०१ इसवी.

सही
शेख दुला वल्लद महमद हयाद
मुसलमान सावकार रहाणार
रेल ता. अकोट पोस्ट
दहिहंडा दस्तुर खुद्द.

## जाहिरात

सर्वत्र लोकांस कळविण्यांत येते कीं कसबे बारशी टाकळी येथील सर्वे नंबर २९२ एकर गुंठे ८८३८ आकार रुपये १५ हें शेत माझ्याकडे दरसालच्या २५ रुपये करारानें वहितीस आहे. शेताची धनीन माझी चुलती गमाई मर्द रामजी माळी इनें आपल्या देहांत देह आहे तों पावेतों वहीत करारानें वहितीला दिलें आहे. गेल्या १०-११ वर्षां पासून हें शेत मीच वहात आहे. हें शेत गमाईच्या पश्चात् वारशाच्या नात्यानें माझ्याच मालकीचें होईल. हें शेत कोणी ही खरेदी किंवा कौलपट्यानें घेऊं नये. जो कोणी माझ्या संमती वाचून या शेतासंबंधानें व्यवहार करील तो फसेल आणि त्याची जबाबदारी आह्मावर राहणार नाहीं. तारीख १८ माहे सन १९०१ इसवी.

सही
संभाजी वल्लद बहादू माळी
यवणकार राहणार बारशी टाकळी निशाणी

## रेलवेच्या अधिकाऱ्यांस विनंती

वऱ्हाडांतील एकंदर रेलवे स्टेशनांच्या मानानें अकोल्याचें स्टेशन बरेंच मोठें आहे. अकोल्याहून परगांवीं जाणारे येणारे पॅसेंजर अर्थातच त्यामुळें जास्त आहेत. अशा ठिकाणीं वास्तविक पाहतां दोन कोचिंग क्लार्कांची जरुरी आहे; ह्मणजे दोन ठिकाणीं थर्ड क्लासचीं टिकिटें देण्याची व्यवस्था असावयास पाहिजे. सध्यांचें क्लार्क एकटे आहेत तरी ते आपलें काम चांगलें करितात. परंतु पॅसेंजरची संख्याच वाढत असल्यामुळें एकट्याच्यानें हें काम होणें फार कठीणच पडते व याचमुळें कित्येक वेळां संभावित लोकांना गर्दींत चांगली धक्का बुक्की व पोलीसचा त्रास सोसावा लागतो. रेलवेचें उत्पन्न जर वाढत आहे तर त्या मानानें पॅसेंजर लोकांच्या सोयीसाठीं थोडीशी झीज सोसणेंही जरूर आहे. आह्मांस रेल्वे कंपनीस तीन गोष्टींची सुचना करावयाची आहे. (१) गांवांत टिकिटांचें आफीस ठेवावें, (२) स्टेशनवर दोन ठिकाणीं थर्ड क्लासचीं टिकिटें देण्याची सोय करावी अगर (३) गाडी येण्याच्या पूर्वीं हल्लीं ज्या वेळीं टिकिटें सुरूं होतात त्या पेक्षां बराच वेळ अगोदर सुरू करण्याची व्यवस्था करावी. अशा योगानें एकाच इसमास फार त्रासही पडणार नाहीं व पॅसेंजर लोकांसही सुख होईल. रेल्वेचे अधिकारी इकडे लक्ष देतील अशी आशा आहे.

आकोला पेठ १५।६।१९०१ } आपला धक्काबुक्कीचा पूर्ण अनुभवी

## मोरोपंत

निवडक वेंचे
(२० व्या अंकावरून पुढें)

श्रीकृष्णाच्या बाळपणींच्या खेळकर व खोडकर स्वभावास लक्षून यशोदेचे उद्गार:—

हरिवंश अध्या. ११

कोपुनि ह्मणे यशोदा,
किति हुडकावास? किति धरावास? ॥
न पुरें, निजगृह, अंगण,
गोठे बहु रुचे तुला परावोस ॥ २६
अति चपळा रामासीं,
मिळतां तूं केवि आवरादास ॥
जो बापुसीं मिळाला,
तो कोण ह्मणेल? आवरा त्यास ॥२७

आणखी एका प्रसंगीं,

हाय! ह्मणत माय निघे,
जाय पळत पाय मृदुल जरि काय ॥
रडुनि गळां पडुनि पळा—
बानि सुताचा स्त्र आर्द्र करि काय १७

अध्याय. १७

कंसवध प्रसंगीं, त्याच्या सभेंत हजारों गवळ्यांनीं प्रवेश केला त्यांस पाहून संताप व क्रोध यांच्या भरांत कंस ह्मणालाः-

भृत्यांतें कंस ह्मणे,
काय पहातां उगेचि हूं गाढा ॥
ह्या यष्टि वनेचर हे
या रंगांतुनि या क्षणीं काढा ॥ १९
हे विकृत पापदर्शन,
न पहावे गोप, कोप मज आला ॥
सर्वस्व हरुनि गवळी,
राज्या बाहेर सर्वही घाला ॥ १०
नंद स्वामिद्रोही,
कपटी लोकांत या असा थोडा ॥
खोड्याचि उचित परि हा,
वृद्ध ह्मणुनि लोहशृंखळा जोडा ॥ ११

१ गुरांचा गोठा. २ परकीय स्थान, पक्षीं श्रेष्ठ स्थान. ३ गंध. ४ सेवकांतें. ५ विचित्र रूपाचे.

वऱ्हाडसमाचार

मिती आषाढ शुद्ध ८ शके १८२३

## पंढरपूरची यात्रा

गुरुवारीं आषाढी एकादशीचा पंढरीस महोत्सव आहे आणि ह्या निमित्त आमच्या प्रांतांतून पंढरपुराकडे पुष्कळच यात्रा लोटली आहे. ती एकादशीची सुवेळा साधण्यासाठीं सर्व यात्रेकरू मोठ्या परिश्रमानें पंढरीची वाट जवळ करीत आहेत. आमच्या प्रांताचे लोक मोठे धर्मभोळे व भाविक आहेत. इतर प्रांतांच्या मानानें इकडचे लोक अधीक पैसेकरी व सुखी आहेत. आमच्या वऱ्हाडांतून हल्लीं जी मोठी यात्रा चालली आहे तिची चांगली कल्पना करून घेण्याला रेलवे स्टेशनावर गाड्यांच्या वेळीं गेलें पाहिजे. उतारूंची गर्दी फारच फार असते. रेलवेचे डबे अगदीं तुडूंब भरलेले असतात. माणसें रेंचून भरण्याची परमावधी होऊन जाते. पुष्कळसे उतारू टिकिटें न मिळाल्या कारणानें ठिकठिकाणीं उतरून पडतात. गेल्या शुक्रवारीं व शनिवारीं मिळून ७ गाड्या स्पेशल सोडण्यांत आल्या होत्या.

असा हा भक्त मंडळीचा समूह, त्यांची ती निष्ठा, पंढरीच्या विठोबाचें ध्यान, विठ्ठल नामाचा गजर व पताकांचीं निशाणें हीं पाहिलीं ह्मणजे मनाला मोठा प्रेम, आनंद व लीनता यांचें भरतें येतें. ही विलक्षण धर्मश्रद्धा हिंदूसमाजाला भूषणावह व हितकर आहे. तिला यथायोग्य वळण लावणें व लोकांची सुधारणा करणें हें आपल्या मधील पुढाऱ्यांचें काम आहे.

यात्रेकरू लोकांकडून जितका विपूल पैसा मिळतो त्या मानानें रेलवे कंपनी त्यांची व्यवस्था ठेवीत नाहीं. उतारूंच्या सोयी प्रवासाच्या मानानें कांहीं विशेष केलेल्या असतात, किंवा त्यांच्या गाड्यांतून व मुक्कामांच्या ठिकाणीं बसण्या उठण्याच्या व इतर खाण्यापिण्याच्या सोयी कांहीं अधिक केल्या असतात असें ह्मणण्याला रेलवे कंपनी कधीं संधीच देत नाहीं. आह्मी रेलवे कंपनीला विनंती करितों कीं त्यांनीं उतारूंच्या साठीं मुद्दाम निराळ्या सवलती द्याव्या आणि यात्रेकरूंच्या तोंडून चांगूलपणा संपादावा. ही लोकसेवा ईश्वराच्या कीर्दीला अगोदर रुजूं होईल हें रेलवे कंपनीनें विसरूं नये. यंदा या यात्रेच्या गर्दीमुळें रोगराई वाढेल ह्मणून पुष्कळ लोक शंका घेतात. पण ती विठ्ठलकृपेनें खोटी ठरो ह्मणजे झालें.

## सेशन कचेरी

गेल्या सोमवार पासून आकोल्यास सेशन कचेरी भरत असते. पहिल्या पांच दिवसांत एका खटल्याचें काम चालूं होतें हें प्रकरण पुसद तालुक्यांतील ब्राह्मण गांवच्या दुष्काळ कामावरील सिव्हिल आफिसर रामदास, क्याशीअर वासुदेव रामचंद व वर्कएजंट देवीदास रामजी यांजवर चालूं होतें. आरोप पिनल कोडच्या ४७७ कलमा प्रमाणें होता ह्मणजे हजिरीपत्रक, मेजरमेंट बुक व रोकड वही यांत ९ सप्टेंबर १९०० रोजीं मजूरदार लोकांनीं काम मुळींच केलें नसून त्यांस मजुरीचा पैसाही आदा न होतां सदहूं काम झाल्याबद्दल व रोजमुऱ्याचा बटवडा केल्याबद्दल खोटी नोंद केली असा गुन्हाचा मतलब होता. मोकद्दम लोक, टाइमकीपर्स व मजूरदार यांच्या साक्षी सरकारतर्फे झाल्या आणि त्यांच्या जबानी वरून या मोकदम्याचा पूर्व वृतान्त असा दिसला कीं तारीख ७ सप्टेंबर १९०० रोजीं ब्राह्मण गांवचें सरकारी काम बंद व्हावयाचें होतें ह्मणून मजूरदार लोकांस विडूळ गांवच्या कामावर धाडण्याचा हुकूम देण्यांत आला होता. नेहमीं प्रमाणें तारीख ९ रोजीं मजूर लोक कामावर आले तेव्हां वर्क एजंट यानें प्रल्हाद मिस्त्री यांस हुकूम दिला कीं, विडूळच्या कामावर जाण्याला खुष असलेल्या लोकांस घेऊन यावें. त्या प्रमाणें जे १००। १२९ लोक खुष होते त्यांस घेऊन मिस्त्री हजर झाला. पण ओव्हरसिअर बुवच्या यांजकडून कळलें कीं विडूळचें काम फक्त ७।८ दिवसच चालणार आहे. असें कळतांच कोणीही मजूरदार जाण्यास कबूल होईना. सर्वजण रिकामें तीन वाजे पर्यंत बसून राहिले आणि शेवटीं कंटाळून घरोघर परत गेले. आरोपी लोकांनीं लिहिलेलें हाजिरीपत्रक, रोजकीर्द, व कामाची नोंद यांजवरून मजूरदारांनीं काम केलें व त्यांस रोजी देण्यांत आली असें शाबित होत होतें. आरोपी लोकांचा तोंडी पुरावा वरील बुकांला अनुसरूनच झाला. न्यायाधीश मेजर ग्यारेट साहेब यांस सरकार तर्फेचा पुरावा शिक्षा देण्या इतका सबळ वाटला नाहीं. आणि ह्मणून त्यांनीं आरोपींस निर्दोषी ठरवून सोडून दिलें. आरोपी तर्फे रा. रा. दामोदर गणेश पटवर्धन व नारायण काशिनाथ दाते असे दोन वकील होते.

## हें आहे तरी काय?

( लायब्ररीच्या एका वर्गणीदाराकडून )

आकोला नेटिव्ह जनरल लायब्ररीचे कित्येक वर्गणीदारांत अलीकडे बरीच चळवळ चालली आहे असें दिसतें. ती चळवळ ' काळ ' या नांवाचें वर्तमानपत्र लायब्ररींत घेण्या संबंधानें आहे. एखादें पत्र घेण्या संबंधानें चळवळ ती काय असणार असें कोणास वाटेल; परंतु कित्येक पुढारी गृहस्थांच्या दुराग्रहामुळें या साधारण गोष्टीस चळवळीचें स्वरूप आलें आहे. येथील पुढारी गृहस्थाच्या मतें ' काळ ' हें पत्र राजद्रोही असावें असें दिसतें; व असें पत्र लायब्ररींत घेतलें असतां लायब्ररीचे वाचक राजद्रोही होतील व तेणें करून त्यांच्यावर सरकारची इतराजी होईल असें त्यांचे हितचिंतक जे पुढारी यांस वाटत असेल असें स्पष्ट दिसतें. पुढाऱ्यांची ही इच्छा स्तुत्य आहे यात शंका नाहीं. परंतु जसा एखादा भित्रा ह्मातारा बाप ज्या ठिकाणीं कांहीं भीति नाहीं असें मुलांस वाटतें अशा ठिकाणीं मुलांस बाहेर जाऊं देत नाहीं त्या सारखी थोडीशी ही गोष्ट दिसते. बाप तरुण होता तेव्हां धीटपणानें तो त्याच ठिकाणीं आपण निर्भयपणानें जात होता. परंतु वृद्धापकाळा मुळें किंवा अन्य कारणामुळें ह्मणा तो भित्रा झाला ह्मणून तो मुलांनाहि तरुणपणांतच भित्रीं करूं लागला अशा सारखें हें करणें आहे. ज्या प्रमाणें अशा बापाचीं मुलें आपला बाप विनाकारण भितो, येथें भिण्यासारखें कांहीं नाहीं असें ह्मणून त्याला न जुमानतां खुशाल बाहेर जाऊन फिरून येतात त्या सारखी स्थिति हल्लींच्या प्रसंगीं होईल असा रंग दिसत आहे. जें कांहीं होईल तें सर्वांस योग्यकाळीं दिसेलच.

आतां प्रथम दर्शनीं असा प्रश्न निघतो कीं ' काळ ' हें पत्र राजद्रोही आहे काय? जर तें राजद्रोही असेल तर मुंबई इलाख्याचें सरकार तें प्रसिद्ध होऊं देईल काय? वस्तुतः तें पत्र प्रसिद्ध होतें आहे इतकेंच नाहीं तर त्याच्या तीन चार हजार प्रती खपत आहेत. अशा प्रकारचें तें लोकप्रिय असल्याचें स्पष्ट दिसत आहे. दुसरें त्या पत्राचे संपादक एक विद्वान् गृहस्थ असून त्यांनीं आपली विद्वत्ता, काळ आणि अनुभव त्या पत्राच्या कामीं खर्चीं घालण्याचें व्रतच धारण केलें आहे. पत्राची भाषा फार उत्तम असते. व पत्रांत अनेक विषयांचें चांगलें विवेचन होत असून त्याचे विचारहि सर्वमान्य असतात असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दोषदृष्टीनें पाहिलें तर भाषासरणी थोडी कडक असते इतकेंच काय तें ह्मणतां येईल. पत्र जर अशा सद्गुणांनीं युक्त नसतें तर त्याला इतके ग्राहक मिळते काय? त्यांतील माहिती जर मजली सलतीच किंवा खोटी अशी असती तर तें लोकादरास इतकें पात्र झालें असतें काय? या वरून तें पत्र राजद्रोही नाहीं व वाचनीय आणि संग्राह्य आहे असें स्पष्ट होतें.

सरकारच्या राज्यपद्धतीवर टीका करण्याच्या संबंधानें तें पत्र कडक भाषा वापरतें ह्मणून तें आकोल्याच्या लोकांस अग्राह्य ह्मणायाचें कीं काय? कडक भाषा वापरणारा जर भीत नाहीं तर वाचकांनीं भिण्याचें कीं काय? एखादा शूर मनुष्य युद्धांत, बंदूका व तोफा यांच्या माराशीं सामना करतो आणि त्याची हकीकत तो स्वतःच किंवा तिसरा एखादा मनुष्य इतर मंडळीला सांगतो तेव्हा ती इतर मंडळी ह्मणते " बुवा त्या गृहस्थाच्या शौर्याची गोष्ट आह्मास सांगू नका, ती ऐकण्यास आह्माला भिती वाटते " या लोकां सारखीच आकोल्यांतील पुढारी मंडळीची स्थिति दिसत आहे. अरे ग्रहस्थहो, 'काळ' पत्राचा संपादक धैर्यानें कडक लेख लिहितो, ते वाचण्याची देखील तुह्माला भीति वाटते काय? खरोखर तुमच्या बहादरीची तर कमाल झाली. नागपूरचे कै० हरि महादेव पंडित, जे नागपूराकडे एक नाणीदार गृहस्थ होऊन गेले, ते ह्मणत असत कीं " हिंदुस्थानांतील पुरुष हे बिन बांगड्याच्या बायका होत " हें विधान ते कित्येक विशेष शूरत्वाच्या गोष्टी संबंधानें करीत असावेत. हल्लींची गोष्ट तर याहूनही कमीपणाची दिसते. ताबुताच्या दिवसांत वाघा बरोबरचे डफडे रस्त्यावर वाजूं लागलें ह्मणजे लहान मुलें जशीं घराच्या घरांत आईच्या पाठीमागें लपून बसतात त्यासारखी ही गोष्ट दिसते. किंवा विष्णुपंत छत्रे रोळेचा मोठा नाळ करून जेव्हां सिंहाच्या पिंजऱ्यांत शिरत त्या वेळीं रंगभूमीवरील स्त्रिया भितीनें बाहेर निघून जात, या सारखें अकोल्यांतील पुढाऱ्यांचें धैर्य दिसतें. काळ पत्रकर्ता कडक लेख लिहितो तो एक बहादर, व सरकार ते कडक लेख पाहून त्याला ते अप्रतिबंध लिहूं देतें तें दुसरें बहादर, पण ते लेख वाचण्यास जे भितात त्यांच्या बहादरीला काय नांव द्यावें?

आतां काळ पत्र बरें असो किंवा वाईट असो, आमचें प्रांतिक सरकार जर आह्मांला ह्मणेल कीं हें पत्र तुह्मी आपल्या वाचनालयांत घेऊं नका तर गोष्ट वेगळी. असें सरकार ह्मणतें आहे का? ह्मणत असेल तर समूळाच तंटा मिटला. कारण सरकारच्या

ह्मणण्या साठीं तें पत्र घेऊं नये ही गोष्ट सर्वांस मान्य होईल. पण सरकारचें असें ह्मणणें नाहीं हें स्पष्ट आहे. कारण उमरावतींत व अन्यत्र हें पत्र घेतलें जातें असें कळतें. तेव्हां आह्मी हें पत्र घेतलें असतां सरकारास आवडेल कीं नाहीं अशी निष्कारण भीति बिचाऱ्या पुढाऱ्यांच्याच मनास खाते या वांचून त्यांच्या दुराग्रहाचें दुसरें कारण दिसत नाहीं. अशा निष्कारण भितीचा परिणाम सर्वांस भोगावयास लागावा हें बरें नाहीं. **काळ** पत्र तर नकोच, परंतु हल्लीं येत असलेलीं केसरी व अमृत बझार हीं वर्तमान पत्रें देखील बंद करावीं असा पुढाऱ्यांचा मानस दिसतो इतकेंच नाहीं तर या अर्थाचे यांचें उद्गारहि बाहेर पडले आहेत असें ह्मणतात. राष्ट्राच्या अंगांत कांहीं तरी पाणी असलें पाहिजे हें जर आपणांस कबूल आहे तर हीं जीं तीन वर्तमानपत्रें सांगितलीं यांच्या योगानें आपल्या राष्ट्रांत असलेलें पाणी जिवंत राहील इतकेंच नाहीं तर त्यापासून तें पाणी वृद्धिंगतहि होईल. कारण हीं वर्तमानपत्रें स्वतः पाणीदार आहेत. जर असलेलें पाणी नष्ट व्हायला पाहिजे असलें व त्याची वृद्धिहि नको असली तर अकोल्यांतील पुढाऱ्यांची इच्छा फार योग्य आहे. परंतु तरुण मंडळींच्या अंगांतलें रक्त जर सळसळत आहे आणि वरील पत्रासारखीं पत्रें वाचण्याची इच्छा त्यांस होत आहे तर हल्लींच्या नायकाहून पाणीदार असे नायक त्यांना पाहिजेत हें स्पष्ट आहे.

आकोल्यांतील पुढाऱ्यांचें असें ह्मणणें पडत आहे कीं, सामान्य लोकांस चांगलें कोणतें व वाइट कोणतें हें कळत नसल्यामुळें आह्मी त्यांस चांगल्या वाचनाची अभिरुचि लावून देण्यास इच्छितों व याच उद्देशानें 'काळ' पत्र नको असें ह्मणतो. आकोल्याच्या लायब्ररींत जाऊन पुस्तकें व वर्तमानपत्रें जे वाचतात ते इतके मूर्ख समजावयाचे काय कीं त्यांस बरें वाईटहि कळत नाहीं! पेनेल साहेब धीट, सरळ, व हुषार न्यायाधीश आहेत ह्मणून ते स्तुतीस पात्र आहेत असें जरी सर्वांस कळलें तरी न्यायाच्या प्रोसिडिंगांत ज्या त्यांनीं अप्रासंगिक गोष्टी घुसडल्या माबद्दल त्यांचा अविचारीपणा लोकांच्या लक्ष्यांत आला नाहीं काय? लायब्ररीच्या वाचकांस अगदीं मूर्ख समजून त्यांस हें वाचा व हें वाचून नका असें सांगण्याची आवश्यकता आहे असें दिसत नाहीं.

तरी पुनः एकंदरीनें पुढारी एकाच दगडावर मजबूत पाय ठेवून उभे आहेत असें दिसत नाहीं. कारण ते असेंहि ह्मणतात कीं **काळ** पत्र घेतलें असतां कित्येक सरकारी अंमलदार, जे हल्लीं लायब्ररीचे वर्गणीदार आहेत, ते आपलीं नांवें काढून घेतील व तेणेंकरून लायब्ररीच्या उत्पन्नास धक्का बसेल. ह्मणजे या बोलण्यांत पैशासंबंधानें लायब्ररीचें नुकसान होईल ह्मणून **काळ** पत्र नको असा अर्थ झाला. ही गोष्ट खरी मानली तर बड्या मंडळीची व सामान्य मंडळीची अशा दोन लायब्ऱ्या वेगळ्या पाहिजेत असें स्पष्ट दिसतें.

जी हल्लीं बडी मंडळी ह्मणून आहे ती पूर्वीं सामान्य मंडळीच होती. परंतु पैसा आणि अधिकार त्यांजपाशीं आल्यामुळें त्यांचें पाणी गेलें हें योग्यच आहे, कारण पैसा आणि अधिकार यांचें व पाणी ह्मणून ज्यास ह्मणतात त्याचें नेहमीं वांकडेंच असायाचें. तेव्हां House of Lords आणि House of Commons हें जसे दोन पक्ष इंग्लंडांत आहेत त्याप्रमाणें आकोल्यांत बडी मंडळी आणि सामान्य जन यांचे दोन वेगळे पक्ष होणें आवश्यक दिसतें. त्यावांचून सुधारणा ह्मणून ज्यास ह्मणतात ती होणें संभवनीय नाहीं. सुधारणा जी व्हावयाची ती सामान्य लोकांकडूनच होणार.

हल्लींची चळवळ कांहीं तोडजोड होऊन शेवटास जात आहे असेंही एक चिन्ह दिसत आहे. पुढारी असें ह्मणत आहेत कीं, आह्मी लायब्ररीच्या पैशांतून **काळ** पत्र घेण्यास पैसा देत नाहीं, जर कोणी तें पत्र लायब्ररीस फुकट देईल तर तें टेबलावर मांडण्यास आह्मी हरकत घेणार नाहीं. असो. हें तरी मोठेच धैर्य ह्मणावयाचें.

या संबंधानें लिहिण्याचे पुष्कळ मुद्दे आहेत परंतु हें प्रकरण लिहिण्यास इतकें लाजिरवाणें वाटत आहे कीं या विषयीं आज ज्यास्त लिहित नाहीं. हें प्रकरण कोणत्या थडीस जातें याची तूर्त वाट पहात बसतो. कळावें.

## The Berar Samachar

MONDAY JUNE 21 1901

Progress of events in India is not at all promising so far as the question of poverty presses on our attention for a practical solution. The magnitude of increasing poverty is so very stupendous that a most imaginative mind can hardly perceive the deapth to which our people will sink in the course of time. Whether or no we seriously sit to decide the problem, the point will have to be gone into if we do not mean to let things have their run into the unknown and still deeper regions of poverty and the evils consequent there upon. The striking manisfestations of this growing evil are more than vivid in the loss of an independent tone of character: the squeamish habits of serving the time are the dark spots in our life. We live in a manner to court the favour of a big official, to further the cause of our relations in the government service, and to push on our men to a better platform of income in litigation, the art of healing or the quill-drivers' penmanship. All our education schools us in these requirements and we are getting on the worse for our present education. We cannot move even a little out of the groove of this deplorably settled mode of life without being at a loss to know what to do. The arts we learn in our schools and colleges are more or less literary and can alone enable us to move in the higher strata of our society. But as the real evil is throwing its root deeper down in this portion of our society we feel that a great danger is hanging over our head. The spirit of deterioration springs up in our forward classes and goes down with a violent force to kill the genuine self—help that moulds the lives of our masses in general. The high fashion of living is seen in the comforts, luxuries and the bombast of the forward people of our society. This sort of living in the imitation of the English system costs them all the money that their refined professions can secure for them. But the case is worse when we see this spirit of imitation run supreme in the midst of the masses who live upon the agriculture or the trade in agricultural produce. Their incomes are limited and the example followed absorbs them all. The life of a spend—thrift is the rule of the day and this tends to deepen poverty in all circles of the Indian community. The real hitch of poverty lies in the loss of our material wealth. We want India to improve in commerce, industry and manufacture. This sort of progress will alone bring wealth to India. The drain of wealth due to political causes is enormous and we may safely leave that question in the able hands of grand men like Mr. Dadabhoy Navaroji and Sir Romesh Chandra Dutt. But the question of improving our material position needs a practical reform in our education, and in the accumulation of capital to employ Indian labour on Indian industries. Our Masters and Bachelors of arts, which are merely literary, have no scientific training worth the name. The University curriculum requires a thorough change. The training in sciences should have the foremost place in the course of studies. Our India shows no progress in the spread of the scientific education. The liberal education has given a death—blow to our education on the technical side. The study of English kills our energy and leaves us hopeless in the world's affairs. There is the great want of schools where the young people can learn the best lesson of self—help. Self—help, independence of character and material progess run as it were in a link. The first leads to the second and the latter to the desired goal. We would like our young students to revolt at the present system and to call upon their elders to show them a road to earn a decent and independent livelihood. We hope that the present want will be felt on all sides and let us come forth to hold our deliberations on the question of India's material progress. We know what we want and we shall have to imitate western nations in the art of making money. If we do not be wise in time we do not know how to preserve our people from the civilized serfdom which threatens to be our doom in the near future.

—:0:—

Raja Inder Karan Bahadur Asafjahai, Honoary Attaché is appointed a 1st. Class Magistrate. This is a happy news and it brings to prominence the special qualifications of the Rajasahib as a Magistrate. His previous work is much appreciated and it is therefore that he is appointed to exercise higher magisterial powers though he has yet to pass the departmental tests in law. His keen and intelligent grasp of facts, his impartial common—sense view and his sound reading of law make him a good magistrate. His is a high born, social and amiable gentleman. His collegiate education, his proficiency in high flown Urdu and his fair study of Marathi are worth a special notice. We congratulate him upon his excellent success in Berar and when he returns to the Hyderabad Durbar after he has put in Berar his preliminary term of apprenticeship in the work of administration we hope he will gradually rise to higher posts of honor, authority and dignity. We shall not be amiss if we expect to see him attain to the Dewanship of His Highness the Nizam.

## वऱ्हाड

हवामान— पाऊस नाहीं ह्मणून हाकाहाक आहे. आसपास थोडा पडला आणि लवकरच सर्वत्र पाऊस चांगला होईल असा रंग दिसतो. बाजार भाव तेजीचे आहेत.

मि. रुस्तुमजी फर्दूनजी दिपटी कमिशनर हे रजेवरून परत आल्या नंतर बदलीच्या ह्मणजे बुलढाणें जिल्ह्याचें काम पाहूं लागतील.

राजा इंद्रकरण बहादूर आनररी अट्याची यास १ ले वर्ग माजिस्ट्रेटचे अधिकार देण्यांत आले हें कळविण्यास आनंद वाटतो.

गेल्या एप्रील महिन्यांत या प्रांतांत २८६० माणसें जन्मलीं आणि ६४८० मृत झालीं.

अकोला फारेस्ट डिव्हिजन मोडून त्याची वाटणी इलिचपूर, बुलढाणा व वाशीम या तीन जिल्ह्यांत करण्यांत आली. ही मोठ्या काटकसरीची व नुकसानीच होय.

वाशीम २१।६।०१

चौकशी— येथील हेड पोस्ट मास्तर व त्यांचे हाता खालील लोक यांचे आंकडे पटत नाहींत ह्मणून तत्संबंधीं तंटा मिटाविण्या साठीं रा. रा. व्यंकटराव इन्स्पेक्टर हे वाशिमास आले आहेत.

खून— कसबे रिसोड येथें आठ रुपयांच्या लोभानें कांहीं दुष्टांनीं एका उंटवाल्याचा कुऱ्हाडीनें खून केला. चार पांच आरोपी धरले असून त्यांजवर काम चालूं आहे.

शिक्षा— नागोराव भरतराव येथील पोतदार, यांस सरकारी पैशाची अफरातफर केल्याबद्दलच्या तीन गुन्ह्याबद्दल ६ वर्षांची कैद झाली.

बदली— शेवटीं लोकवार्ता खरी ठरून मि० ए. बार असि० कमिशनर यांची बदली इलिचपुरास झाली व ते त्याप्रमाणें तेथें निघून गेले.

नोटीस

शिवा वल्लद राघो माहार राहणार पारडी उदखेड जिल्हा उमरावती यांसः—

नोटीस देणार चिंदकी मर्द शिवा माहार राहणार घाटी नोटीस देते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून मला न वागवतां दुसरी बायको केलीस मला मारहाण करून काढून दिलें. मी माझ्या भावाच्या घरीं ७ वर्षां पासून आहे. माझ्या खाण्यापिण्याचा खर्च २५० रुपये पाठवून द्यावे व मला घेऊन जावें. १५ दिवसांच्या आंत असें न केल्यास मी दुसरा धरठाव करीन. माझ्यावर तुमचा हक्क राहणार नाहीं. ता. २१।६।१९०१ इ.

सही

चिंदकीची निशाणी हातची बांगडी.

## वर्तमानसार

स्पेन मधील टोलेडो शहर उत्तम तरवारी करण्यांत प्रसिद्ध आहे व तेथें टेग्सनदीच्या वाळूंत तापविलेलें तरवारीचें पान खुपसलें असतां त्यास उत्तम पाणी चढतें.

विजापूरचा गोलघुमट:— सदर घुमट फार मोठा व उंच असून घुमटाच्या वळणांत एक सज्जा काढलेला आहे. त्या सज्जावर जाऊन मोठ्यानें ओरडल्यास त्या ओरडण्याचे पंचवीस प्रतिध्वनि निघतात आणि दोन टोकांस दोघांनीं समोरासमोर बसून अगदीं हळू बोलले तरी एकमेकांस स्पष्ट ऐकूं येतें, असा तेथें एक अपूर्व चमत्कार आहे.

रेलवेंतील उतारू स्त्रियांवर होणारे जुलूम— एके दिवशीं एक रजपूत स्त्री लालमुसा स्टेशनावरून लाहोरास येत होती. ती चुकून लाहोरच्या पुढें ४१९ स्टेशनें गेली. तेथें गेल्यावर तिनें आपली हकीकत एका टिकिट कलेक्टरास कळविली. त्यानें तिला तेथून स्टेशनाच्या समोरच असलेल्या बागेंत नेलें. तेथें अकस्मात् त्यास एक पोलिस शिपाई भेटला. त्यास पाहिल्या बरोबर टिकिट कलेक्टर साहेब गर्भगलित झाले. त्या स्त्रीनें सांगितलें कीं दुसऱ्या गाडींत बसवितो अशी थाप देऊन त्यानें मला इकडे आणलें. त्याजवर खटला चालू आहे.

(२) साऊथ इंडियन रेलवेंतून ७८ स्त्रिया प्रवास करीत होत्या. तुतीकोरीनला रात्रीं ९॥ वाजतां पोंचणारी गाडी ता० ९ रोजीं रात्रीं ८।९ चे दरम्यान मनीआकी स्टेशनावरून निघाली असतां सदर रेलवेचा एक नौकर बायकांच्या डब्यांत शिरला. त्या सर्व बायका बहुतेक निजल्या होत्या. त्यानें त्यांतील एका तरुण स्त्रीवर हल्ला केला पण इतर बायकांनीं गडबड केल्यावरोबर तो त्या डब्यांतून निघून गार्डाच्या डब्यांत शिरला. तातापारी स्टेशनवर गाडी पोंचल्या बरोबर त्या तरुण स्त्रीचे आईनें ओरड केली व त्या मनुष्यास धरून पोलिसांचे ताब्यांत दिलें. त्याजवरहि खटला चालू आहे. आजकाल सभ्य स्त्रियांना रेलवेनें एकटे प्रवास करण्याची अथवा पुरुषापासून निराळे बायकांच्या डब्यांत बसून प्रवास करण्याची बिलकूल सोय राहिली नाहीं; किंबहुना यांचा प्रवास भयंकर झाला आहे. असें ह्मणणें जास्त शोभेल. रेलवे अधिकाऱ्यांनीं व सरकारानें ह्याचा बंदोबस्त करणें उचित आहे.

गोऱ्यांनीं काळ्यावर हल्ला करणें अथवा बायकांवर जुलूम करणें हे प्रकार वाढत चालले याचें कारण तो गुन्हा करणारे गोरे अपराधी न्यायकोर्टातून कोर्टाच्या नजरेखालीं किंवा दारूच्या धुंदीखालीं किंवा वेडेपणाच्या ढोंगाखालीं किंवा क्रोधाच्या आवेशाखालीं किंवा डोकें ठिकाणावर नव्हतें ह्या सबबीखालीं दोषमुक्त ठरून सुटून जातात, हेंच होय लार्ड कर्झन यांनीं ह्याचें बंदोबस्तासाठीं कडक नियम केले; पण त्या नियमांची कडक अम्मलबजावणी करण्याचें जोंपर्यंत अधिकाऱ्यांनीं मनांत आणिलें नाहीं तोंपर्यंत त्या नियमांचा कांहींएक उपयोग होणार नाहीं.

पोलीसच्या फाजील तसदीमुळें कलकत्यांतील १०००० गाडीवाल्यांनीं कट केला होता. पो. सु. साहेबांनीं त्यांची समजूत केल्यामुळें गाडीवाल्यांनीं पुन्हां गाड्या जोडल्या.

आजपर्यंत ज्यांनीं शेतसारा भरला नाहीं त्यांना नोटीस न करितां किंवा त्यांणीं सारा दिला तरी न घेतां त्यांच्या जमिनी सरकार दाखल कराव्या, व पुढें काय करावयाचें हें ठरेपर्यंत त्या जमिनी सरकारतर्फें पूर्वीच्या इसमाकडेच लागवडीस राहूं द्याव्या, असें हल्लीं ठरविण्यांत आल्यामुळें लोकांत मोठी धांदल उडून गेली आहे. नशीब!

ट्रान्सवालची लढाई पूर्वी प्रमाणेच आवेशानें व उत्साहानें चालू आहे. व इंग्रज लोकांस अंतरगीं चिंता खात आहे असें तिकडील पत्रावरून स्पष्ट समजतें.

दोन तीन महिन्यापूर्वी अहमदनगर येथें विवाहाचे नांव होऊन ज्या मुलीवर दुसरेच दिवशीं नवरदेवाच्या मृत्युमुळें आजन्म वैधव्याचा प्रसंग आला होता तिचा विवाह पुन्हां शास्त्रोक्त करण्यांत आला. विवाहांत सप्तपदी हा संस्कार मुख्य आहे. तो अपुरा राहिल्यास अगर वैकल्यानें (अर्धवट) झाल्यास विवाह परिपूर्ण होत नाहीं हें तत्व धर्मशास्त्रसंमतच होय. धाडसानें कशीतरी आचार्यद्वारा विवाहकर्में उरकणारांनीं ही गोष्ट ध्यानांत धरावी.

बटाट्याचा कीस तुरटीचे पुडींत मिसळून त्यानें चाकू, काट्या, सुऱ्या वगैरे घासल्यास तीं हत्यारें चांगली स्वच्छ होतात.

आश्चर्य— आस्ट्रियांतील एका डाक्टरानें पुष्कळा समक्ष एका अंध मुलास वाचण्यास लावण्याचा प्रयत्न करविला! शास्त्रीय रीतीनें त्यानें एका अंधार कोठडींत त्या मुलाचे नेत्रावर प्रकाशानें किरण पाडून त्या मुलाकडून पदार्थ ओळखिले इतकेंच नाहीं तर त्याकडून पुस्तकही वाचविलें!

उदार देणगी— मि० ॲंड्रू कार्नेगी नांवाच्या एका कोट्याधिशानें आपल्या देशांतील (स्काटलंड) प्रत्येक स्त्री पुरुषांस मोफत उत्तम शिक्षण मिळावें ह्मणून तीन कोट रुपये काढून ठेविले आहेत.

लवाडीनें भ्रष्टाकार— पुरी येथील जगन्नाथाचें देवालय सुप्रसिद्ध आहे. हें देवस्थान हिंदूंचें आहे. व त्यांत इतर जातीस जाण्याचा प्रतिबंध आहे. असें असतांही तेथील सिव्हील मेडिकल आफिसरची स्त्री आणि दुसऱ्या कांहीं ख्रिस्ती स्त्रिया यांनीं लवाडीनें त्या देवळांत प्रवेश केला. ह्यांचा उद्देश फक्त हिंदू लोकांच्या धार्मिक भोळ्या वृत्तीचा उपहास करण्याचा होता. ह्या त्यांच्या करण्यानें सर्व हिंदु लोक फार खवळून गेले आहेत. व पोलीस लोकांचा उत्तम बंदोबस्त नसतां तर मारामारी व लठ्ठालठ्ठी माजली असती. हिंदूच्या धर्मसमजूतींचा अशा तऱ्हेनें उच्छेद करणें, आणि पुण्य व पवित्र अशा महा देवालयास ख्रिस्ती लोकांनीं विटाळविणें हें कृत्य चीड आणणारें आहे. सरकारनें धर्माचा हलकटपणानें छळ, विटंबना किंवा उपहास करणाऱ्यांना योग्य बंदोबस्त केला पाहिजे, नाहीं तर परिणामीं जड जाईल.

शिकार— युरोपियन लोकांस हरणादि चपल चतुष्पादांची शिकार करण्याची मोठी हौस असते. आपल्या लोकांत अलीकडे शिकारीचें साहित्य साधन कांहींच अवगत नसल्यामुळें आमची हौसच नाहींशी झाली आहे. व्याघ्रादि दुष्ट श्वापदांनीं शिकार करणें जीवा वरचेंच संकट होय. पूर्वी आपले शूर लोक ह्या हिंस्त्र पशूसी कुस्तीही खेळत असत. निदान अश्वगजारूढ होऊन त्यांची शिकार करीत असत. पण युरोपियन लोक तर बायसिकलवर बसून (लपून छपून नव्हे) वाघांची शिकार करूं लागले आहेत ह्मणतात. बायसिकल वर बसून कसली व कशी शिकार करितात कोण जाणे! आह्माला तर ही गोष्ट एकून अचंबाच वाटतो.

जपान मधील देहांत शिक्षा देण्याची रीत:— एका खोलींत मनुष्यास बंद करून तेथील हवा एअर पंपानें काढून घेतात. मग आपोआपच मनुष्य प्राण सोडतो. पण त्यास कांहींहि दुःख होत नाहीं हें कसें? हवेसाठीं त्याची तडफड होत असलीच पाहिजे. अमेरिकेंतली विजेनें जीव घेण्याचीच उत्तम युक्ती दिसते.

---

## भारत भाग्योदय अथवा सोन्याचा दिवस

नंबर ३

किल्लेदाराच्या भेटी नंतर रघुनाथजी श्रीभवानीच्या दर्शनासाठीं गेले. ह्या भवानीची स्थापना शिवाजी महाराजांनींच केली होती. व देवीची यथासांग पूजा अर्चा व नैवेद्य होत जावा ह्मणून एका रजपूत ब्राह्मणाची नेमणूकहि केली होती. हा ब्राह्मण बाहेर गेला असल्यामुळें रघुनाथजींना बाहेरच बागेंत वाट पहात बसावें लागलें. बसल्या बसल्या रघुनाथजी आपल्या मनाशींच कांहीं विचार करीत आहेत तोंच एक सुस्वरूप बाला त्यांच्या दृष्टीस पडली. तिला पाहून रघुनाथजींना फार आश्चर्य वाटलें. ही स्त्री फुलें तोडण्यासाठीं तेथें आली होती. तिनें प्रथम रघुनाजींना मुळींच पाहिलें नाहीं. ती आपली फुलें तोडण्याच्या नादांतच होती. पण एकदम तिची दृष्टी ह्या रजपुताकडे गेली तेव्हां ती लाजून आपलें काम भराभर करून जाऊं लागली. घरीं जातांना मात्र पुन्हां एकवार तिनें सविनयस्मित मुद्रेनें त्याजकडे मागें वळून पाहिलें. रघुनाथजीच्या मनात तिला कांहीं विचारावयाचें होतें पण सर्वच बेत मनांतल्या मनांतच राहिला.

थोडक्याच वेळांत देवीचा पुजारी ब्राह्मण बाहेरून परत येऊन देवळांत गेला. त्याच्या पाठोपाठ रघुनाथजीहि आंत गेले. ब्राह्मण जयपूरचा रहाणारा होता. याचें नांव जनार्दनदेव असें होतें. वय पन्नाशीच्या जवळ जवळ होतें. तरी पण शरीराची काठी मजबूत होती व तिशींतल्या जवाना प्रमाणें मुद्रा तेजःपुंज दिसत होती. याचा स्वभाव मोठा दिलदार दिसत होता. पूर्वी हा जयसिंह रायाच्या दरबारीं नामांकित पंडित होता. शिवरायाच्या विनवणीवरूनच ह्या तोरणा किल्लयावर देवीच्या पूजेसाठीं रहात होता. यांस स्वतांचें अपत्य वगैरे कांहीं नव्हतें. फक्त एका जिव्हाळ्याच्या स्नेहाची एकुलती एक पोर याजजवळ होती. तिला तो आपला जीव कीं प्राण करीत असे. ज्या मुलीनें फुलें तोडतां तोडतां रघुनाथजींचें मन वेधून घेतलें ती हीच. हिचें नांव सरयू होतें. जनार्दन देवाची स्त्री मरण पावल्यापासून ह्या देवालयाच्या ओरींत हे दोघेचजण रहात असत. किल्ल्यावरील सर्व मंडळी ह्या वृद्ध ब्राह्मणांस कण्व व सरयूला शकुंतलाच ह्मणत असत.

रघुनाथजी व जनार्दन देव यांची भेट झाल्याबरोबर परस्परांचें नमस्कारादि कुशल प्रश्न झाले दोघेहि यथोचित स्थानाधिष्ट झाल्यावर रघुनाथजी शिवाजी महाराजांनीं पाठविलेली मोहोरांची थैली पुढें ठेवून बोलले:—

रघुनाथजी— आपली श्री अंबाबाईची पूजा अर्चा चांगली चालूं आहेच पण सांप्रत मोंगलाशीं लढाई चालूं आहे त्यांत आह्मांस यशश्री मिळावी, ह्मणून देवाची प्रार्थना करण्याविषयीं महाराजांनीं मुद्दाम सुचविलें आहे. कारण सर्व कामांत मुख्य तिची कृपाच पाहिजे.

जनार्दन देव— आपल्या हिंदुधर्माचा अभिमान आपणा सर्वांस पाहिजे शिवराय गोब्राह्मणांचे पालक आहेत. त्यास जयसंपदा लाभावी ह्मणून भवानीची प्रार्थना करण्याचें मला निराळें सांगणें नकोच. ती मी मनःपूर्वक करीनच करीन.

इतकें संभाषण झाल्यावर रघुनाथजी उठले व जाण्यास परवानगी मागूं लागले. तेव्हां

जनार्दन देव— आपलें ह्या किल्ल्यांत पूर्वी कधीं येणें झालें होतें काय?

रघुनाथजी— नाहीं, येथें येण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे.

जनार्दनदेव— तर मग येथें आपली कोणाची विशेष ओळख पाळख नसेलच. मग आपण उतरणार कोठें?

रघुनाथजी— ओळख नसली ह्मणून काय झालें. सारी एक रात्र तर काढावयाची.

जनार्दन देव— वाहवा! असें काय ह्मणून? असें नाहीं करावयाचें.

रघुनाथजी— यांत काय आहे? वारंवार प्रसंगामुळें अशा गोष्टी अंगवळणीच पडल्या आहेत.

जनार्दन देव— ठीक ठीक. लढाईंत अडचणी सोसणें रास्त आहे. पण येथें काय ह्मणून? रात्र आमच्याच येथें आमच्या समागमें घालवावयाची. आमची मुलगी आपला पाहूणचार मोठ्या आनंदानें करील. उदयीक प्रातःकाळीं देवीचा आशीर्वादनिरोप घेऊन जावयाचें करणें.

अशा आग्रहाचें भाषण ऐकून रघुनाथजीस फारच हर्ष झाला. व त्या आनंदाच्या धडधडण्यानें त्याचें हृदय वर उचंबळूं लागलें, ज्या मुलीस बागेंत त्यानें पाहिलें होतें ती हीच!

(पुढें चालूं)

---

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.